पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवचरनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ अंक १२ वा । मूल्य : रु. ४० । दिनांक : १६ ते २८ फेब्रुवारी २०२३




## दिसायला टेरिकॉट, वापरायला मांजरपाट

अमृत कालातल्या चिखलातून नेमके काय उगवेल ? – सुरेश भटेवरा

काँग्रेसच्या उदरातून उजव्यांचा जन्म – जयदेव डोळे

विद्रोह – बी.जी. वाघ

पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ५ ।
अंक १२ । मूल्य : रु. ४० । दिनांक : १६ ते २८ फेब्रुवारी २०२३

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्


**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद – ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com


(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.
* अंकातील कोणताही मजकर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.


**ऑनलाईन समन्वयक**
प्रतीक माधुरी


द पीपल्स पोस्ट
8888541822

- **जाहिरात विभाग संपर्क**
  ९८२११४४५४०९ / ८८०५१५१४५२

अंकाची वार्षिक वर्गणी ८००/– रुपये फक्त

- **द पीपल्स पोस्ट बँक अकाऊंट डिटेल्स्**

द पीपल्स पोस्ट : SBI Bank
शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
AC No. 37856373419
IFSC CODE : SBIN0007919
MICR No. : 431002010

ऑनलाइन पमटसाठा यथ स्कन करावे


वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा


**संपादकीय :** दिसायला टेरिकॉट, वापरायला मांजरपाठ....– ३ / अमृत कालातल्या चिखलातून नेमके काय उगवेल? – **सुरेश भटेवरा – ५** / लोकसभा २४ : उलटी मोजणी सुरू – **अनंत बागाईतकर – ९** / **उजवे उत्खनन :** काँग्रेसच्या उदरातून उजव्यांचा जन्म – **प्रा. जयदेव डोळे – १३** / आता साहित्यिकांची संमेलने कशासाठी व्हावीत...? – **डॉ. यशवंत मनोहर – १५**/ विद्रोह – **डॉ. बी.जी. वाघ – १९** / विषमता–विसंवाद–विध्वंसमुक्त भारतासाठी कृती कार्यक्रम – **प्रा.एच.एम. देसरडा – २२** / उत्क्रांती : एक निखळ वास्तव – **प्रा. जयप्रकाश म्हात्रे – २५** / **मागील अंकातून :** जवाहरलाल नेहरु विरुद्ध– **नरेंद्र मोदी – शेषराव चव्हाण –२८** / दूरस्थ मतदान; विश्वासार्ह किती? – **प्रा. डॉ. प्रदीप पंजाबराव दंदे – ३१** / **ग्रंथ परिचय :** धर्माचा नवीन पद्धतीने अभ्यास – **नागसेन बागडे – ३३** / **कोणता भारत.. : ३५** – बलात्कारी बाबा आसाराम एक सापडला, बाकीच्यांचं काय? । भारत जोडो यात्रेने उमटवल्या विचारमुद्रा – **तात्या विंचू** / **कविता :** एकटेच असतात ते... – **श्रीपाद भालचंद्र जोशी –** । या जिभेवरच्या बेड्या अन् ही कवितेची नसबंदी – **अमोल बागूल – ३८** / निपक्ष: पत्रकारितेचे पाठिराखे.... – ३९

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक चेतन भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए–४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460

# दिसायला टेरिकॉट, वापरायला मांजरपाट

भाईयो और बहनो असा रोज गळा काढत तुफान टाळ्या मिळवणाऱ्या मोदी सरकारचा या टर्ममधला शेवटचा अर्थसंकल्प वाचून सामान्यांच्या ओठावर अशा काही प्रतिक्रिया आल्या असणार आणि ज्या बुलेटप्रूफ मोटारीतून फिरणाऱ्या नेत्यांच्या कानावर जाण्याची शक्यता नाही. आपल्या नेत्यांना जेवढी सुरक्षा असते तेवढी अमेरिकेच्या नेत्यांनाही नसणार. आपण जेवढा सुरक्षेवर खर्च करतो तेवढा अन्यत्र कोणी करत नसणार... तर लोक म्हणाले असतील, की निवडणुकीच्या नावानं चांगभलं... दिसायला टेरिकॉट आणि वापरायला मांजरपाठ किंवा कॉटन, दिसायला पैठणी आणि वापरायला भरडी, थाळीत अन्न आणि मनगट मात्र रिकामं वगैरे वगैरे... खूप वाजत वाजापगाजाप करून सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात आकड्यांचे डोंगर आहेत आणि ते स्वाभाविकही आहे. सुमारे दीडशे कोटी लोकसंख्या घेऊन आपण जगात वरच्या नंबरवर गेलो आहोत. या नंबरला शोभतील असेच आकडे आल्यास नवल काय? आपला अर्थसंकल्प इतका भव्य आहे, की त्याची वित्तीय तूट १७ लाख ८७ कोटी तर महसुली तूट आठ कोटी ६९ लाख कोटी आहे. ती भरून काढण्यासाठी आणि अर्थव्यवस्था चांगली, सुदृढ आहे हे सांगण्यासाठी हुशार सरकार कर वाढवत नेते. जगण्याच्या प्रत्येक घटकांवर सामान्य माणूस कर भरतो. कराच्या ओझ्याखाली तो दबू लागला, की मग भव्य-दिव्य कर्ज काढणे सुरू होते. कर्ज इतके वाढते, की त्याचे व्याज भरण्यासाठी पुन्हा कर्ज काढावे लागते. जेवढे कर्ज तेवढी प्रतिष्ठा, असा नवा सिद्धांत मांडला जातो. महाराष्ट्राचेच घ्या ना! गेल्या वर्षअखेर या एका राज्यावर साडेपाच लाख कोटींचे कर्ज होते. ते फिटण्यापूर्वीच पुन्हा कर्ज काढले जातेच. तर देशाच्या तिजोरीत जेव्हा एक रुपया येतो, तेव्हा त्याच्यात १५ पैसे प्राप्तीकर, १५ पैसे कॉर्पोरेशन कर, चार पैसे सीमा शुल्क, १७ पैसे वस्तू व सेवा करातून आणि सात पैसे केंद्रीय उत्पादन शुल्कातून मिळतात. त्यात ३४ पैशांचे कर्ज जमा केल्यास हा आकडा जातो ९२ पैशांवर. कर्जेतर भांडवली जमा दोन पैसे आणि करेतर उत्पन्न सहा पैशांचे मिसळल्यास तयार होतो एक रुपया, म्हणजे शंभर पैसे. रुपयात सर्वात मोठा वाटा करांचा आहे. कर्जाचा आहे. कर हे कोणत्याही देशाचे ठोस उत्पन्न असते. कराचा डोंगर उभा करण्यासाठी नागरिकाचे दरडोई उत्पनही मोठे असावे लागते. आपल्याकडे तसे नाही. देशातील पाच-दहा टक्के लोकांकडे ९० टक्के संपत्ती आहे, तर ९० टक्के लोकांकडे दहा टक्के संपत्ती आहे. गरीब माणूस कितीही गरीब असला, तरी तो करांच्या जाळ्यातच जगत असतो. फूटपाथवर त्यानं दहा रुपयांचा चहा घेतला काय, भूक लागली म्हणून पावाचा तुकडा घेतला काय किंवा डोके दुखतेय म्हणून टी.व्ही.वरची जाहिरात पाहून रुपयाची गोळी घेतली काय, तो कराच्या जाळ्यात अडकतोच अडकतो. जीएसटी कुणालाही सोडत नाही. स्मशानात अंत्यसंस्काराच्या वेळी आणि माणसाच्या जन्मावेळीही हा कर हजर असतोच. जीएसटी जेवढा टाटाला, तेवढाच भिकाऱ्यालाही असतो. कायद्यासमोर सर्व समान. अशा वेळी आपल्या मदतीला म्हणजे सरकार चालवणाऱ्यांच्या मदतीला येतो. प्रश्न आहे, की कराच्या ओझ्याखाली दबून माणूस एक दिवस असहाय्य होतो. संघटित मध्यमवर्गाला त्याची झळ बसू नये म्हणून त्याची पगारवाढ केली जाते. त्याला काही सवलती दिल्या



जातात. आयकराचा सापळा थोडा संकुचित केला जातो. ज्यांच्याकडे आयकरच नव्हे, तर शे-दोनशेची पाणीपट्टी भरायलाही पैसे नसतात, त्यानं काय करायचं? त्याला बजेटमध्ये मान टेकवण्यासाठी पोकळी नसतेच. कोणतीही व्यवस्था स्वतःच्या बाजारासाठी आणि अर्थातच सुरक्षिततेसाठी एक नवा मध्यमवर्ग बनवत असते. बांडगुळ किंवा बोन्साय बनवलेला हा वर्ग भांडवलशाहीच्या रक्षणाची, तिच्या विकासाची जबाबदारी घेतो. त्या बदल्यात त्याला शायनिंग मारण्यासाठी बऱ्यापैकी पगार मिळतो. उदा. निवृत्त झालेल्या प्राध्यापकांना किंवा बड्या बाबूंना महिन्याला दीड-दोन लाख रुपये पेन्शन मिळते. दारिद्र्यात खितपत पडलेल्या माणसाला एवढे उत्पन्न मिळवण्यासाठी चार-पाच वर्षे राबावे लागते. लोटक्यात लोळणारा भारत इंडिया बनून शायनिंग मारायला लागतो आणि उतरंडीच्या ओझ्याखाली दडपलेला वर्ग रिकाम्या थाळ्या घेऊन सरकारच्या दारासमोर उभा राहतो. पूर्वी तो पाटील-देशमुख यांच्या वाड्यासमोर उभा राहायचा. थाळी तीच आहे, ती ठेवण्याची जागा फक्त बदलली आहे. केवळ कर वाढवून रुपयाला सतत फुगवता येणार नाही. कृत्रिमरित्या फुगवला जाणारा फुगा कधी ना कधी फुटतोच. स्वतःच्या उत्पन्नाचे जे मार्ग होते, ज्या व्यवस्था होत्या, त्या सर्व सरकारने

टाटा, अंबानी आणि अदानी आदींना विकून टाकल्या आहेत. सर्वात मोठा श्रीमंत कोण, अशी त्यांच्यात चढाओढ सुरू आहे, तर देश गरिबांच्या यादीत कोलमडतो आहे. काही वेळा विकासाची सूज घेऊन तो श्रीमंत राष्ट्रांच्या यादीत घुसू पाहतो; पण तेथे थप्पड बसली की मागे फिरतो. अर्थसंकल्प सादर करताना तो बाळसेदार व्हावा, येणाऱ्या निवडणुकीत तो मतपेट्या भरभरून देणारा ठरावा, यासाठी कृत्रिम प्रोटिन्स वापरून किंवा ५६ व्या वर्षी 'पठाण'मध्ये शाहरूख खानने जशी खोटी बॉडी बनवून सहाशे कोटींचा गल्ला जमवला, तसं काही तरी आपलं अर्थकारण करत असतं. याही वेळी तसंच झालंय.

दिसायला टेरिकॉट वाटावा असा अर्थसंकल्प आहे. प्रत्यक्षात तो कॉटन असल्याचा अनुभव वापरल्यावर येतो. फार तर आपण मांजरपाठ असं म्हणू शकतो. मांजरपाठ म्हणजे मॅन्चेस्टरमध्ये तयार झालेलं कापड. जाडे-भरडे, नीळ घातल्यावर चकाकणारे. आपल्याकडील अडाणी आणि गरिबांना 'मॅन्चेस्टर' हे नाव उच्चारता यायचं नाही म्हणून त्यांनी त्याला नाव दिलं मांजरपाठ! तसंच साड्यांचं. आपला अर्थसंकल्प म्हणजे दिसायला पैठणी आणि वापरायला नऊ वारी भरडी लुगडे. कोल्हापूर जिल्ह्यात भरडेवाडी येथे असं गरीब महिलांसाठी भरडी लुगडं तयार व्हायचं. जनता सरकारच्या राजवटीत असंच लुगडं आणि धोतर रेशनकार्डावर चार-पाच रुपयांना मिळायचं. आम्ही नागरिकांच्या लज्जा रक्षणासाठी काहीही करू, तिजोरी रिकामी करू, असा गाजावाजा करत जनता सरकारने तेव्हा लुगडे-धोतराची जोडी जणू काही मोफत वाटली होती. तेव्हा आणि आता एका प्रश्नाचा विचार कोणतेही सरकार करत नाही आणि तो म्हणजे अशी वेळ नागरिकांवर का येते? ती संपवायची कशी? नव्या अर्थसंकल्पात ऐंशी कोटी नागरिकांना आणखी वर्षभर म्हणजे अर्थातच आगामी लोकसभा निवडणुका संपेपर्यंत घरपोच मोफत धान्य दिले जाणार आहे. आता प्रश्न असा आहे, की ज्या देशात ऐंशी कोटी लोकांना मोफत धान्य घेऊन जगण्याची वेळ येते, हे कोणते चांगले लक्षण आहे? ऐंशी कोटी लोक गरीब आहेत, हे मान्य केल्यावर मग आपला देश विश्वगुरू, विश्वनेता कसा बनणार आहे? कोणता भूप्रदेश शायनिंग मारतोय? कोणते सरकार सूजीचे रुपांतर बाळशात करून राजकारण करते आहे, हेही समजून घेतले पाहिजे. अर्थात, जे धान्य मोफत द्यायचे ते इथल्याच शेतकऱ्यांनी तयार केलेले असते. जे ऐंशी कोटींना जगवण्याची हमी घेतात आणि घेत आलेले आहेत, त्यातलेच अनेक शेतकरी शेती परवडत नाही म्हणून आत्महत्या करतात. गेल्या वीस वर्षांत आत्महत्या झाली नाही, असा दिवस उगवलेला नाही. आत्महत्या एक दाहक वास्तव असतानाही सारी शेती नव्या भांडवलशाहीच्या जबड्यात देत आहे. शेतीचे कंपनीकरण झाले, तर शेतकऱ्याला भरपूर पैसे मिळतील, असं सांगितलं जात आहे. दुसरीकडे, नवी भांडवलशाही कधी एकदा शेती आपल्या गळाला लागेल यासाठी सारे देव पाण्यात घालून बसली आहे.

आपला अर्थसंकल्प गरीब नव्हे, तर भांडवलधार्जिणा आहे असे कोणी म्हटल्यास त्याला राष्ट्रद्रोही म्हणता कामा नये. कारण राष्ट्र आणि गरीब जनतेसाठी त्यात नावापुरते आणि भांडवलशाहीसाठी गलेलठ्ठ होण्यासारखे आहे. सरकार सार्वजनिक क्षेत्रातून निवृत्त होत असल्यामुळे जे काही महाकाय प्रकल्प तयार होतात, ते भांडवलशाहीच्या हातात जातात. रस्ते असोत, विमानतळे असोत, रेल्वे असो. लोकांच्या नावाने घोषणा करायची आणि भांडवलशाहीने पिळवणूक करत या सेवा द्यायच्या, असा हा मामला आहे. राज्यघटनेने कबुल केलेले लोककल्याणकारी राष्ट्र, राज्यघटनेने केलेली समाजवाद आणि समतेची घोषणा, या साऱ्यांच्या मानगुटीवर बसून भांडवलशाही मुसंडी मारते आहे. लोक पाहताहेत. त्यांचे प्राधान्यक्रम बदलले गेले आहेत. जे घर मागतील त्यांच्यासाठी मंदिर, जे पाणी मागतील त्यांच्यासाठी तीर्थ, जे मनगटासाठी काम मागतील त्यांच्यासाठी थाळ्या, जे सरकारी रस्ता मागतील त्यांच्यासाठी टोलवाला सुंदर रस्ता, जे औषधे मागतील त्यांना मेडिक्लेम घेण्याची सक्ती, जे शिक्षण मागतील त्यांना खिचडी आणि चड्डीवाले शिक्षण, असा एक नवा पसारा गेल्या वीस वर्षांपासून मांडला गेला आहे आणि बहुरूप्याप्रमाणे रोज वेषभूषा बदलत जगणाऱ्या मोदी सरकारने त्याच्यावर कळस चढवला आहे. त्यांचा पक्षच शेठजी आणि भटजीचा आहे. याशिवाय ते दुसरे काही करू शकतील, असे वाटत नाही. एकीकडे त्यांना सनातन आणि जीर्ण धर्म हवाय आणि दुसरीकडे, 'कर लो दुनिया मुठ्ठी में' असं सांगणारं नवं तंत्रज्ञानही हवंय.

कोणताही देश तरुणांच्या खांद्यावर उभा असतो असं म्हणतात आणि त्यात खोटे काहीच नाहीय. आपल्याकडील तरुण बेकारी आणि स्पर्धेत घालून भरडला जातोय. बेकारी किती वाढतेय हे समजून घ्यायचं असेल, तर शिपायाच्या पाच जागांसाठी पाच हजार पोरं रांगेत कशी थांबतात, हे पहायला हवं. काही जण रांगेत थांबून, परीक्षा देऊन एजबार होतात, काही गुन्हेगारी जगाकडे वळतात, तर काही आत्महत्या करतात. स्पर्धा सर्वांसाठी खुली आहे; पण ती जिंकण्याची क्षमता खूप कमी जणांकडे आहे. एक मोठा गाळ तयार होतोय आणि त्याला स्किल इंडिया, सर्व्हिस सेक्टर असं गोंडस नाव दिलं जातय. जो मध्यमवर्गीय आहे, त्याला परदेशात जाण्यासाठी फेलोशिप आणि जो गाळात अडकलाय त्याच्या हातात पक्कड-पाना! आहे की नाही गंमत. नोकऱ्या देण्याची क्षमता सरकारमध्ये राहिलेली नाही. कारण त्यासाठीचे नियोजन त्याच्या अर्थसंकल्पात नाही आणि वर्तनातही नाही. बेकारांचा उद्रेक होऊ नये, म्हणून आता त्यांच्यासाठी भत्ता सुरू होणार आहे. तोही खूप कमी पोरांना. हे जे काही भत्ते असतात, ते फक्त श्वास रोखून ठेवण्यासाठी, तग धरून जगण्यासाठी असतात. एका वाक्यात सांगायचं असेल, तर शेळीच्या शेपटासारखे असतात. शेपूट हे भत्त्यापेक्षाही आखूड असते. ढुंगण झाकता येत नाही किंवा ढुंगणावरची माशीही हुसकता येत नाही. तरुणांना नोकरी हवी; पण त्यांना आता भत्ता घेऊन ओठ ओले करावे लागणार. ज्येष्ठांना शेवटचे श्वास आनंदात घालवण्यासाठी व्यवस्था हवीय; पण त्यांना बचतीची मर्यादा वाढवून देण्यात आली आहे. जगणं मागावं, तर मोफत अंत्यसंस्काराची घोषणा... जगभर सारं असंच चालू आहे आणि त्यात मते खेचू पाहणारा अर्थसंकल्प आला आहे. तो काही निर्माण करू शकत नाही, नेहमीप्रमाणे भ्रम निर्माण करू शकतो. पूर्वी त्यासाठी जादूगार असायचा, आता जादूगारीन आहे. एवढाच काय तो फरक! ●●●

# अमृत कालातल्या चिखलातून नेमके काय उगवेल ?

सुरेश भटेवरा

**जानेवारीतल्या दोन स्फोटक घटनांनी मोदी सरकारला मोठा झटका दिला आहे. राहुल गांधींच्या पदयात्रेमुळे काँग्रेसच नव्हे, तर सामान्य जनतेतही आशादायक उत्साह संचारला आहे. मोदींना आणि त्यांच्या समर्थकांना अभिप्रेत असलेल्या 'अमृतकालात' अर्थकारणाचा आणि राजकारणाचा चिखल कोणी तयार केला, ते सर्वसामान्य जनता ओळखून आहे. त्याचे शिंतोडे उडणारच आहेत. त्यांना ते लखलाभ होवोत. भाजपच्या अभेद्य तटबंदीचे बुरुज हळूहळू ढासळायला सुरुवात झाली आहे.**

देशाचे राजकारण, अर्थकारण ढवळून काढणाऱ्या तीन लक्षवेधी घटना, जानेवारी २३ च्या अखेरच्या सप्ताहात घडल्या. गुजरातमध्ये २००२ साली भीषण नरसंहार झाला. त्या घटनाक्रमाचे तपशीलवार विच्छेदन करणारी INDIA : THE MODI QUESTION ही दोन भागातली चित्रफित (Documentary) लंडनच्या बीबीसीने थेट समाजमाध्यमांवर प्रक्षेपित केली. दुसरी घटना अमेरिकेतल्या हिंडेनबर्ग रिसर्च कंपनीने, पंतप्रधान मोदींचे निकटवर्ती मित्र, अदानी उद्योग समूहाचे अध्वर्यू गौतम अदानी यांच्या राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या आर्थिक गैरव्यवहारांवर प्रकाशझोत टाकणारा १०६ पानांचा शोध अहवाल प्रकाशित केला. तिसरी घटना श्रीनगरमध्ये ३०/३१ जानेवारी रोजी काँग्रेस नेते राहुल गांधींच्या ३,५०० कि.मी. अंतराच्या 'भारत जोडो यात्रेची' अत्यंत उत्साहात सांगता झाली. अवघ्या दहा दिवसांत या तीन घटना घडल्या. परस्परांशी त्यांचा संबंध नसला, तरी पहिल्या दोन घटनांचा संबंध, थेट पंतप्रधान मोदींच्या एककल्ली राजकारणाशी आहे. तिसऱ्या घटनेत (कोणी मानो अथवा न मानो), राहुल गांधींच्या राजकीय नेतृत्वाला नवे तेज, नवी झळाळी प्राप्त झाल्याचे जाणवते आहे.



**बीबीसीच्या चित्रफिती**

गोध्रा रेल्वेस्थानकावर फेब्रुवारी २००२ मध्ये साबरमती एक्सप्रेसला लागलेली (की लावलेली) आग भडकली. त्यानंतर लगेच गुजरातचा नरसंहार नियोजनपूर्वक घडवला गेला. २००० पेक्षा जास्त लोकांचा त्यात बळी गेला. दोन दशके उलटून गेली, तरी हा नरसंहार देशातली सर्वसामान्य जनता विसरलेली नाही. मोदी त्यावेळी गुजरातचे मुख्यमंत्री होते. संसदेत तत्कालीन विरोधी पक्षांनी गुजरात नरसंहाराबाबत निंदाव्यंजक प्रस्ताव मांडला. लोकसभेत पंतप्रधान वाजपेयींच्या उपस्थितीत, ३० एप्रिल २००२ रोजी या प्रस्तावावर सलग १९ तास (दुपारी ११ ते दुसऱ्या दिवशी पहाटे ६ वाजेपर्यंत) चर्चा झाली. प्रस्तावावर मतदान घेण्याऐवजी, साऱ्या सभागृहाचा प्रस्ताव म्हणून तो मंजूर करा, अशी सूचना चर्चेच्या अखेरीला पंतप्रधानांनी केली. याच सुमारास मुख्यमंत्री मोदींना राजधर्माचे पालन करण्याचा जाहीर सल्लाही वाजपेयींनी दिला. (अर्थात, त्यांनी तो कितपत मानला, याची जाणीव साऱ्या देशाला आहे). कालांतराने गुजरात विधानसभेची निवडणूक झाली. धार्मिक उन्मादावर स्वार झालेली ही निवडणूक मोदींनी जिंकली खरी; पण देशभर भाजपची नाचक्की झाली. परिणामी २००४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपचा देशव्यापी पराभव झाला. केंद्रीय सत्तेतून वाजपेयी सरकार पायउतार झाले. कितीही टाळण्याचा प्रयत्न केला, तरी मोदींच्या मानगुटीवरून या भीषण नरसंहाराचे भूत अजून उतरलेले नाही. बीबीसी लंडनने याच विषयाशी संबंधित दोन चित्रफिती, समाजमाध्यमांवर दाखल केल्याबरोबर, मोदी सरकार आणि त्यांच्या समर्थकांमध्ये प्रचंड हलकल्लोळ उडाला.

गुजरात नरसंहाराविषयी बीबीसीने १७ आणि २६ जानेवारीला दोन चित्रफिती सादर केल्या. समाजमाध्यमांवरील या चित्रफितींना भारत

सरकारने ब्लॉक केल्यामुळे फार थोड्या लोकांना त्या पाहता आल्या. योगायोगाने विख्यात लेखक, समाजशास्त्रज्ञ व आयआयटी मुंबईशी संलग्न बायोमेडिकल इंजिनिअरिंगचे निवृत्त प्रा. राम पुनियानी यांनी फेसबुक लिंकवर चित्रफितीचा पहिला भाग पाहिला. या चित्रफितीचा सारांश कथन करणारी विशेष मुलाखत पुनियानी यांनी 'आंबेडकरनामा युट्यूब चॅनल'चे पत्रकार रतनलाल यांना दिली. (युट्यूबवर ती उपलब्ध आहे). या मुलाखतीत प्रा. पुनियानी म्हणतात, साबरमती एक्सप्रेसला गोध्रा रेल्वे स्थानकावर जी आग लागली, त्या संबंधात एका विशिष्ट जनसमुदायाविरुद्ध बराच अपप्रचार घडवण्यात आला. प्रत्यक्षात साबरमती एक्सप्रेसच्या जळीत बोगीला बाहेरून आग लावण्यात आलीच नव्हती. गुजरातच्या फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरीने हा निष्कर्ष पूर्वीच सप्रमाण सिद्ध केला आहे. ज्या आरोपींविरुद्ध सदर प्रकरणात खटला भरण्यात आला, त्यातले प्रमुख आरोपी हाजी उमरजी यांच्यासह अन्य आरोपींना न्यायालयाने पुराव्याअभावी निर्दोष ठरवले. गोध्रा अग्निकांडात जे मृत्यूमुखी पडले, त्यांची पार्थिवे विश्व हिंदू परिषदेकडे त्यावेळी सुपूर्द केली गेली. विहिंपने या सर्वांच्या अंत्ययात्रेची मोठी मिरवणूक काढली, त्यामुळे लोकांच्या भावना भडकल्या. अग्निकांडातील पार्थिवांची अशी मिरवणूक काढू नका, असे तत्कालीन जिल्हाधिकारी जयंती रवी यांनी बजावले. मात्र जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश कोणी मानले नाही. परिणामी गुजरातमध्ये सलग तीन दिवस मोठा नरसंहार झाला. २ हजारांहून अधिक लोक त्यात मृत्यूमुखी पडले. या घटनाक्रमाच्या संदर्भात २७ फेब्रुवारी २००२ रोजी मुख्यमंत्री मोदींच्या उपस्थितीत झालेली बैठक सर्वाधिक महत्त्वाची आहे. या बैठकीला केंद्रीय मंत्री जॉर्ज फर्नांडिस यांच्यासह हरेन पंड्या, पोलीस अधिकारी संजीव भट व काही महत्त्वाच्या व्यक्ती उपस्थित होत्या. त्यात मुख्यत्वे सैन्यदलाच्या पलटणीसह गुजरातमध्ये दाखल झालेले जनरल जमिरुद्दीन शाहदेखील होते. आर्मीची पलटण घेऊन गुजरातचा नरसंहार थोपवण्यासाठीच ते दाखल झाले होते. गुजरातेत हिंसाचार भडकलेला होता. राज्य सरकारने जनरल जमिरुद्दीन यांना प्रत्यक्ष कारवाईसाठी कोणतीही मदत दिली नाही. सलग तीन दिवस त्यांना कारवाईपासून रोखले. बैठकीत मुख्यमंत्री मोदी म्हणाले, 'हिंदूंच्या भावना भडकलेल्या आहेत, त्या एकदा बाहेर पडू द्या.' एका स्टिंग ऑपरेशनमध्ये दंगलीचा आरोपी बाबू बजरंगी म्हणाला, आम्हाला फक्त तीन दिवसांची मुदत मिळाली आहे. एका विशिष्ट जनसमुदायाविरुद्ध हिंसक कृती करताना माझ्या अंगात महाराणा प्रताप संचारल्यासारखे वाटते. हरेन पंड्या गुजरात सरकारचे मंत्री होते. २७ फेब्रुवारीच्या बैठकीत नेमके काय झाले? मुख्यमंत्री मोदींनी 'संतप्त जमावावर कोणतीही कारवाई करू नका' असा आदेश कसा दिला? याचा सविस्तर वृत्तांत त्यांनी कथन केला. न्यायाधीकरणापुढे साक्षही दिली. पोलीस अधिकारी संजीव भट यांनी या संदर्भात प्रतिज्ञापत्रच सादर केले. दरम्यान हरेन पंड्या यांचा संशयास्पदरित्या मृत्यू झाला. भाजपचे खासदार, माजी केंद्रीय मंत्री सुब्रमण्यम स्वामी यांनी हरेन पंड्याच्या गूढ मृत्यूविषयी दाट संशय व्यक्त केला आहे. संजीव भट आणि आर.बी. श्रीकुमार आजही तुरुंगात आहेत. गुजरात नरसंहारात तीन ब्रिटिश नागरिकही ठार झाले होते. २००५ साली मोदी लंडनला गेले असताना, ब्रिटिश न्यायालयात त्यांच्याविरुद्ध दाद मागण्यात आली. मोदींविरुद्ध अटक वॉरंट जारी करा, अशी मागणी याचिकेत होती. न्यायमूर्तींनी याचिकाकर्त्यांना सुचवले, 'वॉरंट काढण्यासाठी किमान एक साक्षीदार सादर करा'. असा साक्षीदार फक्त एका दिवसात उभा करता येणे अशक्य होते. तथापि, गुजरात नरसंहाराच्या पार्श्वभूमीवर ब्रिटिश सरकार आणि अमेरिकन सरकारने मोदींना त्यांच्या देशांचा व्हिसा दीर्घकाळ नाकारला. कालांतराने मोदी पंतप्रधान झाले. हे निर्बंध त्यानंतर आपोआप रद्द झाले.

चित्रफितीचे विश्लेषण करताना, प्रा. राम पुनियानी पुढे म्हणतात, गुजरातच्या २००२ च्या नरसंहारात राज्य सरकारची भूमिका सुरुवातीपासून संशयास्पद होती. राज्य सरकारच्या दबावामुळेच सुरक्षा यंत्रणांना व सैन्यदलाला दंगलखोर जमावाला रोखता आले नाही. प्राणहानी, वित्तहानी रोखण्यात मोदी सरकार पूर्णतः अपयशी ठरले. या संपूर्ण प्रकरणात राज्य सरकारने जाणीवपूर्वक संभावित प्रेक्षकाची भूमिका घेतली. असाच निष्कर्ष यापूर्वी न्या. पी.बी.सावंत,



न्या. होस्बेट सुरेश, अरुणा राय यांच्या समितीने आपल्या अहवालात मांडला होता. साधारणतः तसेच भाष्य अधिक तपशीलवार पद्धतीने बीबीसीच्या चित्रफितीतही आहे. या चित्रफिती एकांगी नाहीत. स्वपन दासगुप्ता, निरंजन मुखोपाध्याय यांच्या भाजप व मोदींची बाजू स्पष्ट करणाऱ्या मुलाखतींचा समावेशही चित्रफितीत आहे. याचा अर्थ मोदींविरुद्ध हा एकतर्फी अपप्रचार नाही. गुजरात नरसंहारातील पीडितांच्या व्यथा, वेदना अतिशय निःपक्ष आणि संवेदनशील पद्धतीने यात चित्रबद्ध करण्यात आल्या आहेत. थोडक्यात सांगायचे, तर जगभरातल्या मानवाधिकार कार्यकर्त्यांच्या आवाजाला दुजोरा देणाऱ्याच या चित्रफिती आहेत.

व्यक्तिशः पंतप्रधान मोदी आणि त्यांच्या सरकारला या चित्रफितींनी इतके हैराण करून सोडले, की या आपत्कालिन स्थितीला हाताळण्यासाठी, तसेच भारतात कोणालाही या चित्रफिती पाहता येऊ नयेत यासाठी थेट २०२१ सालच्या इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी कायद्याचा त्यांनी आधार घेतला. पहिल्या चित्रफितीच्या लिंक्स ज्यांनी शेअर केल्या होत्या, त्यांचे अनेक युट्यूब व्हिडिओ आणि ५० पेक्षा जास्त ट्विट्स अतिशय तत्परतेने ब्लॉक करण्यात आले.

'सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार आणि विश्वसनीयतेवर या चित्रफिती म्हणजे प्रहार आहे', असा प्रचार मोदी समर्थकांनी सुरू केला. स्वतः ची प्रतिमा वाचवण्यासाठी मोदी सरकारने चालवलेली ही भयग्रस्त धावपळ इतकी केविलवाणी आहे, की जगभर ती हास्यास्पद ठरली आहे.

भारतीय राज्यघटनेने देशात प्रत्येकाला विचार स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार प्रदान केला आहे. चित्रफितींवर निर्बंध लादून सरकारने तो डावलला. साहजिकच या चित्रफितींचे जगभर सर्वांनाच आकर्षण वाटायला लागले. गुजरात नरसंहाराच्या वेळी ज्यांचा जन्मही झाला नव्हता, अथवा जे अगदीच लहान होते, त्या तरुण विद्यार्थ्यांची उत्सुकता तर शिगेला पोहोचली. दिल्ली व अन्य ठिकाणच्या विद्यार्थ्यांनी, मोठ्या स्क्रीनवर या चित्रफितींचे प्रदर्शन मांडायचे ठरवले. या प्रयोगावर प्रतिबंध लादण्यासाठी विद्यापीठांचे (मोदी समर्थक) कुलगुरू, पोलीस व अन्य शासकीय यंत्रणा झटपट कामाला लागल्या. जामिया मिलिया विद्यापीठात विद्यार्थ्यांना थोपवण्यासाठी दिल्ली पोलीस आणि रॅपिड ॲक्शन फोर्सच्या मदतीने चक्क बळाचा वापर करण्यात आला. चित्रफितींचे स्क्रिनिंग थांबवण्यासाठी जवाहरलाल नेहरू विद्यापीठात वीजपुरवठाच बंद केला गेला. सरकारचे अंकित कुलगुरू व त्यांच्या दडपणाखाली वावरणाऱ्या प्राध्यापकांनी केवळ नोकरी वाचवण्यासाठी आपण किती लाचार आणि मिंधे आहोत, याचे लाजिरवाणे प्रदर्शन घडवले. जाहीर स्क्रिनिंग करता आले नाही, तरीही चतुर विद्यार्थ्यांनी हार मानली नाही. आपापल्या लॅपटॉपवर पहिली चित्रफित त्यांनी पाहिली. त्याच्या बातम्या सर्वत्र झळकल्या. भारतात मोदी सरकारने चित्रफितींचे प्रदर्शन रोखल्याचा प्रचार जगभर झाला. जगातल्या अनेक देशांत, ज्यांनी एरव्ही त्या पाहिल्याही नसत्या, त्या सर्वांचेही त्याबाबतचे आकर्षण अनेक पटींनी वाढले. 'कोंबडे कितीही झाकले तरी सूर्य उगवायचा थोडाच राहतो' या उक्तीनुसार बंदी घालण्याचा सरकारचा पवित्रा मोदींच्या अक्षरश: अंगलट आला.

**अदानी प्रकरण**

भारताच्या पंतप्रधानपदाची शपथ घ्यायला नऊ वर्षांपूर्वी (२०१४ साली) नरेंद्र मोदी ज्या चार्टर्ड विमानातून दिल्लीच्या विमानतळावर उतरले, ते विमान मोदींचे निकटवर्ती मित्र गौतम अदानींचे होते. केंद्राची सत्ता मोदींच्या हाती येताच हे चित्र बदलले. मोदींच्या सरकारी दौऱ्यात पंतप्रधानांच्या सरकारी विमानातून जगातल्या अनेक देशांत आता अदानी बिनदिक्कत हिंडू लागले. या दौऱ्यांपाठोपाठ देशोदेशीची अनेक कंत्राटे अदानींच्या कंपन्यांना मिळू लागली. केंद्रातले यूपीए सरकार २०१४ साली पायउतार झाले, त्यावेळी अदानींचे 'उद्योग' गुजरातपुरते सीमित होते. त्यांची एकूण संपत्ती साधारणतः ४५ ते ५० हजार कोटींच्या दरम्यान होती. यूपीए सरकार सत्तेवर असताना, सेबीच्या चौकशीनंतर अदानींच्या वडीलबंधूंना मनी लॉड्रिंग प्रकरणी दोनदा अटक झाली होती. मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर या चौकशीची प्रगती थंडावली. न्यायाधिकरणाने त्यांना क्लीन चीट दिली. पंतप्रधान मोदी आणि भारत सरकारच्या मेहेरबानीमुळे गेल्या नऊ वर्षांत अदानींच्या संपत्तीने अक्षरशः लाखो कोटींची माया प्राप्त केली. भारतीय बँकांनी तसेच आयुर्विमा महामंडळाने हजारो कोटी रुपये कर्जाद्वारे अथवा गुंतवणुकीच्या स्वरूपात अदनींच्या कंपन्यांमध्ये उदारहस्ते ओतले. जगातल्या श्रीमंतांच्या यादीत अदानी तिसऱ्या तर भारतात पहिल्या क्रमांकावर आले. २०२० पासून कोविड महासाथीच्या संकटाने साऱ्या जगाला ग्रासले होते. साऱ्याच कंपन्यांचे कामकाज लॉकडाऊनमुळे थंडावले होते. कंपन्यांच्या आर्थिक प्रगतीचा आलेख सर्वत्र खालावत होता. याच संकटकाळात अदानींची संपत्ती मात्र वेगाने घोडदौड करीत होती. कोविड महासाथ सुरू होण्यापूर्वी अदानींच्या ज्या समभागांचे बाजारमूल्य अवघे १३० रुपये होते, कोविड काळात ते चक्क ४००० रुपयांवर गेले. जगभर समृद्ध कंपन्यांची आर्थिक पीछेहाट सुरू असताना उत्पादन क्षेत्रात अदानींनी असा कोणता पराक्रम केला, की त्यांच्या समभागांचे बाजारमूल्य अनेक पटींनी वाढले?

मोदी सरकारच्या ९ वर्षांच्या कारकीर्दीत, विशेषतः २०१९ नंतर भारतात असे कोणतेही क्षेत्र उरले नाही, की जिथे अदानींच्या खाजगी कंपन्यांनी शिरकाव केला नाही. देशातली महत्त्वाची विमानतळे, बंदरे, ग्रीन हाइड्रोजन, स्टील, ॲल्युमिनियम आणि कॉपर रिफायनरीज, ग्रीन एनर्जी, सिमेंट उद्योग, कोळसा व आयर्नओर खाणी, थर्मल पॉवर, मुंबईतील धारावी वस्तीची पुनर्निर्मिती, NDTV वृत्तवाहिनीचे मालकी हक्क, अशा साऱ्याच क्षेत्रांची सूत्रे अदानी यांच्या हाती बहाल करण्यात आली. इतकेच नव्हे, तर पंतप्रधान मोदींची भक्कम साथ असल्यामुळे श्रीलंका, बांगला देश, फ्रान्स, अबुधाबी, मॉरिशस, दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया, इस्त्रायल, स्वित्झर्लंड अशा अनेक देशांमध्ये विविध कंत्राटे अदानींना मिळत गेली. तुफान वेगाने त्यांच्या कंपन्यांचा आंतरराष्ट्रीय कार्यविस्तार झाला. भारतातल्याच नव्हे, तर जगातल्या कोणत्याही कंपन्यांची प्रगती इतक्या अल्पावधीत झाल्याचे कोणी पाहिले नव्हते. मोदींच्या छत्रछायेत अदानी उद्योग दिवसेंदिवस बहरतो आहे, शानदार आर्थिक प्रगती करतो आहे, असे भ्रामक चित्र पद्धतशीरपणे उभे करण्यात आले. साहजिकच जगातल्या आणि भारतातल्या बँका, वित्तीय संस्था व आयुर्विमा महामंडळाने उदारहस्ते अदानींच्या उद्योगांकडे आर्थिक मदतीचा ओघ वळवला. स्टेट बँक ऑफ इंडियाने अदानींना आजवर २७ हजार कोटींचे सहाय्य्य केले. त्यात आणखी भर घालून ५५ हजार कोटींपर्यंत आर्थिक सहाय्य्य देण्याचा प्रस्ताव बँकेकडे मंजूर आहे. आयुर्विमा महामंडळाने आत्तापर्यंत ३५ हजार ९१७ कोटी रुपये अदानींच्या उद्योगात गुंतवलेत. अदानींच्या विविध कंपन्यांवर आजमितीला सुमारे २ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक कर्ज आहे. सार्वजनिक बँका असो, की आयुर्विमा महामंडळ यांनी अदानींना कर्जरूपाने दिलेला सारा पैसा, मूलतः देशातल्या सर्वसामान्य जनतेचा आहे. आपल्याच अधिपत्याखालील परदेशी शेल कंपन्यांमार्फत आपल्याच कंपन्यांमधे गुंतवणूक करायची, समभागांचे ओव्हर व्हॅल्यूएशन घडवायचे आणि जो अवास्तव नफा होईल, त्यातून कर्जाच्या परतफेडीचे खोटे चित्र निर्माण करीत श्रीमंती वाढवायची, हा खेळ गौतम अदानी अतिशय बिनधास्तपणे खेळत आले आहेत. त्याचे तपशीलवार संशोधन करून सविस्तर विश्लेषण युट्यूबवर अनेक नामवंत अर्थतज्ज्ञ व दिग्गज पत्रकारांनी प्रत्यक्ष मुलाखतींद्वारे मांडले आहे. (युट्यूबवर विपुल प्रमाणात ते उपलब्ध आहेत).

राजसत्तेच्या आश्रयाखाली अदानी यांनी आपल्या उद्योगांचा फुगवलेला अवास्तव फुगा कधीतरी फुटणारच होता. अमेरिकेच्या हिंडेनबर्ग रिसर्च कंपनीने २४ जानेवारी २०२३ रोजी अदानी उद्योग समूहाचे तपशीलवार विच्छेदन करणारा १०६ पानांचा शोध अहवाल जगासमोर सादर केला. हा अहवाल सलग २ वर्षे अथक परिश्रम करून हिंडेनबर्गचे संचालक नेथन नेथ अँडरसन यांनी तयार केला आहे. ते स्वतः CFA म्हणजे चार्टर्ड फायनान्शियल अॅनालिस्ट आहेत. कॉर्पोरेट क्षेत्रात समभाग व भांडवल संपत्तीचे ओव्हर व्हॅल्युएशन करून आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या कंपन्यांचे घोटाळे ते उघडकीला आणतात. या धाडसी प्रयोगात मोठा आर्थिक धोका पत्करतात व अशा कंपन्यांच्या समभागांचे शॉर्ट सेलिंग करून त्यायोगे आपल्या कंपनीचा नफाही वाढवतात. गुंतवणूकदारांच्या भल्यासाठी असे गौप्यस्फोट आपण घडवतो, असा त्यांचा दावा आहे. हिंडेनबर्गने आजवर १६ आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे गैरव्यवहार उघडकीला आणले आहेत. त्यांच्या प्रत्येक अहवालानंतर संबंधित कंपन्यांचे बाजारमूल्य लक्षणीय प्रमाणात घसरले, हे त्यांचे आजवरचे ट्रॅक रेकॉर्ड आहे. अँडरसन यांनी अदानी उद्योग समूहाच्या गैरव्यवहारांचे विच्छेदन करताना आपल्या अहवालात, समभाग मूल्यांची हेराफेरी, अकाऊंटिंग घोटाळे, भ्रष्टाचार, प्रामाणिक करदात्यांच्या निधीची चोरी, ऑफशोअर शेल कंपन्यांमार्फत मनी लॉड्रिंग असे विविध आरोप अदानी उद्योगावर केले आहेत. अनेक प्रश्न विचारले आहेत. अँडरसन यांचा शोध अहवाल ३२ हजार शब्दांचा आहे. त्याचे खंडन करण्यासाठी अदानी समूहाने ४१३ पानांचे उत्तर सादर केले. 'हिंडेनबर्ग कंपनीवर मानहानी आणि नुकसानभरपाईचा खटला भरू' असा इशाराही अदानी समूहाने दिला. त्यावर 'अवश्य खटला भरा, अद्याप दडलेले सत्य त्यातून जगासमोर येईल' असे विनाविलंब प्रत्युत्तर अँडरसन यांनी दिले. आपल्या सविस्तर खुलाशात हिंडेनबर्ग अहवालाला मुद्देसूद व चोख उत्तरे देण्याऐवजी, अदानी समूहाने 'हा भारतावर हल्ला आहे. असा कांगावा केला. आरोप अदानींवर व त्यांच्या कंपन्यांवर आहेत, मग अदानी भारत कधीपासून झाले? हिंडेनबर्ग अहवाल जाहीर झाल्यानंतर अदानी उद्योगाची भांडवली बाजारात अवघ्या पाच दिवसांत तुफान वेगाने घसरण झाली. असे म्हणतात, की जवळपास १० लाख कोटींचे नुकसान झाले. अदानी कंपन्यांचे ४६ लाख भागधारकही त्यात भरडले गेले. जागतिक स्तरावर इतक्या मोठ्या प्रमाणात घडामोडी घडत असताना देशात कंपन्यांचे आर्थिक नियमन करणाऱ्या यंत्रणा सेबी, ईडी, सक्तवसुली संचालनालय, सीबीआय इत्यादींचे सारे अधिकारी गप्प आहेत. ते कोणाच्या दबावाखाली आहेत? अदानी कंपनीची अधिकृतरित्या कोणतीही चौकशी सुरू झालेली नाही. आंतरराष्ट्रीय स्तरावर मात्र भारत सरकारची प्रतिष्ठा संशयास्पद ठरली आहे.

भारताच्या सरकारी यंत्रणा कधी चौकशी करतात, त्यातून नेमके काय निष्पन्न होते, याची वाट न पाहता आंतरराष्ट्रीय बँका आणि शेअर बाजारांनी हिंडेनबर्ग अहवालाची अतिशय गांभीर्याने दखल घेतली आहे. अमेरिकन शेअर बाजार डाऊ जोन्सने आपल्या सस्टेनेबल इंडेक्समधून अदानींचे समभाग हद्दपार केले आहेत. अदानींचे समभाग यापुढे कोणालाही तिथे खरेदी करता येणार नाहीत, असा त्याचा अर्थ. अदानींच्या गैरव्यवहारांची संशयास्पद स्थिती पाहून इंग्लंडची स्टॅण्डर्ड चार्टर्ड बँक, स्वित्झर्लंडची क्रेडिट स्वीस बँक, अमेरिकेची सिटी बँक, नॉरजियन फंड, डाऊची बँक या सर्वांनी अदानी उद्योगाचे बॉण्ड्स अथवा समभाग यापुढे कर्जासाठी तारण म्हणून स्वीकारणार नाही, असे स्पष्ट केले आहे. बांगला देश व श्रीलंका सरकारने अदानी कंपनीबरोबरच्या वीजपुरवठा कराराचा पुनर्विचार सुरू केला आहे. फ्रान्सच्या टोटल एनर्जी कंपनीने अदानी समूहाच्या प्रस्तावित हायड्रोजन प्रकल्पातील गुंतवणूक रोखली आहे. पत्याचा बंगला कोसळावा, तशी अदानी उद्योगाची स्थिती आहे. परिणामी मोदी सरकारचे धाबे दणाणले आहे. संयुक्त संसदीय समिती (जेपीसी) तर्फे अदानींच्या गैरव्यवहारांची चौकशी झाली पाहिजे, अशी विरोधकांची मागणी आहे. पंतप्रधान मोदी जेपीसीची मागणी टाळू इच्छितात. कारण खुद्द पंतप्रधानांची विश्वासार्हता आणि कोसळत्या अर्थकारणाचे अनेक नवे प्रश्न, त्यातून सरकारसमोर उभे राहतील. 'भारत जोडो' यात्रेची सांगता करून राहुल गांधी नुकतेच संसदेत परतले. अदानी प्रकरणावर सविस्तर चर्चा संसदेत झाली पाहिजे, अशी त्यांची मागणी आहे. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावाच्या चर्चेत बोलताना राहुलनी पंतप्रधान आणि केंद्र सरकारवर घणाघाती हल्ला चढवला. प्रत्युत्तर देताना मोदींनी नेहमीप्रमाणे अत्यंत नाट्यपूर्ण अभिनिवेशात, उलटच्या आरोपांचा भडीमार केला. राहुलनी उपस्थित केलेल्या एकाही प्रश्नाचे उत्तर मात्र त्यात नव्हते. पंतप्रधान बिथरले आहेत, त्यांचा तोल ढळतो आहे, याचे दर्शन मात्र साऱ्या जगाला घडले.

'भारत जोडो' यात्रेबद्दल गेल्या पाच महिन्यांत बरेच काही बोलले व लिहिले गेले आहे. सप्टेंबर महिन्यात कन्याकुमारीपासून सुरू झालेल्या या यात्रेने मजल दरमजल करीत श्रीनगरच्या लाल चौकापर्यंत ३,५०० कि.मी. अंतर कापले. दक्षिणेपासून उत्तरेपर्यंत विविध राज्यांमध्ये ऊन, पाऊस, थंडी, गारठ्याची पर्वा न करता राहुलनी तरुण, तरुणी, शेतकरी, कामगार, महिला, आदिवासी, दलित, अल्पसंख्य, बेरोजगार, अशा विविध स्तरातल्या जनतेशी मुक्त संवाद साधला. प्रत्येक राज्यात लक्षावधी लोक स्वयंस्फूर्तीने यात्रेत सहभागी झाले. राहुलनी आस्थेने त्यांची विचारपूस केली. लहान-मोठ्या अनेक पत्रपरिषदा व जाहीर सभांनाही संबोधित केले. 'भारत जोडो' यात्रा अनेक अर्थांनी संस्मरणीय ठरली आहे.

जानेवारीतल्या दोन स्फोटक घटनांनी मोदी सरकारला मोठा झटका दिला आहे. राहुल गांधींच्या पदयात्रेमुळे काँग्रेसच नव्हे, तर सामान्य जनतेतही आशादायक उत्साह संचारला आहे. मोदींना आणि त्यांच्या समर्थकांना अभिप्रेत असलेल्या 'अमृतकालात' अर्थकारणाचा आणि राजकारणाचा चिखल कोणी तयार केला, ते सर्वसामान्य जनता ओळखून आहे. त्याचे शिंतोडे उडणारच आहेत. त्यांना ते लखलाभ होवोत. भाजपच्या अभेद्य तटबंदीचे बुरुज हळूहळू ढासळायला सुरुवात झाली आहे. लोकसभेची निवडणूक पुढल्या वर्षी आहे. उर्वरित १४ महिन्यांत मोदी सरकारला प्रखर अग्निपरीक्षेला सामोरे जावेच लागणार आहे. ●●●

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार व लेखक आहेत.)**

# लोकसभा २४ :

# उलटी मोजणी सुरू




**अनंत बागाईतकर**

**गरिबांना अनुकूल अशा धोरणांच्या नावाखाली उद्योग-व्यावसायिकांना अनुकूल अशा 'सप्लाय-साईड' म्हणजेच पुरवठ्यावर आधारित धोरणांचा पाठपुरावा सरकारतर्फे केला जात आहे. उपेक्षित वर्गांना मोफत धान्य, स्वयंपाकाचा गॅस, शेतकऱ्यांना रोख मदत इत्यादी इत्यादी दिले जात आहे. उपेक्षितांबद्दल काळजी किंवा चिंता वाहण्याची ही रणनीती राजकीयदृष्ट्या यशस्वी ठरली आहे. प्रत्यक्षात यातून निर्माण होणारी वाढती विषमता आणि त्रास यामुळे उपेक्षित वर्गाला मिळणाऱ्या सवलतींपेक्षा त्यांचे होणारे नुकसान अनेकपटीने अधिक आहे.**

वर्तमान लोकसभेची आणि केंद्र सरकारची पाच वर्षांची मुदत २०२४ मध्ये संपत आहे. वेळापत्रकानुसार, पुढील वर्षी मार्च महिन्यापर्यंत या निवडणुकीची घोषणा व पुढील प्रक्रिया सुरू झालेली असेल. ती बाब लक्षात घेता नुकताच सादर केलेला केंद्रीय अर्थसंकल्प (२०२३-२४) हा या निवडणुकीच्या दिशेने सुरू झालेल्या वाटचालीचा प्रारंभ मानावा लागेल. कारण स्पष्ट आहे. या सरकारचा हा शेवटचा अर्थसंकल्प आहे. कारण पुढील वर्षी त्यांना हंगामी अर्थसंकल्प किंवा लेखानुदान मांडून लोकसभा निवडणुकीला सामोरे जावे लागणार आहे. अर्थात, वर्तमान राज्यकर्ते हे लोकशाही संकेत फारसे जुमानत नसल्याने निवडणुकीपूर्वी ते कोणत्याही सवलत, योजना जाहीर करू शकतात, तो भाग वेगळा आहे; परंतु ताज्या अर्थसंकल्पा (२०२३-२४) द्वारे राज्यकर्त्यांनी त्यांच्या आगामी आर्थिक वर्षातील आर्थिक कार्यक्रम देशासमोर सादर केला आहे. लोकसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन त्याची मांडणी केली जाणे अपेक्षित होते. अर्थसंकल्पाची प्रशंसा करताना पंतप्रधान साहेबांनी मध्यमवर्गाचा विशेषत्वाने व वारंवार उल्लेख केला. तो साहजिकच होता. कारण या देशातील एक-तृतीयांश वर्गाचा त्यात समावेश होतो. नवश्रीमंतीकडे झुकलेला, चंगळवादी असे या नवमध्यमवर्गाचे वर्णन करावे लागेल. प्रवाहाबरोबरच राहण्यात धन्यता मानणारा हा वर्ग असतो. १९९१ मध्ये नरसिंह राव-मनमोहनसिंग यांनी देशात लागू केलेल्या उदार आर्थिक सुधारणांची फळे चाखणारा हा वर्ग आहे; परंतु त्याबद्दल कृतज्ञता न बाळगता प्रतारणा करणारा हा अत्यंत संधीसाधू समाज आहे. त्यामुळेच इतरांच्या खांद्यावर उभे राहून स्वतःला उंच दाखविणारे नेते जसे संधीसाधू असतात, तसाच हा अत्यंत स्वार्थी असा वर्ग असतो. त्यामुळेच अशा वर्गाला लुभावण्याचे, त्याला गोंजारण्याचे काम तसेच संधीसाधू नेते करीत असतात आणि हा वर्गही त्या संधीसाधू नेत्यांच्या मागे जात राहतो, हे ओघाने आलेच.

**...ते षड्यंत्र समजून घेण्याची वेळ आली आहे**



मध्यमवर्गाला या अर्थसंकल्पात सवलतींच्या मधाचे फक्त बोट चाटविण्यात आले आहे. त्यामध्येच हा वर्ग खूष होणार असेल, तर त्यांच्या संकुचित वृत्तीबद्दल अधिक टिप्पणी न केलेली बरी. कारण प्राप्तीकरातील काही सवलती वगळता या मध्यमवर्गाला इतर काहीही सवलती मिळालेल्या नाहीत. याचे कारण महागाई, पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या किमती, स्वयंपाकाच्या गॅसच्या वाढत्या किमती या मूलभूत महत्त्वाच्या अशा कोणत्याही गोष्टींमध्ये सवलती मिळालेल्या नाहीत. दैनंदिन जीवनावश्यक वस्तुंची महागाई कमी करण्याबाबत अर्थसंकल्पात कोणतेही मार्गदर्शन आढळत नाही. त्यामुळेच केवळ वरवर थातूरमातूर सवलती देण्याचा देखावा करून एका हाताने काहीतरी दिल्यासारखे दाखवून दुसऱ्या हाताने त्या काढून घेण्याची चलाखी या अर्थसंकल्पात जागोजागी आढळते. याचे अगदी ताजे उदाहरण देता येण्यासारखे आहे. अर्थसंकल्पातील आकडेवारीनुसार

(त्याचा तपशील पुढे दिलेला आहे) सरकारने खतांवरील सबसिडी कमी केलेली आहे. यामुळे खते महाग होणे अपरिहार्य आहे आणि शेतकऱ्याला धान्योत्पादनासाठी लागणाऱ्या अनिवार्य गोष्टींपैकी ही एक असल्याने त्याचा धान्योत्पादनाचा खर्च वाढणार आहे आणि परिणामी धान्याच्या किमतीही वाढू शकतात. आता हे सर्व जनतेला १ फेब्रुवारी रोजी सादर केल्यानंतर दहा दिवसांनी सरकारी गोटातून मिळालेल्या माहितीत असे म्हटले आहे, की खत-उत्पादनासाठी जो गॅस किंवा नैसर्गिक वायू लागतो त्याच्या किमती कमी करून खतांवरील सबसिडीचा फटका शेतकऱ्यांना बसणार याबाबत सरकार विचार करीत आहे. याचा दुसरा अर्थ असा, की यामुळे स्वयंपाकाचा गॅस स्वस्त होण्याची शक्यता नाही व उलट त्यातील वाढीची शक्यता नाकारता येणार नाही. आता पंतप्रधान साहेबांवर खूष असलेल्या मध्यमवर्गाने या त्यांच्यावर पडणाऱ्या बोजाबद्दलही टाळ्या वाजवून त्याचा स्वीकार करावा! थोडक्यात, हा हातचलाखीचा आणि देखावेबाज (ज्याबद्दल काही नेते सुप्रसिध्द आहेत) अर्थसंकल्प आहे. मध्यमवर्गाचा उदोउदो (शाब्दिक) करतानाच समाजातील उपेक्षित वर्गाला (ज्याला इंग्रजीत मार्जिनल म्हणतात) मात्र या अर्थसंकल्पाने उपेक्षितच ठेवलेले आहे. पंतप्रधान साहेब हे नेहमी आर्थिकदृष्ट्या कमजोर व दुर्बळ समाजघटकांना सबळ करण्याची भाषा बोलत असतात; परंतु रोजगारनिर्मितीचे व्यापक उपाय न करता केवळ बड्या भांडवलदार व गुंतवणूकदारांच्या हिताचा विचार करताना आणि तो दोषारोप किंवा ठपका टाळण्यासाठी या उपेक्षितांना मोफत धान्ययोजना देत असल्याचा बडेजाव मिरविला जात आहे. हा प्रकारदेखील अत्यंत कुटिल आहे. कारण या समाजाला सरकारच्या दयेवर कायमस्वरुपी परावलंबी करून ठेवायचे, त्यांना आर्थिकदृष्ट्या सबल व स्वतंत्र होण्याची संधी नाकारणे आणि त्याचबरोबर मोफत धान्याचे तुटपुंजे तुकडे फेकून बाकीच्या उदरनिर्वाहासाठी त्यांना महाग वस्तू खरेदी करायला लावून आणखी दरिद्री करून ठेवायचे, असे हे तिहेरी कारस्थान आहे. हा पर्दाफाश करण्याची आणि ते षड्यंत्र समजून घेण्याची वेळ आली आहे. गरीब, उपेक्षित वर्गाला हा प्रकार नीटपणे समजून घेण्याची वेळ आली आहे.

अर्थमंत्र्यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात अर्थसंकल्पाचा(२०२३-२४) भर कशावर आहे याची माहिती दिली. त्यांच्या भाषणाच्या पहिल्या भागात समाजातील बहुतेक सर्व वर्गांसाठी काही ना काही देण्यात आलेले आहे. ते लक्षात घेता, हा प्रथमदर्शनी समतोल असल्याचा भास निर्माण करणारा अर्थसंकल्प वाटतो. समतोल, सर्वसमावेशक आणि सर्वांची काळजी घेणारा अर्थसंकल्प असे चित्र त्यातून निर्माण होते. उपेक्षित वर्ग- शेतकरी, महिला, दलित, आदिवासी, कामगार, ज्येष्ठ नागरिक, अतिलघु, लघु, मध्यम उद्योग यांच्यासाठी या अर्थसंकल्पात काही ना काही घोषणा करण्यात आली आहे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून (सादर अर्थसंकल्पांमधील) घोषणा लक्षात घेतल्या, तर आतापर्यंत देशात कोणतीच समस्या शिल्लक रहायला नको होती.

समस्या नुसत्या अस्तित्वात आहेत अशी स्थिती नाही, तर त्या वाढत चाललेल्या आहेत आणि विशेषतः उपेक्षित वर्गांसाठी त्या वाढताना दिसतात. बेकारी वाढत आहेच; परंतु विशेषत्वाने महिला




आणि युवकांच्या दृष्टीने ती गंभीर झालेली आहे. हा मुख्यतः शेतीच्या क्षेत्रातील समस्यांचा थेट परिणाम आहे. त्याचप्रमाणे अतिलघु आणि लघु उद्योगांनाही ज्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे, त्याचाही परिणाम होत आहे. महागाईदर चढा असल्याने उपेक्षितांची क्रयशक्ती कमी झालेली आहे. विषमता वाढत चाललेली आहे. गेल्या वर्षभरात आयात-निर्यातीतील तफावत व परकी गंगाजळीबद्दल समस्या निर्माण झाल्या आहेत. परकी चलनसाठा खालावला असून रुपया कमकुवत झाला आहे.

सर्वसामान्यजनांच्या मुद्यांना अल्प प्राधान्य दिल्याने त्यांच्या मूलभूत समस्या टिकून आहेत. सत्तारूढ पक्षातर्फे त्यांना आर्थिक मदत करणाऱ्यांच्या हितांना प्राधान्य देण्याच्या धोरणांचा हा परिणाम आहे. त्यामुळे सत्तारूढ पक्षाचे हित कशात आहे हे समजून घ्यावे लागेल. त्यामुळे गरिबांचा कळवळा असल्याचे एकीकडे दाखवत असतानाच आणि अर्थमंत्र्यांच्या भाषणाच्या पहिल्या भागात ज्या काही घोषणा करण्यात आल्या आहेत, त्यातून सरकारचे खरे हेतू लपविण्यात आले आहेत.

**हा मोठा योजनाबद्ध कार्यक्रम होता**

गरिबांना अनुकूल अशा धोरणांच्या नावाखाली उद्योग-व्यावसायिकांना अनुकूल अशा 'सप्लाय-साईड' म्हणजेच पुरवठ्यावर आधारित धोरणांचा पाठपुरावा सरकारतर्फे केला जात आहे. उपेक्षित वर्गांना मोफत धान्य, स्वयंपाकाचा गॅस, शेतकऱ्यांना रोख मदत इ. इ. दिले जात आहे. उपेक्षितांबद्दल काळजी किंवा चिंता वाहण्याची ही रणनीती राजकीयदृष्ट्या यशस्वी ठरली आहे. प्रत्यक्षात यातून निर्माण होणारी वाढती विषमता आणि त्रास यामुळे उपेक्षित वर्गाला मिळणाऱ्या सवलतींपेक्षा त्यांचे होणारे नुकसान अनेकपटीने अधिक आहे.

उपेक्षित वर्ग हा मुख्यतः असंघटित क्षेत्रात समाविष्ट होतो. असंघटित क्षेत्रात ९४ टक्के रोजगार आहेत आणि तेथेच सर्वाधिक लोक काम करतात, हे नमूद करणे योग्य ठरेल. सरकारच्या धोरणांचा त्यांना फार मोठा तडाखा बसलेला आहे. सर्वप्रथम नोव्हेंबर-२०१६

मधील नोटबंदी, त्यानंतर सदोष पद्धतीने अमलात आणली गेलेली जीएसटी प्रणाली (२०१७), २०१८ मधील बिगरबँकिंग वित्तीय संस्थांमधील पेचप्रसंग, डिजिटलीकरणाची सक्ती, अर्थव्यवस्थेचे अधिकृतीकरण (फॉर्मलायझेशन) करण्याचा अट्टाहास आणि २०२० मधील कोरोनाप्रणित लॉकडाऊन. हे एकापाठोपाठ करण्यात आलेले धोरणात्मक निर्णय हे संघटित क्षेत्रातील उद्योग-व्यवसायांना बळकट करण्याचा मोठा योजनाबद्ध कार्यक्रम होता.

असंघटित क्षेत्राच्या घसरणीमुळे किंवा त्यात आलेल्या खालावलेपणामुळे २०१६ पासून त्यांच्याद्वारे निर्माण होणारे लाखो-करोडो रुपयांचे उत्पन्न नष्ट झाले. सरकारने त्यांना विविध योजनांखाली केलेल्या मदतीच्या तुलनेत त्यांचे झालेले नुकसान कित्येक पटीने जास्त होते. याचे कारण त्यांचे अस्तित्व अगदी काठावरचे (आर्थिकदृष्ट्या) असते आणि कोरोना साथीच्या वेळी ते विशेषत्वाने प्रकाशात आले. आता या असंघटित क्षेत्रात काम करणारे कष्टकरी कायमस्वरुपी सरकारी आश्रयावर परावलंबी झालेले आहेत. सत्तारूढ पक्ष आणि सरकारतर्फे या वर्गाला सतत त्यांच्या या परावलंबित्वाची जाणीव करून दिली जात असते, ज्यामुळे ते सत्तारूढ पक्षाला राजकीयदृष्ट्या बांधील राहतील. सत्तारूढ पक्षाच्या दावणीला या उपेक्षित वर्गाला कायमस्वरुपी बांधण्याची ही हेतूपुरस्सर राणनीती आहे.

**देशातील शेतकऱ्याचे दररोजचे उत्पन्न फक्त २७ रुपये!**

या अर्थसंकल्पात फूड सबसिडीमध्ये कपात करण्यात आली आहे. २०२२-२३ मध्ये फूड सबसिडी २ लाख ८७ हजार १९४ कोटी रुपये होती. आता २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात ती कमी करून १ लाख ९७ हजार ३५० कोटी रुपयांपर्यंत खाली आणली आहे. खतांवरील सबसिडीही कमी केलेली आहे. २०२२-२३ मध्ये ती २ लाख २५ हजार २२० कोटी रुपये होती. ती कमी करून २०२३-२४ मध्ये १ लाख ७५ हजार १०० कोटी रुपये करण्यात आली आहे. ज्यावेळी देशातील गरिबी टिकून असताना आणि सरकारला ८० कोटी गरिबांना मोफत अन्नधान्य द्यावे लागत असताना, सरकारतर्फे ही कपात केलेली आहे, हे येथे लक्षात घ्यावे लागेल. फूड सबसिडी किंवा अन्नावरील सबसिडी कमी करण्याचा अर्थ हा, की गरिबांनादेखील त्यांची गरज भागविण्यासाठी जेव्हा बाजारात जाऊन अन्नधान्य खरेदी कारवे लागेल, ते त्यांना महाग किमतीने खरेदी करावे लागणार आहे. त्यामुळे त्यांची गरिबी कमी होण्याऐवजी वाढणार आहे. आजही आपल्या देशात गरीब शेतकऱ्यांची संख्या अधिक आहे. खतांवरील सबसिडी कमी करण्याचा सर्वाधिक फटका त्या गरीब शेतकऱ्यांना बसणार आहे. त्याचप्रमाणे खतांवरील सब्सिडी कमी केल्यामुळे शेतीसाठी लागणाऱ्या अनिवार्य खर्चात (इनपुट कॉस्ट) वाढ होणार आहे. देशातील शेतकऱ्याचे दररोजचे उत्पन्न फक्त २७ रुपये इतकेच आहे. हे उत्पन्न गरिबीरेषेखाली येणारे आहे.

**या उद्दिष्टांपासून भारत अद्याप फार दूर आहे**

बहुआयामी गरिबी निर्देशांकाचे दोन महत्त्वाचे घटक असणाऱ्या शिक्षण व आरोग्य क्षेत्रासाठीच्या तरतुदीतही कपात करण्यात आली आहे. २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी असलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा प्रत्यक्षात त्यावर खर्च करण्यात आलेली रक्कम कमी



असल्याचे सुधारित अंदाजातून स्पष्ट झाले आहे. हे असाधारण नाही. अर्थसंकल्पात तरतूद मोठी दाखवायची आणि प्रत्यक्षात खर्च मात्र कमी करायचा, ही पद्धत चालूच असते. शिक्षणावर सहा टक्के आणि आरोग्यावर तीन टक्के खर्च करण्याच्या उद्दिष्टांपासून भारत अद्याप फार दूर आहे. योजनाबद्ध खर्चानुसार या दोन क्षेत्रांसाठी २०२३-२४ मध्ये करण्यात येणाऱ्या खर्चाची रक्कम वाढीव दिसत असली, तरी जीडीपीमधील किंचितशा वाढीपेक्षा कमीच आहे. याचा अर्थ, जीडीपीमध्ये वाढ झाली तरी त्या प्रमाणात शिक्षण व आरोग्यासाठीच्या तरतुदीत वाढ होणार नसल्याने त्यांचा एकूण जीडीपीमधील वाटा कमीच राहील.

राष्ट्रीय शिक्षण मोहिमेसाठी ३९ हजार ५३३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. प्रत्यक्षात ३२ हजार ६१२ कोटी रुपयेच खर्च करण्यात आले. आता २०२३-२४ मध्ये ३८ हजार ९५३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. म्हणजेच या तरतुदीत प्रत्यक्ष स्वरुपात कपात किंवा घटच झालेली आहे. राष्ट्रीय आरोग्य मोहिमेसाठी ३७ हजार १६० कोटी रुपयांची तरतूद होती आणि २०२२-२३ वर्षाअखेर खर्च झालेली रक्कम ३३ हजार ७०८ कोटी रुपये आहे. आता २०२३-२४ साठी ३६ हजार ७८५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पुन्हा या महत्त्वाच्या क्षेत्रातील तरतुदीत घट आहे.

शहरी भागांच्या तुलनेत पायाभूत सुविधांमध्ये तसेच कमी उत्पन्न असलेल्या ग्रामीण भागांसाठी मोठ्या प्रमाणात खर्च करण्याची आवश्यकता आहे. २०२२-२३ या आर्थिक वर्षाअखेर या क्षेत्रावरील खर्च सुमारे २ लाख ४३ हजार ३१७ कोटी रुपये होणे अपेक्षित असताना २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात या क्षेत्रासाठी २ लाख ३८ हजार २०४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. म्हणजेच २०२२-२३ च्या तुलनेत ही रक्कम कमी आहे आणि चलनवाढीच्या संदर्भात ती विचारात घेतल्यास ती आणखी कमी झालेली आढळेल. ग्रामीण विकासासाठी (जीडीपीच्या) पाच टक्के तरतूद आहे; पण ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण ७० टक्के आहे, ही विसंगतीही येथे लक्षात घ्यावी लागेल.

**महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेत कमी तरतूद**

बेकारी ही देशापुढील सर्वात मोठी समस्या आहे. या आघाडीवर काय केले जात आहे? ग्रामीण भागात रोजगार निर्माण करण्यासाठीची

महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना असून तिच्यासाठी या अर्थसंकल्पात साठ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. २०२२-२३ या आर्थिक वर्षात या योजनेवरील खर्च ८९ हजार ४०० कोटी रुपयांपर्यंत जाणे अपेक्षित असताना एवढ्या कमी रकमेची तरतूद करण्याचे कारण अनाकलनीय आहे. यासंदर्भात सरकारतर्फे असा दावा करण्यात आला, की ही योजना ही मुख्यतः कामाच्या मागणीनुसार आहे. जर या योजनेखालील कामांसाठीची मागणी वाढल्यास त्यासाठीच्या तरतुदीतही वाढ केली जाईल; परंतु लोकांनी या योजनेखाली कामाची मागणी केली आणि त्यांचे वेतन देण्यासाठी सरकारकडे पैशाची तरतूदच नसेल आणि त्यामुळे लोकांना कामही दिले जाणार नाही किंवा एखाद्या परिस्थितीत काम केल्यानंतर त्यांना वेतन देण्यासाठी सरकारकडे पैसे नसतील, तर अशा स्थितीत काय करायचे याचे उत्तर मिळत नाही. या योजनेत एका कुटुंबातील एका व्यक्तीला किमान शंभर दिवसांचा रोजगार मिळू शकतो. याबाबतच्या आकडेवारीवर नजर टाकली असता, कष्टकऱ्यांना सरासरी केवळ ४३ ते ५५ दिवसांसाठीच काम मिळू शकते, अशी परिस्थिती आढळून येते.

अधिकृतपणे असे सांगितले जात आहे, की प्रधानमंत्री आवास(गृह) योजनेसाठीच्या तरतुदीत मोठी वाढ करण्यात आली आहे. ४८,००० कोटी रुपयांवरून (२०२२-२३) ७९,५९० कोटी रुपये (२०२३-२४) वाढविण्यात आले आहेत. याचा अर्थ लोकांना काम उपलब्ध राहील; परंतु ग्रामीण रोजगार हमी योजनेखालील (मनरेगा) कामे मात्र कमी झालेली असतील. २०२१-२२ मध्ये या योजनेवरील खर्च ९० हजार वीस कोटी रुपये इतका होता; पण २०२२-२३ मध्ये त्यात मोठी कपात करून तरतूद ४८ हजार कोटी रुपयांपर्यंत कमी करण्यात आली असताना प्रत्यक्ष खर्च मात्र ७७ हजार १३० कोटी रुपये इतका झाला होता. आता त्यात वाढ करून तो ७९,५९० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. चलनवाढीच्या संदर्भात विचार केल्यास ही तरतूद कमीच आहे. त्यामुळे २०२३-२४ मध्ये या योजनेखाली कामांची अधिक निर्मिती अजिबात शक्य नाही. म्हणूनच राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेवरील तरतुदीत कपात करणे योग्य ठरणार नाही.

भांडवली खर्चात मोठी वाढ करण्यात आल्याचा गाजावाजा केला जात आहे. गेल्या वर्षी ७.५ लाख कोटी रुपयांची तरतूद असलेल्या या क्षेत्रासाठी या अर्थसंकल्पात दहा लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या वाढीमुळे मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होईल, असा दावा करण्यात येत आहे; परंतु ही तरतूद प्रामुख्याने महाभांडवली (कॅपिटल इन्टेन्सिव्ह) संघटित क्षेत्रातील म्हणजेच रस्तेबांधणी, रेल्वेमार्गनिर्मिती, वीजनिर्मिती अशा क्षेत्रांसाठी असेल. या क्षेत्रात थेट रोजगारनिर्मिती (डायरेक्ट जॉब्ज) किंवा नोकऱ्या कमी प्रमाणात निर्माण होतील.

थोडक्यात, मनरेगा हा रोजगारनिर्मितीचा एक मोठा व प्रमुख उपाय आहे आणि या योजनेवरील तरतुदीत मोठी कपात केल्यामुळे रोजगारासाठी ग्रामीण भागातून कष्टकऱ्यांना पुन्हा शहरांकडे जावे लागेल. परिणामी उद्योगांना आणि शहरी अभिजन वर्गाला स्वस्तात कष्टकऱ्यांची उपलब्धता होईल. यामुळे रोजंदारी वेतन किंवा या



उपेक्षित व गरिबांना मिळणाऱ्या वेतनातही घट होऊ शकते. हे स्थलांतरित म्हणजे बेकारांच्या टोळ्या होतील आणि त्यांची रास्त वेतनाची मागणी करण्याची क्षमताच (बार्गेनिंग) यामुळे संपुष्टात येणार आहे.

२०२२-२३ मध्ये करसंकलन उच्चांकी होते. जीएसटी, इन्कम टॅक्स(प्राप्तीकर) आणि कॉर्पोरेशन टॅक्सद्वारे झालेले करसंकलन म्हणजेच मिळकत, ठरविलेल्या उद्दिष्टापेक्षा अधिक होती. हे सर्व कर संघटित क्षेत्राने भरलेले होते, असंघटित क्षेत्राने नव्हे. करसंकलन व त्यातून झालेली वाढीव मिळकत लक्षात घेता संघटित क्षेत्र किती चांगल्या रितीने काम करीत आहे, स्पष्ट करणारी ही बाब ठरली. याबाबतच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास असंघटित क्षेत्राच्या घसरणीचा हा परिणाम होता. असंघटित क्षेत्राच्या जिवावर संघटित क्षेत्राची भरभराट होत आहे, असे हे चित्र आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतील हा खरा पेचप्रसंग आहे.

प्राप्तीकरदात्यांना जाहीर करण्यात आलेल्या सवलतींचा लाभ सधन-समृध्द वर्गाला अधिक होणार आहे. देशातील प्रत्यक्ष प्राप्तीकरदात्यांची संख्या दीड कोटी आहे. ते या सवलतींचे लाभार्थी असतील. बारकाईने पाहिल्यास या वर्गाला आणखी सवलतींची गरज नाही. संघटित क्षेत्रातील वेतनवाढीचा लाभ त्यांना मिळत होता, खेरीज शेअर बाजारातील चढत्या किमतींचाही लाभ त्यांनाच मिळत होता. मध्यमवर्ग हा प्रत्यक्ष करापेक्षा अप्रत्यक्ष कर अधिक भरत असतो. असंघटित क्षेत्रातील माणसेही अप्रत्यक्ष कर भरतच असतात आणि त्यात त्यांना सवलत नसते. तसे असते, तर उपेक्षित आणि मध्यमवर्ग या दोघांनाही त्याचा लाभ मिळू शकला असता.

२०२३-२४ चा अर्थसंकल्प हा पुरवठा (म्हणजेच सप्लाय साईड) हा घटक आधारभूत धरून तयार करण्यात आलेला आहे. त्याचा फायदा उद्योग-व्यवसाय, संघटित क्षेत्र यांना होणार आहे. असंघटित क्षेत्राला यासाठी किंमत मोजावी लागत आहे. या रणनीतीची अन्य कारणे राजकीय आहेत. उपेक्षित वर्गाला कायमस्वरुपी सरकारवर परावलंबी ठेवणे म्हणजेच सरकारशी त्यांनी कायम शरणागत रहावे, सरकारी मदतीवरच कायम अवलंबून रहावे हे त्यामागील खरे हेतू आहेत. यामुळे मंदावलेली विकासवाढ (ग्रोथ), बेकारी आणि गरिबी या अर्थव्यवस्थेसमोरील अडचणी व समस्या कायम राहतील.

●●●

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार व विश्लेषक आहेत.)**

# काँग्रेसच्या उदरातून उजव्यांचा जन्म



प्रा. जयदेव डोळे

**नकार व उजवा विचार यांची फार अतूट अशी साथ असते. काहीही नवे, वेगळे, चाकोरीबाह्य करायचे म्हटले, की उजव्यांची कुरकुर सुरू. आपले सुस्थापित जग डळमळेल, असे भय त्यांना कायम वाटत असेल. कारण तमाम उजव्यांना जगरहाटीमध्येच वाव असतो आणि तिथेच ते सत्ता गाजवतात. बदल करू असे म्हणायचा अवकाश, की उजवे दचकलेच समजा.**

राजकारणात सध्या अचानक उगवलेले डावे, उजवे हे जुने विचारदर्शक शब्द मूळचे एका बैठक व्यवस्थेमधले आहेत. १७८९ साली फ्रान्समध्ये दुसरी क्रांती झाली. या राज्यक्रांतीनंतर फ्रान्सच्या संसदेत कोणी कोठे बसायचे, हे ठरले. सभापतींच्या उजव्या हाताला कोण व डाव्या हाताला कोण, असा एक ढोबळ फरक करण्यात आला. त्याला अर्थात 'वैचारिक बैठक' होतीच. साधारणपणे डाव्या हाताला क्रांतिकारक अथवा क्रांतीचे प्रणेते बसत आणि उजव्या हाताला क्रांतिविरोधक म्हणजे जे होते ते बदलायला नको, असे म्हणणारे प्रतिक्रियावादी. या वैचारिक भेदांमधूनच अतिडावे, मध्यममार्गी उजवे, कडवे उजवे, उदारमतवादी डावे इत्यादी छटा उत्पन्न झाल्या. प्रगती अथवा परिवर्तन पाहणारे ते डावे आणि त्यांना विरोध करीत प्रस्थापित व्यवस्था टिकवू पाहणारे ते उजवे, अशी व्याख्या त्या शतकापासून रुजली ती अजूनही वापरली जाते. या दोन बाजूंच्या निमित्ताने राजकीय तत्त्वज्ञान, धोरणे, कार्यक्रम, जनाधार आदींची विभागणी केली जाते, ती अशी :

**उजवे डावे**

राजेशाही, सरंजामशाही, अभिजनवादी, हुकूमशाही लोकशाही, समता, बंधुता, सामाजिक न्याय खाजगीकरण, बाजारकेंद्री सार्वजनिक क्षेत्र, कल्याणकारी अर्थव्यवस्था व्यक्तीकेंद्री, स्वार्थी समाजवादी, लोकहितवादी धर्म, परंपरा धर्मनिरपेक्षता, विज्ञानवादी राष्ट्रवादी जय जगत, मानवतावादी भूतकाळ, इतिहासकेंद्री पुरोगामी, परिवर्तवादी अस्मिता, वंश, वर्ण, जाती आदींचा अभिमान सर्वभेद मिरवू पाहणारे पुरुषसत्ताक स्त्रीमुक्ती सेन्सॉरशिप, निर्बंध अभिव्यक्ती स्वातंत्र्य पुनरुज्जीवनवादी नवता, बदल करकपात, संपत्तीनिर्मिती करांच्या बाजूचे, संपत्ती वितरण किमान सरकारीकरण सरकारी आधार, सवलती बलप्रयोग, दांडगाई, युद्ध सहमती, सहिष्णुता, शांती गेल्या दोन शतकांतली ही वैचारिक भिन्नता असल्यामुळे त्यात डाव्यांनी चीन व रशिया येथे केलेले बदल आणि उजव्यांनी स्वीकारलेल्या काही दुरुस्त्या यांचा समावेश केलेला नाही. तरीही चालू शतकात उजव्या विचारांची सरकारे बहुसंख्य देशात आरुढ असून त्यांनी ढोबळमानाने याच तत्त्वाचा अंमल आपल्या कारभारात केलेला आढळतो.

उजव्या विचारधारेला कॉन्झर्व्हेटिव्ह अर्थात पुराणमतवादी, प्रस्थापित, जैसे थेवादी असेही संबोधले जाते. इंग्लंडमध्ये याच नावाचा पक्ष सत्तेत असून त्याचे मराठी भाषांतर हुजूर पक्ष असे करतात. लेबर पक्षाचा मजूर असा अनुवाद असल्याची ही प्रतिक्रिया; परंतु तो योग्य






शब्द आहे. अमेरिकेत रिपब्लिकन पक्ष उजव्या विचारांचा गणला जात असला, तरी डेमॉक्रॅटिक पक्ष डावा नाही. तो लोकशाहीनिष्ठ, पुरोगामी, सहिष्णू, वंशवादविरोधी आहे. समाजवाद, साम्यवाद यांची लागण त्यालाही नको आहे.

**काँग्रेसची धोरणे आणि कार्यक्रम सकारात्मक**

भारतात सर्वाधिक काळ सत्तेवर राहिलेला काँग्रेस पक्ष ना डावा, ना उजवा राहिला. तो सर्वसमावेशक आहे. मात्र राज्यघटनेमधल्या तत्त्वांच्या विरोधात तो जात नाही. १९९१ च्या जागतिकीकरणाच्या स्वीकृतीनंतर काँग्रेस पक्षाची उघडपणे वाटचाल सुरू झाली. त्यामुळे भाजप व काँग्रेस यांच्यात कोण अधिक उजवा, अशी तुलना करायची झाल्यास फक्त दोन-चार मुद्दे दोघांना वेगळे ठरवतात. ते म्हणजे धर्माचे राजकारण, राष्ट्रवाद आणि हल्लेखोर-हिंसक वृत्ती. स्त्रिया व अल्पसंख्याक, दलित व आदिवासी, स्थलांतरित व परदेशी

आदी घटकांबाबतही काँग्रेसची धोरणे आणि कार्यक्रम सकारात्मक असतात.

**उजवा विचार आपोआपच बळकट होत गेला**

काँग्रेसने खाजगीकरण व उदारीकरण धडाक्यात आरंभल्यामुळे उजवा विचार आपोआपच बळकट होत गेला. देशाला आज भेडसावणारे सर्व धार्मिक, वांशिक, जातीय आदी सामाजिक प्रश्न काँग्रेसच्या काळात निर्माण झाले. डाव्या विचारांना व पक्षांना आधार देणारे अनेक कायदे, घटनात्मक तरतुदी आणि राजकीय प्रथा, संकेत काँग्रेसने निष्प्रभ केले. बव्हंश घडामोडी खुल्या बाजारात आणून सोडल्या. तंत्रज्ञानाचा वापर लोकांत रुजवला. सरकार अनेक क्षेत्रे रिकामे करीत चालू लागले. व्यापार, नफा, स्पर्धा, व्यक्तीकेंद्रीतता, स्वार्थ, चैन व चंगळ, श्रीमंती, गुंतवणूक, आयात-निर्यात, इंग्रजी भाषा, मनोरंजन, अत्याधुनिक जीवनशैली, कला व क्रीडा यांचे व्यापारीकरण, अशी अनेक परिवर्तने २००४ ते २०१४ या काँग्रेसच्या सत्ताकाळात भारतात घडली. भांडवलदार, उद्योगपती, मध्यमवर्ग, बडे शेतकरी, सावकार अशांना हा बदल भलताच रुचला. त्यांना आक्षेप कशाबद्दल नव्हता. भारतीय जनता पक्ष अथवा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांनाही हे सारे हवेच होते. एक प्रचंड नवमध्यमवर्ग उजवा होऊ लागला होता.

पण या साऱ्या घडामोडी आणखी वेगाने घडाव्यात आणि समाजवादाची उरलीसुरली धोरणे मातीमोल करावीत, या हेतूने अधीर झालेल्या नवमध्यमवर्गाला भाजपने चेतवले आणि सत्ता मिळवली. कशाच्या बळावर? भ्रष्टाचार या कधीच नष्ट न होणाऱ्या प्रश्नावर आणि हिंदुत्वाच्या निरनिराळ्या काल्पनिक आविष्कारावर. महत्त्वाचे म्हणजे, आक्रमक व असहिष्णू नेतृत्वाला खंबीर, ठाम, कठोर कार्यक्रम या कोंदणात बसवून ते स्वीकारायला लावले.

जागतिकीकरणामुळे स्थानिक देशी संस्कृती लयाला जात असल्याची ओरड जगातल्या अनेक देशांत सुरू झाली. धर्म, परंपरा, जमाती, वंश, भाषा, संस्कृती यांवर आक्रमणे होऊ लागल्याचे कांगावे केले जाऊ लागले. बराक ओबामा, मनमोहन सिंग, लुला दा सिल्वा, ह्यूगो चावेझ, फ्रान्क्वा हॉलंदे, सद्दाम हुसेन, आँग सँग सू की आदी नेत्यांची राजवट अडचणीची असल्याची गाऱ्हाणी गायली जाऊ लागली. हा सारा उजव्या प्रतिगामी राजकीय पक्षांचा कार्यक्रम अनेक देशांत यशस्वी झाला. त्यामुळे उजवा विचार जगन्मान्य होत असल्याचा गाजावाजाही सुरू झाला.

**संघाने आपला उजवा कल कधी लपवला नव्हता**

आज उजवा विचार स्पष्टपणे भाजपमध्ये दिसतो. जनसंघ असे पक्षाचे नाव असताना संघ परिवाराने आपला उजवा कल कधी लपवला नव्हता. भाजपला सत्ता मिळेल, मात्र कोण्यातरी पक्षाचा आधार घेऊनच. जो पक्ष संपूर्ण डावा नसे, मात्र तो काँग्रेसविरोधक म्हणून भाजपजवळ जाई. त्यामुळे भाजपची व संघाची फार अडचण होई. या पक्षासोबतच्या सत्तेमुळे गरिबी, अल्पसंख्याक, बेकारी, विषमता आदी समस्यांवरची उत्तरे त्याला त्याच्या मताविरुद्ध द्यावी लागत. उदा. कामगार संघटना संप करणार म्हटले, की भाजपची नेहमी गाळण उडणार. कारण का पक्ष कायम भांडवलदार, पैसेवाले, श्रीमंत, जमीनदार, सावकार यांची बाजू मांडणारा. त्यांनीच जगवलेला. त्यामुळे आपल्या पोशिंद्यांविरुद्ध संप कसा करायचा, हा पेच त्याच्यापुढे कायम असे. त्यामुळे काही तरी फुसके कारण सांगून भाजप प्रत्यक्ष कधीही संपात वा मोर्चात उतरत नसे. मात्र डाव्या कामगार संघटनांमुळे कामगारांचे फायदे झाले की त्यांचा आपल्या कामगार संघटनेच्या सदस्यांनाही वाटा मिळेल, हे माहीत असूनही तो कधी मोठ्या मनाने डाव्यांचे आभार मानणार नाही.

सामाजिक, सांस्कृतिक बाबतीतही तसेच. पुरोगामी विचार डावे व समाजवादी पक्ष प्रत्यक्षात आणण्यासाठी सतत प्रथा, परंपरा आणि ब्राह्मण्य यांविरुद्ध संघर्ष करीत. सतीप्रथा, बालविवाह यांपासून हुंडा, शिक्षण, समता, समलिंगी नाती, अस्पृश्यता, कामाचे तास व सुरक्षितता, आरक्षणे, सवलती आदी असंख्य घडामोडींवर उपाय आणि उन्मूलन, असे दोन्ही बाजूंनी ते भिडत. निरक्षरता असो, की अंधश्रद्धा आणि वैज्ञानिक विचार असोत, की लेखन-भाषण स्वातंत्र्य, उजव्यांनी म्हणजे जनसंघ-भाजप यांनी त्यात कधीही पुढाकार घेतला नाही.

**...हे लोक त्या चळवळीत सामील का नाही झाले?**

नकार व उजवा विचार यांची फार अतूट अशी साथ असते. काहीही नवे, वेगळे, चाकोरीबाह्य करायचे म्हटले, की उजव्यांची कुरकुर सुरू. आपले सुस्थापित जग डळमळेल, असे भय त्यांना कायम वाटत असेल. कारण तमाम उजव्यांना जगरहाटीमध्येच वाव असतो आणि तिथेच ते सत्ता गाजवतात. बदल करू असे म्हणायचा अवकाश, की उजवे दचकलेच समजा. भाजप आणि संघवाले आज साम्राज्यवादी म्हणून ब्रिटिशांची हेटाळणी जरूर करतात. मात्र ज्यावेळी या साम्राज्यवाद्यांना देश सोडायला गांधी व काँग्रेसवाले बजावत होते, तेव्हा हे लोक त्या चळवळीत सामील का नाही झाले? त्याचे कारणे भीती आणि डाव अशी दोन्ही होती. सवर्णांच्या हातात शिक्षणाचे म्हणजे ज्ञानाचे हत्यार असल्याने त्या आधारावर त्यांना ब्रिटिशकाळात नोकऱ्या व अन्य उद्योगधंदे प्राप्त होत होते. तर दुसरीकडे शिक्षण सर्वजातीयांना खुले केल्याने ब्रिटिशांबद्दल आपुलकी बाळगणारा बहुजन समाज आपल्याविरुद्ध बंड करील, ही भीतीही होती. याच सनातनी वर्गाने महर्षी शिंदे, महर्षी कर्वे यांना क्वचितच प्रोत्साहन दिले. त्यामुळे आगरकर, आंबेडकर यांच्या पाठीशी मूठभर ब्राह्मणच उभे राहिलेले आपल्याला दिसते. लोकमान्य टिळकांची दोन्ही मुले डॉ. आंबेडकर यांचे मित्र व सोबती होते; परंतु जातिप्रथा विध्वंसाच्या कार्यक्रमांत भाग घेतल्यामुळे श्रीधर टिळक यांच्यावर एवढा दबाव आणला गेला, की त्यांनी आत्महत्या केली. दुसरे चिरंजीव रामचंद्र हेही माघारले. अन्यथा महाराष्ट्र पुरोगामी होण्याच्या कार्यक्रमात किती तरी गती घेऊ शकला असता.

गेली आठ वर्षे अगदी उघडपणे सनातन धर्माचा उच्चार करीत भाजप आणि संघ परिवार देशावर राज्य करीत आहेत. त्यांच्या काळात भारताचे पुरोगामी, परिवर्तनवादी समाजकारण थांबले. उजव्यांना प्राप्त झालेली सत्ता तसे करणार, हे अपेक्षित होतेच; पण त्यांना इतका चेव येईल, असे वाटले नव्हते. पुनरुज्जीवनवादाचा त्यांचा कार्यक्रम रावणाच्या दहा तोडांनी बोलू लागला अन् भारत सावध झाला. ●●●

**(लेखक ज्येष्ठ माध्यमतज्ज्ञ आहेत.)**


# आता साहित्यिकांची संमेलने कशासाठी व्हावीत...?



डॉ. यशवंत मनोहर

**साहित्यिकांनी अमुक देवीची, अमुक शक्तीची आराधना करावी असे संमेलनाने सांगू नये. माणसांचे सर्व प्रकारचे परावलंबन संपेल, असे भान या संमेलनांनी जागवावे. माणूसच त्याच्या अर्थवत्तेचा निर्माता आहे. या माणसांच्या प्रज्ञेशिवाय आणि प्रतिभेशिवाय माणसांना सर्जनशील करणारे जगात काहीही नाही, हे संमेलनाने लोकांना सांगावे. छळ सोसत वैज्ञानिकांनी शोध लावले, त्यामुळे निर्माण झालेल्या सोयीसुविधांचा लाभ घेणारी माणसे विज्ञाननिष्ठ न होता दैववादीच का राहून जातात, या प्रश्नाचे उत्तर संमेलनांनी लोकांना ऐकवावे.**

मुळात साहित्यिकांच्या संमेलनाला ग्रंथकार संमेलन असेच नाव होते. हे संमेलन मराठी ग्रंथोत्तेजक मंडळीने १९७८ साली भरवले होते. नवीन ग्रंथ लिहिणाऱ्या लेखकांचा आणि इतर भाषांमधील ग्रंथ मराठीत आणणाऱ्या अनुवादकांचा परस्पर परिचय व्हावा, तसेच ग्रंथलेखनाच्या दृष्टीने सध्या आपल्या भाषेची स्थिती कशी आहे, उत्तम ग्रंथ लेखनासाठी या भाषेला अधिक सक्षम कसे करता येईल, अशा प्रश्नांसंबंधी विचार करणे आणि मागल्या वीस वर्षांमधील मराठी साहित्याच्या स्थितीगतीचा आढावा घेणे, ही उद्दिष्टे या ग्रंथकार संमेलनाची होती. अशा प्रश्नांची चर्चा करण्यासाठी ग्रंथकारांना एकत्र आणण्याचा हा प्रस्ताव होता. या अभिजनी आयोजनात शूद्र आणि अतिशूद्र या बहुजनांच्या सामाजिक आणि वाङ्मयविषयक प्रश्नांना स्थान नसल्याने '...आता यापुढे आम्ही शूद्र लोक, आम्हास फसवून खाणाऱ्या लोकांच्या थापांवर भूलणार नाहीत. सारांश, यांच्यात मिसळल्याने आम्हा शूद्रादी अतिशूद्रांचा काही एक फायदा होणे नाही. याबद्दल आमचा आम्हीच विचार केला पाहिजे' असे सांगून जोतीराव फुल्यांनी त्या ग्रंथकार संमेलनावर बहिष्कार टाकला.



वर आलेली 'ग्रंथकार संमेलन' ही संकल्पना मला अत्यंत महत्त्वाची वाटते. म्हणून या लेखाचे शीर्षक 'आता साहित्यिकांची संमेलने कशासाठी व्हावीत...?' असे मुद्दाम ठेवलेले आहे. अधिकाधिक उत्तम साहित्य निर्मितीसाठी, खोलवर आणि जबाबदार विचारविनिमय करण्यासाठी साहित्यिकांनी एकत्र येऊन गंभीर चिंतन करावे, हा मुद्दा मला महत्त्वाचा वाटतो. संमेलनात जोतीराव फुले म्हणतात त्याप्रमाणे, बहिष्कृतांच्या मानवी प्रतिष्ठेच्या प्रश्नांना आणि वाङ्मयीन प्रश्नांना प्राथम्य असावे. म्हणजे साहित्यिकांच्या संमेलनाने आज उत्तम साहित्याची निर्मिती, उपेक्षितांच्या मानवी सन्मानाची निर्मिती आणि त्यांचे शोषणसत्ताकाच्या तत्त्वज्ञानासकट शोषणसत्ताक नाकारणारे उठाव यासाठी निर्णायक निर्वाण मांडायला हवे.

**...हे संमेलनांनी जीव ओतून सांगायला हवे**

आज ग्रंथकारांचे संमेलन 'साहित्य संमेलन' झाले आहे. मी म्हणतो हे संमेलन आता साहित्यिकांचेच संमेलन केवळ झाले नाही, तर ते वाचकांचे, श्रोत्यांचे आणि प्रेक्षकांचेही संमेलन झालेले आहे. साहित्यिक ते वाचक, श्रोते आणि प्रेक्षक असा हा संमेलनाचा विस्तार झाला आहे. एकाअर्थी हे वाङ्मयीन लोकशाहीचेच प्रारूप आहे. म्हणजे धर्मांची, जातींची, वर्णांची संमेलने भरतात ती लोकशाहीविरोधी आणि 'आम्ही सर्व इथून-तिथून भारतीय' या अखंडतेच्या आणि ऐक्यभावाच्या विरुद्धचीच संमेलने आहेत, असे म्हणता येईल. छोट्या-मोठ्या प्रमाणात का होईना; पण संमेलने वा साहित्यिकांची संमेलने भारतीय मनस्कांचीच व्हावीत, ती जाती-धर्मांची होऊ नयेत, ही विलगीकरणाची प्रक्रिया भारताच्या ऐक्याला

मोठ्या दुखापती करील. त्या त्या काळातील सर्वांच्या निकडीचे प्रश्न संमेलनांमधून चर्चेला घ्यावेत. महागाई, असहिष्णुता, भ्रष्टाचार, तरुणतरुणींमधील बेकारी आणि वैफल्य, दहशतवाद, शेतकऱ्यांनी जीव देणे, स्त्रियांवरील आणि दुर्बल घटकांवरील अत्याचार असे प्रश्न चर्चेला घ्यावेत. साहित्यिकांच्या संमेलनांनीही अशा प्रश्नांची पायाभूत पातळीवरून मांडणी करावी आणि त्या त्या ज्वलंत प्रश्नांच्या संदर्भात साहित्यासकट इतरही सर्वच कलांच्या उत्तरदायित्वाची चर्चा करावी. जीवनातील द्वंद्वांचे धगधगते रूप मांडणारे साहित्य हे कलामयही कसे होते आणि जीवनमयही कसे होते, हे संमेलनांनी जीव ओतून सांगायला हवे.

ही सर्व संमेलने प्रश्नांसाठी व्हावीत. प्रश्नांच्या नावाने व्हावीत. जाती-धर्माच्या नावाने होणारी संमेलने जाती-धर्मांना बळकट करणारीच संमेलने असतात असे सर्वांना वाटले, तर अंधश्रद्धा निर्मूलन, महागाई निर्मूलन, बेरोजगारी निर्मूलन, भ्रष्टाचार निर्मूलन, अत्याचार निर्मूलन, शोषणनिर्मूलन, असहिष्णुता आणि विषमतानिर्मूलन, हिंस्त्रप्रवृत्तीनिर्मूलन, द्वेषनिर्मूलन वा दहशतवादनिर्मूलन अशी संमेलन व्हावीत. हे सर्वच भारतीयांचे प्रश्न असतात. या प्रश्नांशी निगडित सर्वच भारतमनस्क लोकांची संमेलने व्हावीत. ती सर्वांची, सर्वांसाठी आणि सर्वांनी घेतलेली संमेलने असावीत. ती सर्वसमावेशकच, जातीविहीनच आणि धर्मनिरपेक्षच संमेलने व्हावीत. यापुढे अशी संमेलनेच नव्या भारताची आणि नव्या संविधाननिष्ठ भारतीय मनांची निर्मिती करतील.

**भारतकेंद्री आणि संविधाननीतिकेंद्री संमेलने व्हावीत**

या अर्थाने आपली संमेलने भारतीय संविधानाच्या इच्छांची आणि फुले-शाहू-आंबेडकरांच्या स्वप्नांची संमेलने व्हावीत. साहित्य संमेलनांच्या व्यतिरिक्तची इतरही सर्व संमेलने सर्वसमावेशक प्रश्नांचीच संमेलने व्हावीत. तिथे जातीधर्मविहीन आणि धर्मनिरपेक्ष मनेच संमीलित व्हावीत. ही सर्व धर्मानिरपेक्ष मने एकत्र यावीत, म्हणजे सर्वांच्याच समान हिताचा विचार करणारीच भारतीय मने एकत्र यावीत. असे झाले तर सर्वच क्षेत्रांमधील प्रश्नांच्या संदर्भात सल्लामसलतींचे रूप आपल्या संमेलनांना येईल. मग सर्वच संमेलनांचे पद्धतिशास्त्र लोकशाहीचेच पद्धतिशास्त्र ठरेल. म्हणजे भारतीय संविधानातील मूलभूत मानवी अधिकारांचे, राज्यधोरणांच्या निदेशकतत्त्वांचे आणि मूलभूत कर्तव्यांचेच ते पद्धतिशास्त्र ठरेल. अशी भारतकेंद्री आणि संविधाननीतिकेंद्री संमेलने व्हावीत. सर्वांना सममूल्यता, समान मानवी सन्मान, सर्वांना समान न्याय आणि सर्वांच्या समान माणुसकीची प्रस्थापना याहून मोठे सौंदर्य जगात कुठेही नाही. याहून महान नीती जगात कुठेही नाही आणि सलोख्याचे याहून महान स्वप्न जगाजवळ दुसरे नाही. जीवनात आणि साहित्यात याच समग्रावधानी सौंदर्याच्या निर्मितीसाठी सर्वांनी जीव ओतून निर्वाण मांडावे. हा निरोप सर्वांना कळकळीने सांगण्यासाठीच साहित्यिकांची आणि जीवनातील इतरही निकडीच्या प्रश्नांशी झुंजणाऱ्या विचारवंतांची आणि कृतिवीरांची संमेलने व्हावीत. धर्मनिरपेक्ष, जातीविहीन आणि अंधश्रद्धाविहीन साहित्यिक, वाचक, श्रोते आणि प्रेक्षकही निर्माण करणे हे या साहित्यसंमेलनांचे ध्येय असावे आणि तशीच त्यांची नियोजनेही असावीत.

**शासन म्हणजे पक्ष नव्हे किंवा पक्ष म्हणजे शासन नव्हे!**

अशा सर्वच संमेलनांना शासनाने आर्थिक मदत करावी. हा संविधाननिष्ठ भारत निर्माण करण्याचाच प्रकल्प आहे, ही शासनाची भूमिका असावी. संविधाननिष्ठ शासन या संमेलनांना आपले मित्र वाटायला हवे. शासन म्हणजे पक्ष नव्हे किंवा पक्ष म्हणजे शासन नव्हे. पक्ष येतील, जातील; पण शासन तिथेच असते. म्हणून पक्षांनी निवडणुकीचे प्रसारमाध्यम म्हणून कोणत्याही संमेलनाचा उपयोग करू नये. संविधाननिष्ठ शासनाला स्वातंत्र्य हे मूल्य मान्यच असते. आपल्याला विरोध करणाऱ्याला शासनकर्ता पक्ष मात्र स्वातंत्र्य देत नसतो. तो तो पक्ष आपल्या प्रतिनिधींना संमेलनात घुसवतो आणि संमेलनात जमलेल्या हजारो लोकांना निवडणुकीसाठी पक्षानुकूल करून घेण्याचा प्रयत्न करीत असतो. चिपळूणच्या साहित्यसंमेलनाला परशुरामाच्या निमित्ताने धार्मिक करण्याचा प्रयत्न केला गेला. एकवीस वेळा पृथ्वी निःक्षेत्रीय करणारा परशुराम कोणासाठी आदर्श होता? राजकीय पक्ष संमेलनात केवळ पक्षाचे राजकारणच घेऊन जात नाहीत, तर ते आपल्या पक्षाला उपयुक्त अशी आपली धार्मिक प्रतीकेही घेऊन जातात. यवतमाळच्या संमेलनात ख्यातकीर्त लेखिका नयनतारा सहगल यांना उद्घाटनासाठी निमंत्रित केले; पण त्या सत्ताधारी पक्षाच्या विरुद्ध बोलणार म्हणून पक्षीय राजकारणाने त्यांच्या नावाला नकार दिला. वर्ध्याच्या संमेलनासाठी अध्यक्ष म्हणून प्रा. सुरेश द्वादशीवारांचे नाव निश्चित झाले होते. ''ललित साहित्याचे बहुतांश लेखक हे उच्चवर्णीय होते. त्यामुळे त्यांच्यावर सावरकरांच्या विचारांचा प्रभाव असल्याने ते गांधीविरोधी होते.'' (लोकसत्ता ९ नोव्हेंबर, २०२२) पण ते याप्रकारे सावरकरांच्या विरोधात बोलल्यामुळे आणि गांधी, नेहरू यांच्या बाजूचे असल्यामुळे त्यांना सत्ताधारी 'पक्षाने' नाकारले. म्हणजे शासनाने नव्हे, तर एका पक्षाच्या भूमिकेने द्वादशीवारांना नाकारले. द्वादशीवारांना अध्यक्ष कराल तर अनुदान मिळणार नाही, असा फोनच वर्ध्यातील संबंधित माणसाला आला आणि त्यांचे नाव रद्द ठरवले गेले. ९ नोव्हेंबरच्या बातमीनुसार 'द्वादशीवारांचे नाव निश्चित झाले, तर सरकारकडून मदतीची अपेक्षा करू नका' असा इशारा देण्यात आला. याचा अर्थ साहित्यविश्वाने काळजीपूर्वक लक्षात घेण्याची गरज आहे. एखाद्या पक्षाला कोणीही आपल्या विरुद्ध बोलू नये असे वाटणे, हे असंविधानिकच आहे. ज्या संविधानाने सद्विवेकाचे स्वातंत्र्य दिले, त्या संविधानाची आणि स्वातंत्र्याची बाजू घेणे एखाद्या पक्षाला अडचणीचे वाटण्याचा अर्थ काय होतो?

**लोकांच्या पैशावर लोकांचा हक्क की पक्षांचा?**

अ.भा. मराठी साहित्य संमेलनाला पन्नास लाखांचे अनुदान शासन देते आणि हा पैसा लोकांचाच पैसा असतो. लोकांच्याच करामधून मिळालेला पैसा लोकांच्याच संमेलनांना शासन देते. इथे कोणत्याही पक्षाने संमेलनाला आपण हे अनुदान देतो आणि त्यावर उपकार करतो, असे उगीचच समजू नये. लोकांच्या पैशावर लोकांचा हक्क की पक्षांचा? याचा निर्णय होत नाही तोवर पक्ष आपले या संमेलनांवरील नियंत्रण मजबूत करीत राहणार. समाजात अनेक जाणते साहित्यिक, विचारवंत आणि परिवर्तनाच्या चळवळीचे नेते-कार्यकर्ते असतात. या गंभीर आणि जबाबदार लोकांना संमेलने

घेऊ द्यावीत. पक्षनेत्यांनी अशा सार्वजनिक आणि संविधानिक उपक्रमांमध्ये कोणताही हस्तक्षेप करू नये. कोणत्याही संमेलनाच्या विचारमंचावर त्या त्या क्षेत्रातील जाणत्या आणि अभ्यासक लोकांना व्यक्त होण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असावे. संमेलनांचे तेच नायक असावेत. राजकारणातील पक्षीय लोकांनी इच्छा असेल, तर संमेलनात श्रोते म्हणून जावे. हे जाणते लोक समाजाची कोणती दुःखे मांडतात, ज्वलंत प्रश्नांचे कसे विश्लेषण करतात आणि प्रश्न सोडविण्याचे कोणते उपाय सांगतात. हे ऐकण्यासाठी राजकारणातल्या लोकांनी संमेलनात जावे. या संमेलनात होणाऱ्या वैचारिक मंथनाचा आपल्या राजकारणाला काही विधायक वळण आणि दिशा देण्यासाठी काही उपयोग होईल का त्याचा विचार करावा. त्यासाठी या पक्षीय नेतृत्वाने संमेलनात जावे.

**असा भेदभाव का पाळला जातो?**

या स्वातंत्र्यसंवर्धनाला आणि खुलेपणाला जर एखाद्या सत्ताधारी 'पक्षाचा' विरोध असेल, तर आम्ही आमचाच पैसा शासनाला मागतो. तुम्ही शासनाचा आणि संविधानाचा चेहरा विद्रूप करणारे कोण, असा सवाल संमेलनाच्या आयोजकांनी त्या त्या वेळच्या सत्ताधारी पक्षाला विचारण्याची धमक ठेवायला हवी. पण असा प्रश्न महामंडळाचे लोक विचारीत नाहीत. शिवाय शासन अनेक संमेलनांना असे अनुदान देत नाही, असा भेदभाव का पाळला जातो, याचे कोणतेही तार्किक उत्तर संबंधित देऊ शकत नाहीत. मी तर असे म्हणेन, की संविधानातील मूल्यादर्श लोकांपर्यंत पोचवणाऱ्या संमेलनांना शासनाने सढळ हातानेच अनुदान द्यावे, कारण शासनालाच उपकारक कार्य अशी संमेलने करीत असतात. पण असे होत नाही. त्यामुळे अनेक संमेलने लोकवर्गणीतूनच भरविली जातात. विद्रोहीवाल्यांनी लोकांकडून थोडे थोडे धान्य घेऊन आणि अल्पशी वर्गणी घेऊन यशस्वी संमेलने केली आहेत. आंबेडकरवादी साहित्य संमेलने, बहुजन साहित्य संमेलने, आदिवासींची आणि भटक्या विमुक्तांची अनेक संमेलने याच पद्धतीने होतात.

अ.भा. मराठी साहित्य संमेलन हे कोणत्याही एका धर्माचे संमेलन नव्हे. ते कोणत्याही जातीचे, साहित्यातील कोणत्याही गटाचे संमेलन नव्हे वा कोण्या राजकीय पक्षाचे वर्चस्व प्रस्थापित करण्याचे साधनही ते नव्हे. त्यामुळे कोणत्याही धर्माची प्रतीके संमेलनात असणे हे सलोखाविरोधीच कृत्य ठरेल. संविधान मानते त्याप्रमाणे भारतीय संस्कृती एकधर्मी नव्हे. ती संमिश्र आहे. धर्मनिरपेक्षतावादी आहे. एका धर्माचा आग्रह धरणाऱ्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी, की त्यामुळे इतर धर्माच्या लोकांना दुखापती होतात. तेव्हा तत्त्वतः भारताचे आणि त्याच्या राज्यांचे शासन तसे कोणत्याच धर्माचे नाही. ते धर्मातीतच आहे आणि हीच धर्मातीत, जातीविहीन आणि अंधश्रद्धाविहीन संविधाननीती आपल्या सर्व संमेलनांनी प्रत्यक्षात प्रस्थापित करावी. आपली संमेलने सर्वांची होतील आणि त्यातून भारतीयता म्हणजे एकमयता प्रस्थापित होण्याची प्रक्रिया सुरू होईल. ती गतिमानही होईल. यासाठी संमेलनांनी कार्य करावे.

**संमेलनांनी अपप्रवृत्तींच्या निर्मूलनाचे अभियान चालवायला हवे**

धर्म आणि जाती यांनी भारतीयत्वाचे वा सौहार्दाचे केवढे नुकसान केले, हे संमेलनांनी प्राथम्याने सांगायला हवे. पंचाऐंशी टक्के बहुजनांना पंधरा टक्के लोकांवर अवलंबून का राहावे लागते? या प्रक्रियेत स्वातंत्र्याची वा स्वाभिमानाची हत्या होतेच आणि वर्चस्वी वर्गाचे मिंधे साहित्य निर्माण होते. ते खरे साहित्य नसतेच. हे स्वातंत्र्याचे नुकसानच असते. पुरस्कारांच्या, मानसन्मानाच्या सर्व यंत्रणा पंधरा टक्के लोकांच्या हातात असतात. ही मानसिकता मालकमनस्क आणि स्थितीशील मानसिकताच असते. म्हणजेच या यंत्रणा ज्यांच्या हातात आहेत, त्यांचा अनुनय करणारे लाचार साहित्य या प्रक्रियेतून निर्माण होते. म्हणजे पंधरा टक्क्यांची मानसिकता साहित्याचे, समाजाचे आणि खरेपणाचे केवढे नुकसान करते, हे संमेलनांनी लोकांना सांगायला हवे आणि सर्वच संमेलनांनी या नुकसानदायी अपप्रवृत्तींच्या निर्मूलनाचे अभियान चालवायला हवे.

साहित्यिकांच्या संमेलनांनी साहित्यातील मागच्या पाचपंचवीस




वर्षांमधील निर्मितीची कसून चौकशी करायला हवी. मोठ्या शहरांमधील काही लोकांचा शब्द प्रमाण वा एकमेव सत्य मानायची गरज नाही. फॅसिस्ट कलावादाचे साहित्यासंबंधीचे निष्कर्ष साहित्याच्या दृष्टीने धोक्याचेच मानायला हवेत. पंधरा टक्के लोकांची अभिरुची ही अभिजनीच असणे अटळ आहे. मूठभरांच्या या अभिरुचीचे दडपण पंचाऐंशी टक्के समाजाने आणि त्याच्या साहित्यिकांनी झुगारून देण्याचीच गरज आहे. पंधरा टक्के लोक त्यांच्या हिताचे निकष सर्वमान्य करू इच्छितात. हे निकष पंचाऐंशी टक्के लोकांनी समाजाच्या आणि साहित्याच्या क्षेत्रातही प्रमाण मानायची अजिबात गरज नाही. सर्वच संमेलनांनी पंचाऐंशी टक्के लोकांचा जीवनसंघर्ष संमेलनांच्या आणि समाजाच्या केंद्रस्थानी आणायला हवा आणि पंचाऐंशी टक्के लोकांचे महानायकत्व प्रस्थापित करायला हवे.

**...तर या संमेलनांना अर्थ नाही**

वेगवेगळ्या संमेलनांनी त्या त्या क्षेत्रातील चढ-उतार तपासायला हवेत. त्यामागील कारणे अधोरेखित करायला हवीत. समकालीन

जीवनाचा, त्याच्या आडव्या-उभ्या धाग्यांचा संबंधप्रकार तपासायला हवा. समकाळाचा तळ साहित्याने ढवळून काढला की नाही? समाजातले धगधगते द्वंद्व साहित्यात उगवते की नाही? भोवतीच्या जीवनातील सर्व आवाज साहित्यातून ऐकायला येतात की नाही? साहित्याचा खोलीसह विस्तार होतो की नाही? त्याची विविधता टोकदार होते की नाही? त्याची जीवनाची, त्याच्या गुंतागुंतीची मर्मे लक्षात घेण्याची आणि ती व्यक्त करण्याची क्षमता वाढली आहे की नाही, हे संमेलनाने तपासायचे असते. साहित्यापुढे बदलत्या गतिमान भौतिक स्थितीत कोणती नवी आव्हाने उभी राहात आहेत? समकालीन जीवनाचे आकलन अधिक पिळदार होते की नाही? पंचाऐंशी टक्क्यांमधील प्रतिभांना या संमेलनांमध्ये नायकपण प्राप्त होते की नाही? या विराट जनसागराला आणि त्याच्या मुक्तिसंग्रामाला संमेलनात केंद्रवर्तीस्थान मिळणार नसेल, तर या संमेलनांना अर्थ नाही. ही संमेलने मग केवळच निरर्थक ठरत नाहीत, तर विघातकही ठरतात, असेच म्हटले पाहिजे.

या संमेलनांनी पर्यायी वाङ्मयीन, सामाजिक आणि राजकीय संस्कृतीची दिशा स्पष्ट करायला हवी. असे झाले नाही, तर ही संमेलने रोगट संमेलने ठरतील आणि साहित्यासकट समाजासाठीही आणि संविधाननिष्ठ राजकारणासाठीही ही संमेलने संकटांसारखी ठरतील.

### भारतीयत्व हीच खऱ्या प्रतिभेची व्याख्या आहे

भारतीय, अखिल भारतीय या संज्ञा आपण वापरतो. आपल्या उपक्रमांची संपूर्णता या संज्ञांमधून आपण सांगतो. भारतीय या संज्ञेचा वापर मला तरी अपार आनंददायीच वाटतो. अखंडता, ऐक्य, सलोखा, सौहार्द आणि संविधानाला अभिप्रेत 'आम्ही भारतीय' हे मॅग्नेटिकच आपण या संज्ञेतून सुचवत असतो. 'भारतीय' हा समाजाला जोडण्याचा आणि संमिलनाचा आणि एकमयतेचाच सिद्धांत आहे. कारण या सिद्धांतात जातिमुक्त, धर्मरिपेक्ष, स्त्रीदास्यमुक्त, विषमतामुक्त आणि शोषणमुक्त मनांचा सर्वव्यक्तीसमभावी भारत आहे. हेच खरे भारतीयत्व आहे. विज्ञाननिष्ठ, मानवतावादी, सतत नवरचनावादी तसेच सकल संमिश्रता आणि विविधता जपणाऱ्या सुज्ञ मनांचा हा भारत आहे. सर्व प्रश्नांसंबंधीची आणि साहित्यिकांचीही संमेलने घेणाऱ्या सर्वांनीच हे भारतीयत्व निर्माण करण्यासाठी शिकस्त करायला हवी. आपण कोणत्याही धर्माचे 'त्व' नाही, तर पूर्णपणे भारतीयत्वातले 'त्व' आहोत, ही बाब आपल्या संमेलनांमधून घरोघर जाईल यासाठी प्रयत्न करायला हवेत. हे भारतीयत्वच भारतीय लोकांसाठी आणि साहित्यिकांसाठीही सर्वश्रेष्ठ सौंदर्यत्व आहे. भारतीयत्व हीच खऱ्या प्रतिभेची व्याख्या आहे आणि तीच खऱ्या सौंदर्याचीही व्याख्या आहे. या भारतीयत्वाला आपण आपली मूल्याभिरुचीही आणि सौंदर्याभिरुचीही मानायला हवे. म्हणूनच 'भारत जोडो'सारख्या कोणत्याही मूल्यांतरनिष्ठ आणि संविधाननिष्ठ अभियानाच्या पाठीशी सर्व संमेलनांनी उभे राहायला हवे.

### माणसे दैववादीच का राहून जातात?

साहित्यिकांनी अमुक देवीची, अमुक शक्तीची आराधना करावी असे संमेलनाने सांगू नये. माणसांचे सर्व प्रकारचे परावलंबन संपेल, असे भान या संमेलनांनी जागवावे. माणूसच त्याच्या अर्थवत्तेचा निर्माता आहे. या माणसांच्या प्रज्ञेशिवाय आणि प्रतिभेशिवाय माणसांना सर्जनशील करणारे जगात काहीही नाही, हे संमेलनाने लोकांना सांगावे. छळ सोसत वैज्ञानिकांनी शोध लावले, त्यामुळे निर्माण झालेल्या सोयीसुविधांचा लाभ घेणारी माणसे विज्ञाननिष्ठ न होता दैववादीच का राहून जातात, या प्रश्नाचे उत्तर संमेलनांनी लोकांना ऐकवावे. दैववादनिष्ठ श्रद्धांना जी संमेलने गोंजारतात, ती संमेलने मानवी बुद्धीची आणि हस्तक्षेपांची हत्याच करीत असतात. जातीधर्माचे महत्त्व वाढविण्याची जबाबदारी संयोजकांनी संमेलनांवर टाकू नये. या सर्वांच्या निर्मूलनानंतर उगवतो तो सलोखा साहित्यिकांनी आणि इतरही सर्व चिकित्सक कार्यकर्त्यांनी निर्माण करण्याच्या प्रेरणा समाजात जागवाव्यात.

वर्णाचे, स्त्रीदास्याचे, परधर्मद्वेषाचे आणि जातींचे समर्थन करणाऱ्या साहित्याला पवित्र मानत असू, तर आपण या सर्वच अमानुषतेचा पुरस्कारच करीत असतो. विज्ञानविरोधी गोष्टींचा पुरस्कार करणारी संमेलने ज्ञान आणि विज्ञानाच्या विरोधात काम करीत आहेत, हे लोकांना वाटायला हवे. अशी संमेलने अज्ञानाचेच संवर्धन करीत असतात, असे म्हटले पाहिजे.

### नीतीला ही बाब अजिबात मंजूर नसते

विज्ञान आणि साहित्यिकांची प्रतिभा या सहोदर सर्जनक्षमताच आहेत. वैज्ञानिकांची आणि साहित्यिकांची नवनिर्मितीची प्रक्रिया समानच असते. दोन्ही सर्जनक्षमता नवनवोन्मेषशालीच असतात. आपण जे आधी निर्मिले त्याच्या पुढची नवनिर्मिती आपल्याला शक्य व्हावी, असे या दोन्ही क्षेत्रांमधील निर्मात्यांना वाटत असते. अधिक निर्दोष, अधिक पूर्ण आणि अधिक अन्वर्थक होत जाण्याचीच दोघांचीही प्रतिज्ञा असते. म्हणजे नवरचना, फेरमांडणी, अधिक उज्ज्वलतेचा शोध, हेच दोघांचेही साध्य असते आणि हीच त्यांची सर्वश्रेष्ठ नीतीही असते. ही नीती सुंदरच असते. म्हणून तिला आपण सौंदर्यनीती वा नीतीसौंदर्य म्हणतो. या नीतीला भूतकाळातील कालबाह्यता वा मूलतत्त्ववाद वर्तमानात आणणे, ही बाब अजिबात मंजूर नसते. जे लोक अशा संमेलनांमधून वर्तमानात मूलतत्त्ववाद लोकप्रिय करण्याचा प्रयत्न करतात ते वर्तमानालाही नवे आणि निर्दोष होऊ देत नाहीत आणि मूलतत्ववादी भूतकाळापेक्षा भविष्य वेगळे असणार नाही, यासाठीच ते पराकाष्ठा करीत असतात. असे लोक भारतीयत्वाचे स्वप्न समाजापर्यंत जाऊ देत नाहीत. संमेलनांच्या मुखाने भारतीय संविधानाला आणि त्यातील भारतीयत्वाला बोलू देत नाहीत. यासाठी संमेलने नसतात. यासाठी संमेलने होऊ नयेत. सर्व भारतीय लोकांना तपशिलाची विविधता जपत एकमयतेचे विज्ञान सांगणारी संमेलने आता असावीत. देव, दैव आणि चातुर्वर्ण्यसत्ताकाची चाकरी करणारी संमेलने पुढल्या पिढ्यांसाठी जहर ठरतील. आता शिवराय, फुले, शाहू आणि आंबेडकरांच्या बहुजनसत्ताकाचा उजेड घरोघरी पोचविणारी संमेलनेच हवीत. वैश्विक परिप्रेक्ष्याशी हातमिळवणी करणाऱ्या सत्तर टक्के तरुणतरुणींची डोकी विश्वाएवढी करणारी संमेलने हवीत. हे झाले तर सर्वच संविधाननिष्ठ भारतीयांचे निखळ उजेडाचीच भाषा बोलणारे एकजीव महासंमेलन तयार होईल. याच पद्धतीने संमेलने स्वतःची विधायक अनिवार्यता निर्माण करू शकतात. ●●●

**(लेखक ज्येष्ठ साहित्यिक आणि विचारवंत आहेत.)**

# विद्रोह



डॉ. बी.जी. वाघ

**सत्य म्हणजे रस्ता निवडीचे स्वातंत्र्य. दिशा जाणिवा, सद्‌सद्‌विवेकाचे स्वातंत्र्य. घटनेने आपल्याला ते दिले आहे; परंतु त्यामागे लोकचळवळींचा, विचारवंतांचा, क्रांती-प्रतिक्रांतीचा शेकडो वर्षांचा इतिहास आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे. सत्य म्हणजे आहे एक निरंतर विद्रोह... बुद्ध, कबीर, तुकाराम, सॉक्रेटिस ते थेट बर्ट्रांड रसेल, आंबेडकरांपर्यंत तो आपल्याला दिसतो.**

माणूस जन्मत:च स्वतंत्र आहे, हे बऱ्याच विचारवंतांना मान्य नाही. तो कधी कळपात, तर कधी झुंडीत असतो. तो तर्कशुद्ध विचार क्वचितच करतो. माणूस तेव्हाच बंड करू शकतो, जेव्हा तो तर्कशुद्ध विचार करतो. आपल्या अस्तित्वाची तर्कशुद्ध जाणीव म्हणजेच विद्रोह. त्यातूनच व्यक्ती व समाजाची उन्नती होत असते. प्रगल्भ समाजातच स्वातंत्र्य या कल्पनेचा जन्म होतो. त्यासाठी आपल्या अस्तित्वाची तीव्रतर जाणीव होणे आवश्यक असते. व्यक्ती व समाज यातील अंतर्विरोध व त्यातून होणारे अंतर्गत संतुलन व समन्वय स्वातंत्र्याच्या सीमारेषा निश्चित करतो. व्यक्तीला इतकेही स्वातंत्र्य नको, की ज्यामुळे समाजाचे अस्तित्व धोक्यात येईल आणि समाजाने व्यक्तीला इतकेही नियंत्रित करू नये, की ती मतिमंद व गतिमंद होईल.



जीवन ही निसर्गाची देणगी आहे; परंतु सुंदर रितीने जगणे ही प्रज्ञेची देणगी आहे. सौंदर्य म्हणजे व्यक्तीचा नैतिक, बौद्धिक व मानसिक विकासच. तो स्वातंत्र्यामुळेच होतो; परंतु त्यासाठी समाजात समताही असावी लागते. व्यक्ती व समाजाच्या हितात संघर्ष येत असेल, तर सुवर्णमध्य साधावा लागेल. चांगले आणि वाईट यांतील सीमारेषाही त्यातून सुस्पष्ट होते. प्रगल्भ समाजातच स्वातंत्र्याचा जन्म होतो आणि त्याचा आदर केला जातो. त्याचा संबंध शिक्षणाशी, संस्कारांशी, तथाकथित संस्कृतीशी व सामाजिक-राजकीय व्यवस्थेशी असतो. इहवाद हाच स्वातंत्र्याचा पाया असतो. इहवाद म्हणजे जीवनावर समरसून प्रेम करा, स्वतः आनंदात जगा आणि इतरांनाही आनंदाने जगू द्या.

**...तर आपणही व्यवस्थेचे गुलामच आहोत!**

आपले स्वातंत्र्य म्हणजे इतरांच्या स्वातंत्र्याचा आदर करणे होय. आपण इतरांना स्वातंत्र्य देणार नसू, तर आपणही व्यवस्थेचे गुलामच आहोत, असा त्याचा अर्थ होईल. धर्म तुम्हाला कधीही स्वातंत्र्य देत नाही. धर्माचे स्वातंत्र्य हे मृत्यूनंतरच प्राप्त होते. त्यासाठी मुक्ती, मोक्ष, निर्वाण, स्वर्गप्राप्ती असे अनेक शब्द आहेत, संकल्पना आहेत. मृत्यूनंतरच्या अस्तित्वाची जाणीव म्हणजेच स्वातंत्र्य. आपल्या इच्छा-वासनांपासून मुक्त होणे म्हणजेदेखील स्वातंत्र्य आहे. माणसाचा प्रारंभीचा लढा आपल्यातील पशुत्वाशीच होता. आपल्यातील पाशविकतेपासून माणूस मुक्त झाला नाही, तर त्याला स्वतंत्र होता येणार नाही. स्वातंत्र्याच्या मूळ कल्पना धार्मिक, आध्यात्मिक, अधिभौतिकच आहेत. त्यासाठी जाणिवांचा विकास होत राहणे आवश्यकच असते. ज्ञान-अज्ञानातील फरक जाणण्याइतकी माणसाची क्षमता वाढल्याशिवाय त्याला स्वातंत्र्याचा बोध होणार नाही. अज्ञान हेदेखील पारतंत्र्यच असते. आपण ज्या स्वातंत्र्याची चर्चा करतो, ती मात्र भौतिक, तार्किक आणि वैज्ञानिक प्रक्रिया आहे. तिचा संबंध व्यक्तीच्या व समाजाच्या उन्नतीशी आहे. व्यक्ती आणि समाज यांनी परस्परांच्या विकासासाठी केलेले प्रयत्न म्हणजे समतावादी, स्वतंत्र, विज्ञाननिष्ठ समाज घडवणे होय. या दोन्हींचे हितसंबंध परस्परविरोधी असतात. धार्मिकतेचे अवडंबर माजवणारा समाज व्यक्तीच्या स्वातंत्र्याला प्रतिबंधित करतो. बर्ट्रांड रसेल यांनी म्हटले आहे की, माणसाचे आक्रमणकारी रूप आपल्याला धर्मात दिसते. मग तो धर्म यहुद्यांचा असो, ख्रिश्चनांचा-मुस्लिमांचा असो की हिंदूंचा. आपण सर्वश्रेष्ठ लोक आहोत, अशी

भावना यहुद्यांमध्ये होती, ती आर्यांमध्येही होती.

**धार्मिक सत्ता अधिक अघोरी असतात**

धार्मिक दहशतवाद किंवा एक प्रकारचा धार्मिक साम्राज्यवाद इतिहासात आपल्याला वारंवार दिसून येतो. त्यातून एक युद्धमग्न मानसिकता जन्माला येते. त्याला राष्ट्रवाद किंवा वंशवादाची जोड दिली, तर फॅसिझम, नाझीझमसारखी माणसाला अंतर्बाह्य छळणारी एक व्यवस्था निर्माण होते. ती कोणत्याही प्रकारच्या स्वातंत्र्य, समतेला जागा देत नाही. धार्मिक सत्ता माणसांच्या मनावर राज्य करतात म्हणून त्या अधिक अघोरी असतात. मध्ययुगीन समाज त्यामुळे अधिक रानटी होता. चर्चचा आणि येशू ख्रिस्ताचा काही संबंध नव्हता. धर्म कधी काळी सत्याचे वाहक होते; परंतु मध्ययुगात ते सत्याचे मारेकरी ठरले. दोष धर्मांचा नव्हता, तर धर्मांच्या साह्याने लोकांना मानसिकदृष्ट्या गुलाम करणाऱ्या धर्ममार्तंडांचा आणि सत्ताधाऱ्यांचा होता. अनियंत्रित राजेशाही आणि बेलगाम धर्मसत्ता यामुळे सामान्य माणसाचे जीवन नरकतुल्य होते. स्वातंत्र्य, समता, न्याय या कल्पनांपासून जग फार दूर होते. व्यक्तीला काही अधिकार असतात, याची जाणीवही नव्हती. भारतातील परिस्थिती यापेक्षाही भीषण होती. धर्माच्या नावाने स्त्रियांना जिवंत जाळले जात होते. सर्व प्रकारच्या अनैतिकतेने सर्वोच्च कळस गाठला होता. धर्म माणसांपेक्षा कधीही श्रेष्ठ असत नाही. कारण ती माणसाचीच निर्मिती असते; परंतु सत्ताधाऱ्यांनी कायम तिला ईश्वरी ठरवून सामान्य माणसांची फसवणूक केली आहे. या व्यवस्थेत व्यक्तीचे मूल्य शून्य असते. व्यक्तिवाद व अतिरेकी व्यक्तिवाद ही अठराव्या शतकाची देणगी आहे. अठरावे शतक हे रोमँटिसिझमचे शतक आहे. बर्ट्रांड रसेलने त्याचे वर्णन 'Revolt of solitary instincts against social bonds' असे केले आहे. ते एक प्रकारचे नैतिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय अशा सर्व व्यवस्थांविरुद्ध केलेले बंड होते, विद्रोह होता. म्हणून अठराव्या शतकाला 'विचारांचे शतक' असेही म्हटले जाते. त्याचा सर्व ओढा विमुक्तवादाकडे किंवा व्यक्तिस्वातंत्र्याकडे होता. सौंदर्यासक्त मनाने रूढ चाकोरीबद्ध जगाचा तो व्यक्तिगत पातळीवर केलेला निषेध होता. नेपोलियनच्या पाडावानंतर युरोपात एक शांतता भरून राहिली होती. औद्योगिक क्रांतीला सुरुवात झाली होती. त्यामुळे समाजात श्रमिक आणि भांडवलदार वर्गाची निर्मिती, त्यातून निर्माण झालेली संपत्ती आणि शोषण आणि अपरिहार्य असा वर्गसंघर्ष ही सगळी रोमँटिसिझमला अनुकूल भूमी होती. जीवनातील सौंदर्य, प्रेमाची हळुवार भावना, निसर्गातील भव्यदिव्यता आणि मानवी जीवनातील कुरूपता, तरीही सुंदर असे हवेहवेसे वाटणारे जग... युद्धाच्या पार्श्वभूमीवर त्या सुंदर, हळव्या, तरल प्रेमकहाण्या, स्त्री-पुरुष संबंधांतील मुक्तता, ती बेहोशी, ती आर्तता... विवाहसंस्था म्हणजे जणू तुरुंगच. कोलेरिज, व्हिक्टर ह्यूगो, मेलेव्हील, थोरो, इमर्सन, ब्लेक, वर्डस्वर्थ, बायरन, शेले, किट्स अशा जगविख्यात लेखक, कविमंडळींनी मानवी चिंतनाचे आभाळ दाही दिशांनी मुक्त केले. 'Things of beauty is joy for ever - Keats' हा या युगाचा मंत्रच होता. रूसो (१७१२ ते १७७८) हे या रोमँटिसिझमचेच अपत्य होते. हॉब्स, लॉकप्रमाणेच त्याने एक नवीन राजकीय तत्त्वज्ञान दिले. सर्वांचे सर्वांशी सर्वकाळ युद्ध असे माणसाचे निसर्ग अवस्थेतील जीवन होते, अशी हॉब्सची मांडणी होती. या युद्धाला कंटाळून माणसांनी सार्वभौम सत्तेशी जो करार केला, त्यालाच 'राज्य' म्हटले जाते. त्यातून व्यक्तीने सुरक्षितता, सुव्यवस्था मिळवली; परंतु स्वातंत्र्य कायमचे गमावले.

**...तर त्याच्या प्रगतीला काहीच अर्थ उरणार नाही!**

रूसोच्या सामाजिक करारात व्यक्ती आपले स्वातंत्र्य आपल्याच सामूहिक रूपाला अर्पण करत असते. त्यामुळे व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा अधिकार शासनाला कधीही हिरावून घेता येत नाही. रूसोच्या सामाजिक कराराने (Social contract) चांगलेच वादळ निर्माण केले. कारण त्याने राजेशाहीला उघड आव्हान दिले होते. त्यामुळे त्याला राजकीय आश्रयासाठी, सुरक्षिततेसाठी देश सोडावा लागला. त्याने फ्रेंच राज्यक्रांतीसाठी वातावरण निर्माण केले. रूसो निसर्गवादी होता. विज्ञान आणि कलांनी मानवी इच्छा आणि गरजा तेवढ्या वाढवल्या आणि त्यांचा तो दास झाला, असे मत त्याने पहिल्या निबंधात मांडले. आदिमानवाचे मुक्त जीवन अधिक आदर्श आणि उदात्त होते. तो मूलतः चांगलाच होता; परंतु समाजव्यवस्थेने त्याला दुष्ट बनवले. ज्या क्षणी त्याने जमिनीला कुंपण घातले आणि तो म्हणाला की, 'ही माझी जमीन', त्या क्षणी त्याने नागरी व्यवस्थेचा पाया घातला. त्यातून माणसाला दुःखाशिवाय काहीही मिळाले नाही. त्याला सुखी व्हायचे असेल, तर त्याने या व्यवस्थेला नकार दिला पाहिजे. अर्थात, निसर्गातच सर्व स्वातंत्र्य आहे, ही रूसोची भूमिका आधुनिक संस्कृतीचा निषेध करणारी होती. व्हॉल्टेअरने याबाबतीत असे म्हटले आहे की, माणसाला मूर्ख बनवण्याचा इतका चांगला प्रयत्न रूसोशिवाय कोण करणार, कारण रूसोचे विचार अत्यंत रानटीपणाचे वाटले. निसर्गच जर आदर्श व्यवस्था म्हटली, तर मानवी शिक्षण आणि संस्कृतीला, त्याच्या प्रगतीला काहीच अर्थ उरणार नाही. अठराव्या शतकात निसर्गवाद्यांनी एक मोठी चळवळ उभी केली होती. ते अराज्यवादी होते. प्रोधो या एका विचारवंताने म्हटले होते की, सर्व राजे, त्यांचे सरदार, अधिकारी यांची सर्रास कत्तल केली तरी जनतेचे काही बिघडणार नाही. कारण ते सर्व अनुत्पादक आहेत. पुढे मार्क्सने ते शास्त्रीय पद्धतीने सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. थोरो, व्हिटमन, इमर्सन, टॉलस्टॉय, महात्मा गांधी हे निसर्गवादीच होते; परंतु त्यांनी निसर्गाकडून घेतला 'जगा आणि जगू द्या' हा संदेश नि शांतता, सहिष्णुता, बहुविधतेतील ऐक्य. व्यक्तिवाद ही निसर्गवादाचीच देणगी आहे. कारण निसर्गाची सर्वोत्तम निर्मिती म्हणजे मनुष्यच आहे. इमर्सनने म्हटले आहे : श्रद्धेचा पाया सत्ता असू नये. श्रद्धा झाडावर आलेल्या फळांसारखी नैसर्गिक असायला हवी. (The faith that stands on authority is not faith.) महात्मा गांधींवर थोरोचा प्रभाव होताच. व्यक्तिवादाचे सुंदर रूप आपल्याला व्हिटमनमध्ये दिसते. व्हिटमनने लिहिले आहे :

Nothing, not God is greater to one than one's self is. I who I am curious about each, I am not curious about God- Nor do I understand who there can be more wonderful than myself, why should I wish to see God better than this day? In the faces of men and women, I see

God and in my own face in the glass.

**- Whitman, Song of myself**

**हा छुपा वंशवादच असतो...**

व्यक्तीची प्रतिष्ठा ही कुठल्याही देवाधर्मापेक्षा श्रेष्ठ आहे, असे सांगण्याचा हा प्रयत्न होता. माणूस हा मूलतः स्वतंत्र आहे. त्याच्यावर कुठलीही अनैतिक सत्ता चालणार नाही. सत्ता चालेल ती सद्सद्विवेकाचीच. त्यालाच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सद्सद्विवेकाचे स्वातंत्र्य म्हटले आहे. व्यक्ती व राष्ट्र यात संघर्ष येतो तो त्यामुळेच. आत्माभिमान, धर्म व संस्कृतीविषयी अस्मिता, परंपरेवरील आंधळा विश्वास आणि इतरांपेक्षा आपण श्रेष्ठ असल्याने इतरांवर सत्ता गाजवणे हा आपला अधिकार आहे अशी भावना एका सांस्कृतिक राष्ट्रवादाला जन्म देते. त्यात अल्पसंख्याकांविषयी किंवा परधर्मियांविषयी एक तुच्छतेची भावना असते. रसेलने लिहिले आहे : 'Patrotism is a very complex feeling built up out of primitive instincts and highly intellectual convictions.'

त्यामागे धार्मिक आणि वांशिक विद्वेषाबरोबरच इतिहासाचे विकृत आकलन आणि शिक्षणाद्वारे पसरवलेला सांस्कृतिक आदर्शवादही असतो. व्यक्तीच्या स्वातंत्र्याला, समाजातील सौहार्द आणि शांततेला अशा राष्ट्रवादाचा नेहमीच धोका राहिला आहे. राष्ट्रवादाचा प्रथम बळी व्यक्तीच असते. हा छुपा वंशवादच (Jingoism) असतो. राष्ट्राचा संबंध काही धार्मिक व सांस्कृतिक प्रतिमा व आदर्शवादाशी जोडून त्यांच्या संरक्षणासाठी सर्वोच्च त्याग करणे या राष्ट्रवादात अंतर्भूत असते. उदा. हिंदू राष्ट्रवादाचा संबंध रामाशी जोडून रामाला विरोध म्हणजे राष्ट्राला विरोध, अशी मांडणी केली जाते. बहुसंख्याकवाद हे हुकूमशाहीचे सांस्कृतिक रूप आहे. ती माणसाच्या मनावर राज्य करते. ती हळूहळू प्रशासनाच्या सर्व अंगांना पंगू करते. राष्ट्रीय शिक्षण या व्यवस्थेत भूतकाळाचे गौरवीकरण, राष्ट्रनेत्याचे उदात्तीकरण, राजकीय व सामाजिक संस्थांचे धार्मिकीकरण अशा अनेक अंगांनी व्यक्तीचे, समाजाचे रूपांतर सांघिक कट्टरतेत होते. राष्ट्रवादाची दुसरी प्रवृत्ती निरंतर संघर्ष ही असते. कुठल्याही देशात सामाजिक व सांस्कृतिक संघर्ष अपरिहार्य असतात. त्यातून समाजाची नैतिक व बौद्धिक पातळी उंचावण्याची आवश्यकता असते; परंतु येथे संघर्ष असतो बहुसंख्याकांचा अल्पसंख्याकांशी. ज्यूंना मारल्याशिवाय जर्मन राष्ट्र महान होणार नाही, या विचाराने लक्षावधी ज्यूंना मारण्यात आले. बुद्धिमान समाजाचे हे अधम कृत्य इतिहासात कायमचे नोंदले गेले आहे. बहुसंख्याकवाद, वंशवाद, धर्मवाद, धार्मिक राष्ट्रवाद ही जगावरची मोठी संकटे आहेत. फॅसिझमचे मूळ 'मनुस्मृती' आहे. जर्मन राष्ट्रवादाचा भाष्यकार नित्शेने 'मनुस्मृती'ला बायबलपेक्षाही अधिक पवित्र ठरवले. सामान्य माणसाला धार्मिक व सामाजिकदृष्ट्या कनिष्ठ ठरवून त्याचे मानसिक खच्चीकरण करणे हा सत्तासंपादनाचा जवळचा मार्ग आहे. कारण या व्यवस्थेत ज्यांच्यावर अन्याय होतो, ते प्रतिकारच करत नाहीत. जेव्हा ज्ञानशक्तीचे श्रमशक्तीशी विभाजन होते, तेव्हा ज्ञानी अधिकारीवर्ग गुलामगिरीचे, वर्णव्यवस्थेचे, दासप्रथेचे समर्थन करू लागतो. भारतात धर्म व संस्कृती हेच शोषणाचे मूळ आहेत. भारतातील सर्व समस्यांचे मूळदेखील धर्मच आहे. धर्म व विज्ञान याबाबतीत जितके चिंतन आणि चिकित्सा युरोपात झाली, तितकी भारतात झाली नाही. काळाप्रमाणे धर्म बदलणे आवश्यक आहे. प्राचीन धर्म आधुनिक मानवतेला मार्गदर्शन करू शकतील इतकी त्यांच्यात क्षमता नाही. कारण हे जग अत्यंत परिवर्तनशील आहे. विज्ञानाने धर्माच्या सर्व आधारशिला उद्ध्वस्त केल्या आहेत. त्यामुळे धर्माने मानवकेंद्री रूप धारण करणे आवश्यक आहे. जेव्हा विज्ञान, धर्म आणि तत्त्वज्ञान एकमेकांची भाषा आत्मसात करतील किंवा एका पातळीवर येतील, तेव्हाच खरा धर्म किंवा खरी संस्कृती जन्माला येईल. माणसाला स्वातंत्र्य असेल तरच तो सत्याचा, ज्ञानाचा, प्रकाशाचा आणि पूर्णत्वाचा अनुभव घेऊ शकेल. ईश्वर आहे किंवा नाही हे पाहण्यापेक्षा माणसाचे हित कशात आहे हे पाहणे अधिक महत्त्वाचे आहे, असे प्रसिद्ध ग्रीक तत्त्वज्ञ प्रोटोगोरस याने फार पूर्वीच (इसवी सन ४८५) सांगितले आहे. (Man is the measure of all things.)

**सत्य म्हणजे एक निरंतर विद्रोह**

माणूसच विश्वाचे मोजमाप हा त्याचाच विचार आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता निरीश्वरवाद ही इहवादाची अंगभूत तत्त्वे आहेत. त्यांची मुळे आपल्याला ग्रीक आणि रोमन तत्त्वज्ञानात व बुद्धविचारात सापडतात. इहवाद हा ईश्वरवादाइतकाच प्राचीन आहे. भारतात चार्वाक, बुद्ध, महावीर त्याचे अग्रणी आहेत. अनॅक्झगोरस हा सॉक्रेटिसपूर्व मोठा विचारवंत. तो पहिला निरीश्वरवादी म्हणता येईल. तो म्हणाला, 'जर ईश्वर दयाळू असेल तर जगात इतके दुःख का आहे आणि शक्तिमान असूनही तो ते दूर करणार नसेल, तर तो दुष्ट आहे. अनॅक्झगोरसने (ख्रिस्तपूर्व ५००) त्याऐवजी वैश्विक मनाची (Nous) कल्पना मांडली. सॉक्रेटिस, ॲरिस्टॉटल, प्लेटो आणि डेकार्टपर्यंतचे सारे तत्त्वज्ञ अनुभवजन्य ज्ञान, तर्क, विवेक आणि विज्ञान यांचा पुरस्कार करणारे होते. यातल्या बहुतांश विचारधारांवर बुद्धाचा स्पष्ट प्रभाव दिसतो. बुद्धाप्रमाणे सॉक्रेटिसही प्रश्न विचारत असे. तो सत्ताधाऱ्यांना, धर्माधिकाऱ्यांना, तरुणांना, प्रसंगी देवांनाही प्रश्न विचारत असे. त्यामुळे शेवटी त्याला देहदंडाची शिक्षा झाली. सॉक्रेटिसने शांतपणे विषाचा पेला ओठांना लावला. सत्यासाठी त्याचे हे मरण पुढील अनेक शतके विचारवंतांना प्रेरित करत राहिले. सत्य (Truth) आणि धर्म यातील संघर्ष हजारो वर्षांपासून चालत आला आहे. धर्म एक साचेबंद व्यवस्था असते. ती बदलत नाही. सत्य मात्र जिवंत, खळखळता झरा असतो. तो सर्व जुन्या संकल्पनांना, संस्कारांना, सर्व प्रकारचे अज्ञान आणि अंधश्रद्धांना नष्ट करत जातो. त्यासाठी अर्थातच लागते ते मनाचे आणि बुद्धीचे स्वातंत्र्य, आंतरिक निर्भयता आणि सत्याची किंमत मोजण्याची सिद्धता. सत्य म्हणजे रस्ता निवडीचे स्वातंत्र्य. दिशा जाणिवा, सद्सद्विवेकाचे स्वातंत्र्य. घटनेने आपल्याला ते दिले आहे; परंतु त्यामागे लोकचळवळींचा, विचारवंतांचा, क्रांती-प्रतिक्रांतीचा शेकडो वर्षांचा इतिहास आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे. सत्य म्हणजे आहे एक निरंतर विद्रोह... बुद्ध, कबीर, तुकाराम, सॉक्रेटिस ते थेट बर्ट्रांड रसेल, आंबेडकरांपर्यंत तो आपल्याला दिसतो. ●●●

**(लेखक निवृत्त सनदी अधिकारी आहेत.)**

# विषमता - विसंवाद - विध्वंसमुक्त भारतासाठी कृती कार्यक्रम



प्रा.एच.एम. देसरडा

**वसुंधरेच्या व मानवाच्या रक्षण, संवर्धनासाठी २१ व्या शतकात परिस्थितीकी लोकशाही (इकॉलॉजिकल डेमॉक्रसी)ची गरज आहे. खरं तर, सध्याच्या चैनचंगळवादी भौतिक अर्थरचनेऐवजी परिस्थितीकी सभ्यता (इकॉलॉजिकल सिव्हीलायझेशन) हाच समतामूलक शाश्वत पर्याय आहे. हवामान आणीबाणीच्या वैश्विक संकटातून त्याखेरीज सहीसलामत सुटका होणे सुतराम शक्य नाही. अर्थात, यासाठी देशव्यापी जनआंदोलन हाच संविधानात्मक लोकशाही मार्ग आहे.**

आजमितिला अवघे जग हवामान बदलामुळे ओढवलेल्या अधिकाधिक उग्र व व्याप्त आपत्तींचा मार झेलत आहे. हिमनद्या वितळणे, समुद्राच्या पातळीत वाढ, भूस्खलन, महापूर, वादळे, वणवे, शीत व उष्ण लहरी, पीकहानी, जीवित-वित्तहानी, स्थलांतर, रोगसंक्रमण, महामारी यांसारखे उत्पात, उद्‌ध्वस्तीकरण या दरदिवशी वाढणाऱ्या महासंकटाला तोंड देत आहे. अर्थात, हा निसर्गाचा कोप अथवा शाप नसून मानवाच्या निसर्ग व्यवस्थेत अनाठायी, अविवेकी हस्तक्षेपाचा परिणाम, परिपाक आहे. होय, हे मुख्यतः मानवनिर्मित संकट आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाचा कैफ चढवून निसर्गावर 'नियंत्रण' करण्याचा जो अट्टाहास मानवाने (अधिक स्पष्ट शब्दात धन व तंत्र सत्ताधीशांनी) चालवला, त्याची ही परिणती होय. अर्थात, यात होतं काय, तर 'करे कोई, भरे कोई'!

**तापमानवाढ कशामुळे?**

४६० कोटी वर्षांत उत्क्रांत झालेल्या आमच्या पृथ्वीचे वैशिष्ट्य म्हणजे येथे स्थूल सरासरी तापमान प्रदीर्घ काळ स्थिर असणे. मात्र, औद्योगिक क्रांतीनंतर खनिज इंधनाचा बेछूट वापर आणि अन्य उत्पादन उपभोग-सेवा सुविधांच्या अचाट विस्तारामुळे तापमानवाढ होऊन ते औद्योगिक क्रांतिपूर्व काळाच्या तुलनेत १.१ अंश सेल्सिअसने वाढले आहे. वैज्ञानिकांच्या मते ते १.५ अंशावर रोखले नाही, तर अधिकाधिक भीषण आपत्ती वाढणे अपरिहार्य आहे. आयपीसीसीच्या अहवालाने ते निःसंदिग्ध शब्दांत बजावले आहे. तापमानवाढीचे मुख्य कारण कार्बन उत्सर्जन असून वातावरणातील त्याचे प्रमाण जे दशलक्ष घटकांमध्ये २८० एवढे होते, ते गत दोन दशकांत दीडपट झाले आहे. थोडक्यात, हरितगृहवायूंमुळे होणारी तापमानवाढ सत्वर रोखणे हे जगासमोरील मुख्य आव्हान आहे आणि ते पेलण्यासाठी कोळसा, तेल व वायू या जीवाश्म अगर खनिज इंधनांचा वापर सत्वर थांबवणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी आज जगात जी हायड्रोजन कार्बन ऊर्जा, वाहतूक, उत्पादन, उपभोग स्त्रोत व साधने प्रचंड प्रमाणात वापरली जातात, त्याला जाणीवपूर्वक मर्यादा घालणे गरजेचे आहे. म्हणजेच शून्य कर्बउत्सर्जन (नेट झिरो) प्रकल्पांना नियोजन व धोरणात सर्वोच्च प्राधान्यक्रम असावा. याचा अर्थ प्रचलित विकास प्रकल्प प्रक्रिया व संरचनेत आमुलाग्र बदल करणे, पर्यायी स्त्रोत व साधने वेगाने विकसित व कार्यरत करणे, हीच विकासाची मूलभूत दिशादृष्टी असावी. हवामान बदल, जलवायू, परिवर्तन म्हणजेच क्लायमेट चेंज या मानव जातीसमोरील अव्वल समस्यांविषयी आज जगभरचे वैज्ञानिक धोरणकर्ते सांगत असलेल्या प्रश्नांचे सम्यक ज्ञानविज्ञाननिष्ठ आकलन मानवाच्या भरणपोषण, योगक्षेम आणि वसुंधरेच्या रक्षण-संवर्धनाची प्राथमिक गरज आहे.

**शंभर कोटी दैन्यावस्थेत**

तात्पर्य, जी चैनचंगळवादी विकासप्रणाली व जीवनशैली विकासाच्या गोंडस नावाने आजही जगभरचे धनदांडगे रेटत आहेत. ती मानव व वसुंधरेच्या रक्षण-संवर्धनाला घातक आहे. हे कटू सत्य आम्ही आणखी किती काळ नाकारणार? मुख्य म्हणजे मानवाच्या मूलभूत गरजा भागवणे व मानवी जीवन सुलभ, आरोग्यदायी व आनंदमय बनवण्यासाठी निसर्गाचे अनाठायी दोहन व धूळधाण करणे अपरिहार्य नाही. किंबहुना, आज बहुसंख्य लोकांच्या गरजा पूर्ततेऐवजी चैनचंगळवादी वस्तू व सेवांच्या वाढविस्तारासाठी नैसर्गिक संसाधनांचा गैरवापर केला जातो. सध्या जगातील ५०% व भारतातील ७०% जनता प्राथमिक वस्तू व मूलभूत सेवांपासून वंचित आहे. भारतात तब्बल १०० कोटी (एक अब्ज) लोक अभावग्रस्त जीवन जगण्यास मजबूर आहेत. याचा अर्थ, त्यांना वंचित अगर अभावग्रस्त ठेऊन नैसर्गिक संसाधनांचा वापर मर्यादित करावा, असे खचितच म्हणणे नाही. अर्थात, समतामूलक शाश्वत विकास प्रणाली संसाधनांचा एकूण वापर न वाढवता, त्यांची वापरपद्धती मूलतः बदलून साध्य करावी लागेल. याचा अर्थ, नैसर्गिक संसाधनांचा वापर सर्वांचे समान हित व गरजांच्या पूर्ततेसाठीच केला जाईल. तात्पर्य, उत्पादन व्यवस्थेची संरचना व अग्रक्रम बदलून एकंदरीत वापर व विनियोग निसर्गाच्या पुनःनिर्मिती व धारणक्षमतेच्या मर्यादित ठेवणे नितांत गरजेचे आहे. असे करणे शक्य व आवश्यक आहे.

**पर्यायी विकास मार्ग**

१) जमीन, पाणी, वने-कुरणे (जल-जंगल-जमीन) ही सर्व संसाधने सामूहिक मालकीची असावयास हवीत. स्वातंत्र्य चळवळीत

कसेल त्याची जमीन ही मुख्य घोषणा होती. स्वातंत्र्यानंतर मर्यादित स्वरूपाचे भूसुधार कायदे झाले असले, तरी आजही ६० टक्के जमीन जे स्वतः प्रत्यक्ष कसत नाहीत (पेरणी, सोंगणी, मशागतीसाठी घाम गाळत नाहीत) त्यांच्या मालकी व नियंत्रणात आहे. त्यामुळे देशात शेतमजुरांची संख्या शेतकऱ्यांपेक्षा अधिक आहे. शेतमजूर, कूळ व बटाईदारांना मालकी तसेच वहिवाटीचे अधिकार देणारे कृषी कायदे अत्यावश्यक आहेत. अशा कृषी क्रांतीद्वारेच भारतात श्रमजीवी जनतेची लोकशाही प्रस्थापित होईल. जे शेत जमिनीबाबत तथ्य आहे, तसेच शहरी जमिनी व अन्य संसाधनांबाबत आहे, त्यांना किंबहुना त्याबाबत विषमता कैकपटीने अधिक आहे. तरीदेखील तोच समतावादी तर्क लागू करून मालकी हक्कांची फेररचना केली जावी. विषमता व शोषणमुक्त भारतासाठी ही अत्यावश्यक बाब आहे. असे केले तर अन्न व वस्त्र या मूलभूत गरजांची पूर्तता स्थानिक पातळीवर होईल व सर्वांना रोजगार मिळेल. २) आज भारतासह जगाला निसर्गस्नेही विकासमार्गाची नितांत आवश्यकता आहे. यासाठी सर्वप्रथम जीवाश्म अथवा खनिज इंधन (कोळसा, तेल, वायू) आधारित ऊर्जा, वाहतूक, उत्पादन व उपभोग पद्धतीला जाणीवपूर्वक सोडचिठ्ठी दिली पाहिजे. सुदैवाने आज खनिज इंधनाला जैव, सौर, पवन ऊर्जा हे पर्याय आहेत. विशेष म्हणजे, ते स्वस्त, सुरक्षित, विकेंद्रीतपणे व शीघ्रगतीने अमलात आणणे तंत्रज्ञानात्मकदृष्ट्या शक्य आहे. सोबतच व्यक्तिगत वापराच्या मोटार वाहनांऐवजी रेल्वे व जलमार्गाने सार्वजनिक वाहतुकीला प्राधान्य दिले पाहिजे. ३) खाद्यान्न व अन्य शेती उत्पादनांसाठी सध्या जी रसायने (खते, कीडनाशके, तणनाशके) वापरली जातात, त्याऐवजी सेंद्रिय खते, जैविक कीड नियंत्रण पद्धती, मल्चिंग आदींचा वापर केला जावा. एकसुरी पीकरचनेऐवजी (मोनोक्रॉपिंग) संमिश्र पीकपद्धती आणि फेरपालट पीकरचना अवलंब केली जावी. खाद्यान्नासह सर्व जीवनावश्यक बाबींचे उत्पादन शक्यतो परिसरात केले जावे, जेणेकरून वाहतूक, साठवणूक यासाठी लागणारी ऊर्जा, श्रम व खर्च वाचेल. ताजे, सेंद्रिय व स्थानिक अन्न हेच मानव व परिसंस्थेच्या आरोग्यासाठी गरजेचे आहे. याद्वारे जैवविविधता जोपासली जाईल. ऊस, भात, गहू या प्रचंड सिंचन, वीज, रासायनिक खते लागणाऱ्या पिकांऐवजी ज्वारी, बाजरी, नाचणी यांसारखी पोषणयुक्त तृणधान्ये व मूग, तूर, हरभरा असे कडधान्य व तेलबिया यांना भरघोस प्रोत्साहन व हमीभाव दिला पाहिजे. ऊस व धान्यापासून इथेनॉल बनवणे, म्हणजे सरळसरळ संसाधनांची बरबादी आहे. ४) गृहनिर्माण, सांडपाणी विल्हेवाट, पाणीपुरवठा, रस्ते, शाळा, दवाखाने व अन्य सामाजिक वास्तूंचे निर्माण स्थानिक बांधकाम साहित्य, श्रम व कौशल्याद्वारे केले जावे. लॉरी बेकर या वास्तूरचनाकाराने केरळ व अन्य राज्यांत या साधनांद्वारे हजारो घरे, तसेच अनेक संस्थांच्या इमारती उभ्या केल्या आहेत. नगण्य किंवा कमीत कमी सिमेंट, लोखंड, काच आदी साहित्य वापरून वास्तू निर्माण करणे हे अभियांत्रिकीचे मुख्य उद्दिष्ट असावे. त्या हेतूने अभियांत्रिकी शिक्षण, संशोधनाची मुळापासून पुनर्रचना करावी, बांधकाम संरचनेची फेरआखणी करण्यात यावी. ५) आरोग्यव्यवस्था निसर्गोपचार, परिसर हवामानानुकूल खाणपान, रहनसहन पद्धतीवर केंद्रित असावी, 'सात्विक अन्न हेच औषध; स्वच्छ परिसर हेच आरोग्य', हा आरोग्याचा मूलमंत्र असावा. जनआरोग्याला प्राध्यान्यक्रम असावा. सुपरस्पेशॅलिटी पंचतारांकित दवाखाने, हायटेक चिकित्सा तंत्राचा अनाठायी वापर, बहुराष्ट्रीय कंपन्यांची औषध मक्तेदारी आणि विमा कंपन्यांच्या विळख्यामुळे 'आजार' हा नफेखोरीचा महाउद्योग बनला आहे. यास तात्काळ कायद्याने बंधन घालण्यात यावे. ६) शिक्षण परिसर गरजा, स्थानिक उत्पादनव्यवस्था याच्याशी निगडित, तसेच लोकाभिमुख आधुनिक विज्ञान तंत्रज्ञानाशी मेळ घालणारे आणि निसर्गाशी तादात्म्य राखणारे असावे. अंगुठीकरण, विकेंद्रीकरण व व्यावसायिकरण हे शिक्षण संशोधनाचे अविभाज्य अंग असावे. निसर्ग, मानव व समाजाचे जैवनाते व परस्परावलंबन वृद्धिंगत करणे, हा शिक्षण व संसोधनाचा मुख्य गाभा असावा. उत्पादक श्रमाला सर्वोच्च प्राधान्य असावे. सध्या सामाजिक बांधिलकी शून्य प्रमाणित पोगांपंडिताचा सुळसुळाट ही शिक्षण व्यवस्थेला लागलेली कीड समूळ नष्ट करणारे शिक्षण धोरण आवश्यक आहे. संख्या, गुणवत्ता व समता यांचा सांधा जुळवून सर्वांना जीवनोपयोगी कसब, कौशल्य व मूल्य देणारे शिक्षण ही आज काळाची गरज आहे. ७) साहित्य, संगीतासह सर्व कला अवगत करण्यासाठी प्रत्येकास भरपूर सुविधा, साधने व सवड असावी. प्रत्येक व्यक्तीच्या प्राथमिक गरजा हमखास भागण्याची समाजव्यवस्था, अर्थकारण, मजबूत असल्यास प्रत्येक स्त्री-पुरुषाला आपल्या कलागुणांचे सर्जन करण्यास साधने व संधी प्राप्त होईल. सुखी, समाधानी, सुसंस्कृत समाजाची ही नांदी आहे. ८) आर्थिक व राजकीय सत्तेचे संपूर्ण विकेंद्रीकरण केले जावे. ७३ व ७४ व्या घटनादुरूस्तीत स्थानिक स्वराज्य संस्थाना असलेले संविधानात्मक अधिकार व त्याच्या क्रियान्वयानासाठी आवश्यक सुसंगत निर्णय व नियम बनवून आर्थिक तरतुदी व अंमलबजावणी यंत्रणेसह स्थानिक प्रशासनाकडे सुपूर्द केले जावेत. स्थानिक स्वराज्य संस्थांप्रमाणेच विधिमंडळे व संसदेत महिलांना किमान ४० टक्के जागा राखीव असाव्यात. त्यात आदिवासी, दलित, ओबीसी महिलांना प्रमाणशीर आरक्षण असावे. ९) सध्याची निवडणूक पद्धत 'प्रतिस्पर्ध्यापेक्षा एक मत जास्त' या तत्त्वावर आधारेली असल्यामुळे पक्षांना मिळणाऱ्या जागा व मतं यात विसंगती असते. त्याऐवजी प्रमाणशीर प्रतिनिधित्त्वाची पद्धत (मत प्रमाणात जागा) अमलात आणणारी निवडणूक सुधारणा करण्यात यावी. निवडणूक निधीद्वारे सामान्य नागरिकांना निवडणूक लढविण्यास साधने दिली जावीत. तरच लोकशाही ही खऱ्या अर्थी जनतेची लोकशाही बनू शकेल. वसुंधरेच्या व मानवाच्या रक्षण, संवर्धनासाठी २१ व्या शतकात परिस्थितीकी लोकशाही (इकॉलॉजिकल डेमॉक्रसी)ची गरज आहे. खरं तर, सध्याच्या चैनचंगळवादी भौतिक अर्थरचनेऐवजी परिस्थितीकी सभ्यता (इकॉलॉजिकल सिव्हीलायझेशन) हाच समतामूलक शाश्वत पर्याय आहे. हवामान आणीबाणीच्या वैश्विक संकटातून त्याखेरीज सहीसलामत सुटका होणे सुतराम शक्य नाही. अर्थात, यासाठी देशव्यापी जनआंदोलन हाच संविधानात्मक लोकशाही मार्ग आहे.

●●●

**(लेखक नामवंत अर्थतज्ज्ञ, महाराष्ट्र नियोजन मंडळाचे माजी सदस्य आहेत.)**

पाक्षिक

स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्यायासाठी

# द पीपल्स पोस्ट

## वार्षिक वर्गणीदारांना

**२०%**

## सवलत!

### देश आणि राज्यातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक घटनांचा वेध घेणारे निपक्षः निर्भीड पाक्षिक

---

**हो, मी "द पीपल्स पोस्ट" चा वर्गणीदार बनू इच्छितो!**

खाली आपल्या आवडीच्या ऑफरवर निषाण लावून वाचक-वर्गणीदारचा फॉर्म भरून खालील पत्त्यावर पाठवावा सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद - ४३१००१

| टिक करा | अवधि | एकूण अंक | कव्हर किंमत (रू.) | आपल्याला द्यावे लागतील (रू.) | |
|---|---|---|---|---|---|
| ☐ | १ वर्ष | २४ | ९६० | ८०० | |
| ☐ | ६ महिने | १२ | ४८० | ४०० | |
| ☐ | ३ महिने | ६ | २४० | २०० | |

(वार्षिक विशेषांक - ४) / (६ महिने - २)

**चेक किंवा डीडी ने पेमेंट**

मी 'द पीपल्स पोस्ट' च्या नावाने पाठवत आहे. -------------------- दिनांक -------- (बँकेचे नाव) ----------------

चेक/डीडी क्र. --------------------.

किंवा माझ्या क्रेडीट कार्ड ने वसूल करा ☐ MasterCard ☐ VISA ☐ AMERICAN EXPRESS कार्ड नं. ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

कार्डधारकाचे नाव : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ कार्ड एक्सपायरी दिनांक : ---- महिना---- वर्ष-----

कार्डधारकाची स्वाक्षरी : ------------------------------ जन्म तारीख : ---------- दिवस----- महिना----- वर्ष-----

नाव : ------------------------------------------------ पत्ता : ------------------------------

------------------------------------------------ शहर : ------------------------------------

राज्य : ---------------------- पिन कोड : ------------------ फोन नं. (घर) : ----------------------

मो. नं. : ---------------------- इ-मेल : ------------------------------------------------

आपण या माध्यमांद्वारेही सबस्क्राईब करू शकता

व्हॉट्स अप क्रं. ८८८८५४१८२२ किंवा ७३५००९१५६९ क्र. वर फोन करा:

इ-मेल करा thepeoplespost2014@gmail.com

लॉग ऑन करा peoplespost.in

कृपया लक्ष द्या : ही ऑफर मर्यादीत कालावधीसाठी आहे. द पीपल्स पोस्ट यांच्याकडे ह्या ऑफरशी संबंधीत कुठल्याही नियम व अटींना कमी करणे किंवा वाढवण्याचे अधिकार आरक्षित आहेत.


# उत्क्रांती : एक निखळ वास्तव



प्रा. जयप्रकाश म्हात्रे

**सांप्रतकाळी प्रागतिक विचारांची व विज्ञानाची चाके उलटी फिरवण्याचा उद्योग शासनाच्या आशीर्वादाने होताना दिसत आहे. याचे ताजे उदाहरण म्हणजे डॉ. अरुण गद्रे यांचे 'उत्क्रांती एक वैज्ञानिक अंधश्रद्धा?' हे नुकतेच प्रसिद्ध झालेले पुस्तक आणि त्याला महाराष्ट्र शासनाने महात्मा फुले यांच्या नावाने असलेला पुरस्कार देऊन या पुस्तकाचा केलेला गौरव. वरवरून वैज्ञानिक भासणाऱ्या या तद्दन अवैज्ञानिक पुस्तकाला पुरस्कार देऊन महाराष्ट्र शासनाने अत्यंत चुकीचा व घातक पायंडा पाडलेला आहे आणि म्हणूनच या अदखलपात्र पुस्तकाची दखल घेणे भाग पडत आहे.**

डॉ. अरुण गद्रे हे निष्णात शल्यचिकित्सक असून आरोग्य क्षेत्रात त्यांचे चांगले योगदान आहे. त्यांनी काही चांगले लिखाणही केलेले आहे; परंतु त्यांचे हे पुस्तक अंधश्रद्धांना खतपाणी घालणारे असून विज्ञानाची चाके उलटी फिरवणारेही आहे आणि म्हणून त्याचा परामर्श घेणे व प्रतिवाद करणे हे प्रत्येक विचारी व्यक्तीचे व समाजाचे कर्तव्य होऊन बसते. चार्ल्स डार्विन यांच्या उत्क्रांती सिद्धांताला आक्षेप घेणारे व टीका करणारे डॉ. अरुण गद्रे हे काही पहिले व्यक्ती नव्हेत. अगदी डार्विनच्या काळापासून ते आजतागायत ही टीका सुरूच आहे. तथापि, आजवर झालेल्या संशोधनातून या टीकेला परस्पर उत्तरे मिळालेली असून डार्विनचा उत्क्रांतीचा सिद्धांत हे एक वैज्ञानिक सत्य म्हणून आता मान्यता पावलेले आहे.




**डार्विनचा सिद्धांत**

चार्ल्स डार्विन यांनी सन १८३१ ते १८३६ या पाच वर्षांच्या प्रदीर्घ सागरी मोहिमेनंतर व प्रदीर्घ निरीक्षण-परीक्षण पडताळा व निष्कर्ष या वैज्ञानिक कसोट्या पार करून १८५९ मध्ये 'ओरिजीन ऑफ स्पिसिज बाय नॅचरल सिलेक्शन' हा ग्रंथ पूर्ण करून प्रकाशित केला. त्यात त्यांनी सजीवांच्या उत्पत्ती व उत्क्रांतीसंबंधात सिद्धांत कथन केला. तो थोडक्यात पुढीलप्रमाणे:

- सजीवांमध्ये प्रचंड प्रमाणात प्रजोत्पादन करण्याची क्षमता असते. प्रचंड मोठ्या संख्येने सजीवांना जन्मदेतात. इतक्या मोठ्या संख्येला पुरेल एवढे अन्न उपलब्ध नसल्याने त्यांच्यामध्ये अन्न मिळवण्यासाठी धडपड सुरू होते. या धडपडीतून अन्न मिळवण्यासाठी स्पर्धा सुरू होते. या स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी सजीव आपल्या शारीरिक गुणात बदल करतात व आपली अन्न मिळवण्यासाठी क्षमता वृद्धिंगत करतात. ज्या सजीवांना हे शक्य होते, तेच सजीव भोवतालाशी समायोजन करू शकतात व स्पर्धेत यशस्वी होतात. जे सजीव असे बदल करू शकत नाहीत, ते भोवतालाशी समायोजन करू शकत नाहीत आणि म्हणून ते नष्ट होतात. भोवतालाशी जुळवून वा समायोजन करू शकणारे गुण टिकून राहतात व सजीवांना नव्या पर्यावरणात तगून राहण्यासाठी सक्षम करतात. पिढ्यान्‌पिढ्यांच्या संक्रमणातून अशा गुणांचा संच तयार होतो व अशा संचातून नव्या प्रजाती उदयास येतात. बदलत जाणाऱ्या पर्यावरणाशी जे गुण जुळवून घेतात, अशा गुणांची निवड निसर्ग करीत राहतो. यालाच नैसर्गिक निवड असे म्हणतात. पिढ्यान्‌पिढ्यांच्या नैसर्गिक निवडीतून व्यामिश्र सजीव निर्माण होत गेले व ही सृष्टी अनेक विविध सजीवांनी बहरून गेली.
- सुरुवातीच्या साध्या सजीवापासून कोट्यवधींच्या निसर्ग निवडीच्या प्रक्रियेतून व्यामिश्र सजीव क्रमाक्रमाने उदयास आले. गुण एका पिढीतून पुढील पिढीत संक्रमित होत जातात हे जरी डार्विनने प्रतिपादन केले असले, तरी ते कसे होतात हे त्याने सांगितले नव्हते. ते पुढे डार्विनचा समकालीन ऑस्ट्रियन धर्मगुरू ग्रेगर जॉन मेंडेल याने आपल्या चर्चच्या बगीचामध्ये केलेल्या वाटाण्याच्या वेलीवरील प्रयोगातून सांगितले, की हे गुण सजीवांच्या पेशीत असलेल्या घटकातून संक्रमित होतात. हे घटक म्हणजेच जनुके (Genes) होत, असे पुढील प्रयोगातनू सिद्ध झाले. जनुके जीव रेणूंनी (DNA-Deoxyribo Nucleic Acid) बनलेली असतात, हेही नंतर शास्त्रज्ञाने शोधून काढले.


१९५३ मध्ये वॉटसन आणि क्रिक या शास्त्रज्ञांनी या जीव रेणूची (DNA) रचना शोधून काढली. सुमारे साडेतीनशे कोटी वर्षांपूर्वी पृथ्वीवरील विविध अणूंपासून जीव रेणू तयार झाला व हा जीव रेणू स्वतःचे पुनरुत्पादन करू लागला व त्यातून पुढे पेशी व त्या पेशीपासून अनेक सजीव निर्माण होत गेले. हा सर्व इतिहास शास्त्रज्ञांनी अथक संशोधनातून जगापुढे उघड केलेला आहे.

**उत्क्रांतीचे पुरावे**

- सुरुवातीच्या साध्या एकपेशीय सजीवापासून ते आताच्या आधुनिक मानवापर्यंतच्या सर्व व्यामिश्र सजीवांमध्ये जो मूलभूत रेणू आहे, तो म्हणजे जीव रेणू (DNA)
- जीव रेणू अणूंच्या व्यामिश्र रचनातून विविध जनुके निर्माण होत गेली व या जनुकांपासून विविध सजीव निर्माण होत गेले. अशा अनेक सजीवांचे जनुकीय नकाशे तयार करण्यात शास्त्रज्ञांना यश आलेले आहे. मानवाचा जनुकीय नकाशा इ.स. २००० मध्ये पूर्ण करण्यात आलेला आहे.
- चिंपांजी व मानव यांचा ९८.५ टक्के जीव रेणूसारखा आहे. सुमारे ७० लाख वर्षांपूर्वी चिंपांजी व मानव यांचा समान पूर्वज विभक्त होऊन चिंपांजी व मानवी प्रजाती विभक्त झाल्या याचा हा पुरावा होय.
- समान पूर्वज व आधुनिक मानव यांच्यामधील जवळजवळ ३१ उत्क्रांतशील मानवी प्रजातींचे जीवाश्म हुडकून काढण्यात शास्त्रज्ञांना यश आलेले आहे.
- सरपटणारे प्राणी व उडणारे पक्षी यातील दुवा Archaeopteryx या प्राण्याचे जीवाश्म जर्मनीमध्ये डार्विनच्या सिद्धांतानंतर सापडलेले आहेत. या उडणाऱ्या प्राण्यात सरपटणारे प्राणी व उडणारे पक्षी या दोघांचे गुण दिसून आले आहेत.
- पाच लाख वर्षांपूर्वी उदयास आलेला आपला नजीकचा पूर्वज होमोनीअंडरटेरेन्सिस याचा जीव रेणू व आपला जीव रेणू ९९.५ टक्के सारखा आहे. अलीकडच्या काळापर्यंत म्हणजे सत्तावीस हजार वर्षांपूर्वीपर्यंत फ्रान्स व स्पेन येथील गुहेत राहात असल्याचे पुरावे सापडलेले आहेत.
- तीन लाख वर्षांपूर्वी उदयास आलेला आणखी एक आपला नजीकचा पूर्वज होमोडेनिसोव्हा याचा जीव रेणू व आपला जीव रेणू ९९.८ टक्के सारखा आहे. त्याचे अवशेष सायबेरियातील अल्ताई पर्वतराजीतील गुहेत अलीकडेच सापडलेले आहेत व तो ११००० वर्षांपूर्वीपर्यंत अस्तित्वात होता.
- गेल्या ७० वर्षांत जनूकशास्त्राने व रेणवीय जीवशास्त्राने पुराव्यांचे ढिगारे उत्क्रांतीच्या बाजूने सादर केलेले आहेत व ते अजून सादर होत आहेत.

**बिनबुडाचे अक्षय व धर्मसंस्थांचा थयथयाट**

इ.स. १८५९ मध्ये डार्विनचा उत्क्रांती सिद्धांत जगासमोर आल्यानंतर एकच खळबळ उडाली. इंग्लंडमध्ये एक उमराव पत्नी इतकी घाबरली, की जीवसृष्टी परमेश्वराने निर्माण केली नसून ती उत्क्रांतीने घडत आली हे सत्य लोकांपर्यंत पोहोचले, तर हाहाकार उडेल व लोकांचा परमेश्वरावरील विश्वास उडेल. म्हणून उत्क्रांतीचा हा सिद्धांत लोकांपासून लपवून ठेवायला हवा, असे तिने आपल्या



पतीला सांगितले. इंग्लंडच्या चर्चचे मुख्य धर्मगुरू विल्यम विल्बर फोर्स हे खूप संतापले व त्यांनी डार्विनवर बहिष्कार टाकला. ३० जून १८६० रोजी ऑक्सफर्ड विद्यापीठात डार्विनच्या उत्क्रांतीवादावर वादविवाद आयोजित करण्यात आला होता. ईश्वरनिर्मित सृष्टीचे समर्थक विल्यम विल्बर फोर्स व उत्क्रांतीनिर्मित सृष्टीचे समर्थक थॉमस हक्सले यांच्यात जोरदार खडाजंगी झाली. विल्बर फोर्स यांनी बायबलच्या आधारे सृष्टीचे वयही निश्चित केले होते. त्यांच्या प्रतिपादनानुसार विश्व ४,००० वर्षांपूर्वी निर्माण झाले होते व जीवसृष्टी केवळ सात दिवसांत निर्माण झालेली होती. एवढी जकड वेळ व व्यामिश्र जीवसृष्टी क्रमाक्रमाने निर्माण होणे केवळ अशक्य असून ती परमेश्वरानेच निर्माण केली.

थॉमस हक्सले यांनी, पुराव्यानिशी जीवसृष्टी ही साध्या जीवापासून ते आताच्या माणसापर्यंत क्रमाक्रमाने उत्क्रांत होत गेली, असे ठामपणे प्रतिपादन केले. आधुनिक मानव मर्कट प्रजातीपासून उत्क्रांत झाला हेही त्यांनी पुराव्यानिशी सांगितले. धर्मग्रंथाशिवाय दुसरा कोणताच पुरावा विल्बर फोर्स यांच्याकडे नव्हता आणि त्यांनी संतापाने आणि कुचेष्टेने हक्सले यांना प्रतिसवाल केला, की त्यांचे पूर्वज म्हणजे आजी-आजोबा मर्कट प्रजातीतून उत्क्रांत झाले असतील, तर नेमके कोणत्या माकडापासून तुम्ही जन्माला आलात असे हक्सले यांना विचारले. सभागृहातील विद्वान श्रोत्यांना कळून चुकले, की विल्बर फोर्स हे हरले आहेत.

**निर्मितीवाद (Creationism) आणि बुद्धिमान अभिकल्प (Inrelligent Design)**

सृष्टीचा जगड्व्याळ व गुंतागुतीचा व्यामिश्र पसारा नसैर्गिक निवडीतून उत्क्रांत होणे शक्य नाही, असे म्हणणाऱ्यांनी निर्मितीवादाचा व बुद्धिमान संकल्पाचा पोकळ पर्याय देण्याचा केविलवाणा प्रयत्न केलेला आहे. बायबलमधील लिखाणानुसार, ईश्वराने सहा दिवसांत सृष्टीची निर्मिती केली हा निर्मितीवाद पुढे नेत विल्यम पॅले या अठराव्या

शतकातील धर्मगुरूने बुद्धिमान अभिकल्पाची संकल्पना मांडली. त्यासाठी त्याने गवताच्या गंजीत सापडलेल्या घड्याळाचे उदाहरण दिले. एवढे सुंदर नीटनीटके घड्याळ पूर्व अभिकल्पाशिवाय तयार होऊ शकत नाही व तो अभिकल्प तयार करणाऱ्या (Designer) शिवाय निर्माण होऊ शकत नाही, अशी बिनतोड वाटणारी मांडणी पॅलेने केली. सृष्टी निर्माण करणारा हा निसर्गाचा घड्याळ (Nature's Watch maker) ही सुंदर सृष्टी निर्माण झाली असे जोरदार प्रतिपादन त्यांनी केले. १९३० च्या दशकात अमेरिकेत उत्क्रांतीविरोधी चळवळच उभी करण्यात आली होती. १९९० च्या दशकात रेण्वीय जीवशास्त्रज्ञ मायकेल बेहे याने त्यापुढेही जाऊन निसर्गातील काही घटिते डार्विनच्या निसर्ग निवडीने घडू शकत नाहीत, असे प्रतिपादन केले व त्यासाठी त्यांनी तीन उदाहरणे दिली –


१) इ कोलाय या जिवाणूची हालचालीस उपयुक्त ठरणारी शेंडी (Flagellim)

२) रक्त गोठण्याची क्रिया (Blood Coagulation)

३) रोगप्रतिबंधक शक्ती (Immunity)

वरील उदाहरणे देऊन मायकेल बेहे यांनी कधीही कमी न होणाऱ्या व्यामिश्रतेचा (Irreducible Complexity) सिद्धांत मांडला. त्यांच्या मते, जीवसृष्टीतील विविधता व रेण्वीय पातळीवरील आत्यंतिक व्यामिश्रता व गुंतागुंतीची प्रक्रिया यांचे स्पष्टीकरण नैसर्गिक निवडीचा सिद्धांत देऊ शकत नाही; परंतु त्यांची ही मांडणी अतार्किक असून साध्या रचना व साध्या क्रिया यापासूनच क्रमाक्रमाने व्यामिश्र गुंतागुंतीच्या रचना व क्रिया उन्नत होत जातात, या सिद्ध झालेल्या कार्यपद्धतीला छेद देणाऱ्या आहेत. उदाहरणार्थ, मानवी डोळ्याची निर्मिती ही कोट्यवधी वर्षांच्या एकपेशीय डोळ्यापासून झाली, हे डोळ्याच्या उत्क्रांतीचा अभ्यास केल्यानंतर सहज लक्षात येते. सुरुवातीच्या साध्या प्राण्यांचे डोळे एकपेशीय होते. त्यानंतर ते द्वीपेशीय झाले व पुढे पुढे ते अनेकपेशीय होऊन नंतर व्यामिश्र व गुंतागुंतीची रचना असलेले व कार्यपद्धती असलेले मानवी डोळे निर्माण झाले. झुरळांसारखे अकणाआधारित प्राणी व माशांसारखे कणाधारी प्राणी अशा विविध प्राण्यांच्या डोळ्यांचा अभ्यास केला असता हे सहज लक्षात येते. म्हणून बेहे यांचा सिद्धांत अतार्किक ठरतो. ही सर्व हुशार मंडळी बायबलच्या प्रभावाखाली असल्याने हे घडत आहे. धार्मिक प्रभावाखाली असलेल्या अशा प्रकारच्या तथाकथित विद्वानांचा आपल्याकडे तर सुकाळच!

आंध्र प्रदेशातील एका कुलगुरूने तर आपले दशावतार पुराण हे डार्विनच्या उत्क्रांतीवादापेक्षा किती तरी श्रेष्ठ आहे, असे उद्‌गार काढलेले होते. त्यांच्याच रांगेत आता डॉ. अरुण गद्रे बसले आहेत. त्यांचे 'उत्क्रांती एक वैज्ञानिक अंधश्रद्धा?' त्यातलाच एक नमुना होय. हे पुस्तक दखलपात्र नाही; परंतु महाराष्ट्र शासनाने त्याला महात्मा फुले यांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार प्रदान केला म्हणून त्यावर भाष्य करणे गरजेचे वाटले. अनेक शास्त्रज्ञांच्या संशोधनांचे चुकीचे अर्थ काढून त्यांनी सर्वसामान्यांची दिशाभूल करण्याचा जोरदार प्रयत्न केलेला आहे. डार्विनचा विजय तसेच डार्विनचा पराजय अशा कोलांटउड्याही त्यांनी मारलेल्या आहेत.



आणि शेवटी जगड्व्याळ व वैविध्यपूर्ण जीवसृष्टी उत्क्रांतीने निर्माण होऊ शकत नाही, असा जावईशोधही लावलेला आहे. कोणी तरी निर्मिकाने बुद्धिमान संकल्प तयार करून ही सृष्टी निर्माण केली, असे ते आवर्जून सांगतात. आपल्या प्रतिपादनाला वजन प्राप्त व्हावे, म्हणून संशोधकांच्या संशोधनांचा चुकीचा वापर त्यांनी केलेला आहे. पेशाने डॉक्टर असलेल्या गद्रेंवर ख्रिस्ती धर्माचा प्रभाव आहे व त्या प्रभावामुळेच त्यांनी हे धाडस केलेले आहे. चांगले लेखक असल्याने खरे तर त्यांनी या विषयावर धर्मग्रंथ लिहिणे उचित ठरले असते; परंतु त्यांनी हे न करता वैज्ञानिक वास्तवांना अंधश्रद्धा म्हणण्याचे धाडस केले आहे. खरे तर, त्यांनी बुद्धिमान अभिकल्प व त्या अभिकल्पाला जन्म देणाऱ्या अभिकल्पकर्त्याचा शोध लावला असता, तर त्यांना निश्चित नोबेल पारितोषिक मिळाले असते.

**उत्क्रांती हा ऐतिहासिक दस्तऐवज तर नैसर्गिक निवड हा सिद्धांत**

डेव्हिड अटेंनबरो हे बीबीसीवर वैज्ञानिक मालिका सादर करणारे प्रसिद्ध संशोधक व संयोजक. त्यांना एका मुलाखतकर्त्याने उत्क्रांतीविषयी प्रश्न विचारला असता, त्यांनी त्यावर "Evolution is history and natural selection is theory of life" असे उत्तर दिले. म्हणजे उत्क्रांती हा सजीवांचा इतिहास असून नैसर्गिक निवड हा या इतिहासाचा सिद्धांत आहे. आत्तापर्यंत सापडलेले सजीवांचे जीवाश्म या इतिहासाला दुजोरा देणारेच आहेत. जीव रेणूच्या रचनेचा शोध लागल्यानंतर तर उत्क्रांतीच्या बाजूने पुराव्यांचे ढीगच शास्त्रज्ञांनी सादर केलेले आहेत. तथापि, उत्क्रांतीचा प्रवास हा कधीच सरळ सोपा नव्हता व नाही. स्टीफन जे गोल्ड या अमेरिकन शास्त्रज्ञाने सखोल अभ्यासांती असा निष्कर्ष काढला आहे, की उत्क्रांतीची प्रक्रिया वळणावळणाची व खाचखळग्यांची आहे. प्रजातींच्या सलग दीर्घ अस्तित्वानंतर पर्यावरण बदलाच्या दबावाने त्या प्रजातीत उत्परिवर्तने (Mutations) होतात व त्यामुळे नव्या प्रजाती उदयास येतात. या प्रक्रियेला ते खंडित समतोल (Punctuated Equilibrium) म्हणतात. ही खंडित समतोलाची प्रक्रिया कोट्यवधी वर्षांतून सातत्याने घडत आली व त्यातून नवनव्या प्रजाती उदयास येत गेल्या, तर काही जुन्या प्रजाती कायमच्या नष्ट झाल्या.

बुद्धिमान अभिकल्प व निर्मितीवाद या संकल्पना छद्म विज्ञान असल्याचा निष्कर्ष जाणत्या व ज्यांच्यावर धार्मिक प्रभाव नाही अशा शास्त्रज्ञांनी व विचारवंतांनी काढलेला आहे. उत्क्रांती ही निखळ वास्तव व विज्ञानाने सिद्ध केलेली प्रक्रिया आहे, हे सत्य आता प्रस्थापित झालेले आहे. ●●●

**(लेखक प्राणिशास्त्राचे अभ्यासक व संशोधक आहेत.)**

# जवाहरलाल नेहरू विरुद्ध नरेंद्र मोदी



शेषराव चव्हाण

**नेहरूंना भारताचे भविष्य व महानतेची दृष्टी होती. राष्ट्रांच्या समुदायात भारताला मानाचे स्थान मिळावे, अशी त्यांची इच्छा होती; परंतु भारत लष्करीशक्ती बनावा यासाठी त्यांनी कधीही जोरदार प्रयत्न केले नाहीत आणि स्वातंत्र्य उदयास आल्यानंतर इतर अनेक देश ज्या चंगळवादाला बळी पडले, त्यापासून ते विलक्षणपणे मुक्त होते.**

**(मागील अंकातून)** अखेरीस त्यांनी नम्रपणे माघार घेतली. नेहरू भविष्याचे नियोजन करण्यासाठी नव्या समर्पणाने स्वार झाले. त्यांना त्यांच्या स्वप्नातील भारत घडवण्याची घाई झाली होती.

**क्रांती ही अराजकतेवर आधारित नाही**

विस्तार आणि सामुदायिक विकास कार्यक्रमाचे उद्‌घाटन करताना नेहरू म्हणाले, ''आज येथे सुरू केलेले कार्य, ज्या क्रांतीबद्दल काही लोक खूप दिवसांपासून ओरडत होते आणि त्याची भुरळ घालत होते; पण ही क्रांती अराजकता आणि डोके फोडण्यावर आधारित नाही, तर गरिबी निर्मूलनाच्या निरंतर प्रयत्नांचा भाग आहे.'' ते पुढे म्हणाले, ''गेल्या काही वर्षांमध्ये भारतातील समुदाय विकास प्रकल्पासारख्या योजना, इतके क्रांतिकारक असे जगातील कोणत्याही देशात घडलेले नाही.''

जेव्हा नेहरूंच्या असंलग्नतेच्या धोरणावर आघात झाला, तेव्हा ते म्हणाले, ''नेहरू जरी वेडे झाले तरी काँग्रेस आणि देश असंलग्नता आणि समाजवादाच्या धोरणापासून दूर जाणार नाही.'' ते पुढे म्हणाले, ''आम्ही आमचे धोरण कधीही बदलणार नाही. जर एखाद्याला आम्हाला चांगले सहकार्य करायचे नसेल, तर त्यांनी त्यांची भूमिका वठवावी. आम्ही कोणत्याही मदतीशिवाय पुढे जाऊ.''

जेव्हा काहींनी असंलग्नता म्हणजे तटस्थता असा गैरसमज केला, तेव्हा नेहरू म्हणाले, ''आम्ही वास्तवाकडे अंधपणे पाहत नाही किंवा माणसाच्या स्वातंत्र्याच्या कोणत्याही आव्हानाला स्वीकारण्याचा प्रस्ताव देत नाही, जिथे स्वातंत्र्य धोक्यात आले आहे किंवा न्याय धोक्यात आला आहे किंवा जिथे आक्रमकता आहे. त्या ठिकाणी आपण तटस्थ राहू शकत नाही आणि असू शकत नाही.''

**नेहरूंनी लोकशाही भक्कम केली**

स्वतंत्र भारताच्या उभारणीत नेहरूंच्या उल्लेखनीय योगदानांपैकी एक म्हणजे त्यांनी प्रशासनाला दिलेली एकता आणि स्थिरता. त्यांचे व्यक्तिमत्व स्वतःच एक मजबूत असे घटक होते. नेहरूंनी राज्याधिकाऱ्यांपासून खेड्यापाड्यातील पंचायतींपर्यंत सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा महान प्रयोग सुरू केला. यामुळे लोकशाहीच्या भक्कम इमारतीचा पाया घातला गेला.

**नेहरूंमुळे देशात औद्योगिक व वैज्ञानिक प्रकल्प शक्य झाले**

नेहरूंना विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या विकासातील भूमिकेबद्दल खूप अंतर्ज्ञानी भावना होती. त्यांचा प्रामाणिकपणे असा विश्वास होता,



की विज्ञानाची गंभीर बांधिलकी लोकांच्या भावना आणि मनाला प्रज्वलित करून नवीन राष्ट्राच्या विकासाची भावना बनू शकते. जलद बदल घडवून आणण्यासाठी विज्ञान हे प्रमुख साधन असावे. त्यांनी म्हटल्याप्रमाणे, ''विज्ञान म्हणजे केवळ परीक्षा नळ्याच्या चाचण्या पाहणे किंवा विविध वायूंचे मिश्रण करणे आणि मोठ्या किंवा लहान गोष्टी निर्मिती करणे नव्हे. विज्ञान हे शेवटी मन आणि बुद्धी यांना प्रशिक्षित करण्याचा एक मार्ग आहे आणि त्यानुसार संपूर्ण आयुष्य व्यतीत करणे होय.''

मोठ्या प्रमाणावरील वैज्ञानिक आणि औद्योगिक प्रकल्पांचे प्रभावीपणे कार्य करण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ आणि कुशल तरुण पुरुष आणि महिलांच्या गटाची आवश्यकता असेल, या वस्तुस्थितीची नेहरूंना जाणीव होती. सर नलिनी रंजन सरकार यांच्या अध्यक्षतेखाली २२ सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आणि भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटीएस)च्या प्रतिष्ठित नेटवर्कची सुरुवात करण्यासाठी त्याचा अहवाल ब्ल्यूप्रिंट म्हणून वापरण्यात आला. पश्चिम बंगालमधील खरगपूरजवळील हिजली डिटेन्शन कॅम्पच्या जागेवर १९५० मध्ये स्वातंत्र्यानंतर अवघ्या तीन वर्षांनी पहिली आयआयटी स्थापन करण्यात आली. १९५६ मध्ये पहिल्या दीक्षांत समारंभात बोलताना नेहरू म्हणाले, ''येथे हिजली डिटेन्शन कॅम्पच्या जागी भारताचे उत्कृष्ट स्मारक उभे आहे, जे भारताच्या गरजांचे प्रतिनिधित्व करते, भारताचे भविष्य घडवत आहे. हे चित्र मला येणाऱ्या बदलांचे प्रतीक वाटते.'' प्रादेशिक समतोल

राखण्यासाठी १९६१ पर्यंत मुंबई, मद्रास, कानपूर आणि दिल्ली येथे आणखी चार आयआयटी स्थापन करण्यात आले.

गरीब आणि आर्थिकदृष्ट्या शोषितपणाचा वारसा भारताला असल्याने, अन्न उत्पादनात स्वावलंबन आणि स्वयंपूर्णतेच्या कल्पनेसाठी नेहरू अत्यंत कटिबद्ध होते. स्वातंत्र्यलढ्यातील वचने आणि मूल्ये यांना ते निःसंशयपणे समर्पित होते आणि ते पूर्ण करण्याची त्वरा करीत होते. कृषी उत्पादन वाढवण्यासाठी त्यांनी सिंचनासाठी मोठ्या धरणांची योजना आखली, जी खरोखरच अपरिहार्य होती.

सोव्हियत-शैलीच्या पंचवार्षिक योजनांच्या मालिकेमुळे बहुउद्देशीय नदी नियंत्रण कार्ये झाली, ज्यात पश्चिम बंगाल आणि बिहार (आताचे झारखंड)मधील दामोदर व्हॅली प्रकल्प, अमेरिकेच्या टेन्नेसी व्हॅली प्राधिकरणाने प्रेरित केलेला आणि ओडिशामधील हिराकुंड प्रकल्प, १.५ दशलक्ष एकर सिंचनासाठी आरेखित केलेली शेतजमीन, पूर टाळण्यासाठी आणि सुपीक पंजाबमध्ये पाणी आणि वीज वाहून नेण्यासाठी केलेले उपक्रम, हिमाचल प्रदेशातील बिलासपूरमधील सतलज नदीवर १,७०० फूट खोऱ्यात पसरलेले भाक्रा धरण, जे की सर्वांत आश्वासक होते. १९६३ मध्ये अतिशय महत्वाच्या भाक्रा धरण प्रकालाबद्दल नेहरूंनी म्हटले, 'स्वतंत्र भारताचे मंदिर, ज्याची मी पूजा करतो.'

नेहरूंच्या सातत्यपूर्ण आणि उत्स्फूर्त राजकीय पाठिंब्यामुळे देशाच्या गंभीर स्वरूपाच्या टप्प्यात वैज्ञानिक आणि औद्योगिक प्रकल्प शक्य झाले. त्यांच्या १७ वर्षांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात विविध क्षेत्रातील ४५ हून अधिक प्रयोगशाळा सुरू करण्यात आल्या.

नेहरूंनी आयुष्यभर वैज्ञानिक वृत्तीशी बांधिलकीचा पुनरुच्चार केला. त्यांचे याबद्दलचे एक निरीक्षण, ''परिस्थितीने मला विज्ञानाशी जोडले असले, तरी माझे विचार उत्कटतेने त्याकडे वळाले. अनेक वळणांद्वारे मी पुन्हा विज्ञानाशी जोडलो गेलो. जेव्हा मला समजले, की विज्ञान केवळ एक आनंददायी विचलन आणि अमूर्तता नाही तर जीवनाची रचना होती, ज्याशिवाय आपले आधुनिक जग नाहीसे होईल. राजकारणाने मला अर्थशास्त्राकडे नेले. यामुळे मला अपरिहार्यपणे आपल्या सर्व समस्या आणि स्वतःच्या जीवनाकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहणे महत्वाचे वाटते.''

**नेहरूंनी अहिंसा व सहिष्णुता या तत्त्वांना महत्त्व दिले**

परराष्ट्र धोरणाच्या क्षेत्रात नेहरूंनी अहिंसा आणि सहिष्णुता या प्राचीन तत्त्वांना महत्व दिले, जे की 'पंचशील' या सिद्धांतापैकी एक आहेत. या तत्त्वांना जगातील अनेक देशांनी स्वीकारलेले आहे. जागतिक घडामोडींमध्ये क्रांती घडवून आणण्याचे स्वप्न नेहरूंनीही पाहिले. गरीब राष्ट्रांचा आवाज ऐकला जावा, अशी त्यांची इच्छा होती आणि श्रीमंत देशांकडून केवळ शाब्दिक मुत्सद्देगिरी करून बोलले जाऊ नये. त्यांच्या या विवेचनामुळे, भारताचा पदनाम 'मागास' ते 'विकसनशील' राष्ट्र असा बदलला गेला. अगदी शेवटपर्यंत भारतीय स्वातंत्र्याला विरोध करणारे विन्स्टन चर्चिल यांनीही अखेरीस नेहरूंचे 'आशियातील तेज' असे वर्णन करून तिसऱ्या जगात त्यांच्या पूर्वश्रेष्ठत्वाला मान्यता दिली.

नेहरू हे सोव्हिएत युनियनशी असलेल्या विशेष संबंधांचे शिल्पकार होते. मॉस्कोशी त्यांची मैत्री काही पश्चिमेकडील भौतिकवाद आणि मॅककार्थाइट शीतयुद्धाच्या मानसिकतेबद्दल असलेल्या तिरस्कारामुळे आणि अंशतः भारताच्या हितसंबंधांच्या व्यावहारिक मूल्यांकनामुळे झाली.

१९५४ मध्ये नेहरूंची सोव्हिएत युनियनची भेट आणि १९५५ मध्ये बुल्गानिन आणि ख्रुश्चेव्ह यांच्या भारत भेटीमुळे दोन्ही देशांमधील मैत्रीपूर्ण सहकार्याचा कालावधी सुरू झाला, जो नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाच्या ठोस यशांपैकी एक होता. नेहरूंच्या निवासस्थानी एका भोजनसमयी, ख्रुचेव्ह नेहरूंना म्हणाले, ''तुम्ही आमचे मित्र व्हावे अशी आमची इच्छा आहे; परंतु तुम्ही तुमचे जुने मित्र सोडावेत अशी आमची इच्छा नाही. आम्ही मुलांसारखे आहोत, आम्हाला मित्र बनायचे आहे; परंतु जर आमचा कोणी द्वेष करीत असेल आणि कोणी आमच्यावर प्रहार करणार असेल, तर आम्ही जशास तसे उत्तर देऊ.'' नेहरूंना टोस्टचा प्रस्ताव देताना ख्रुश्चेव्ह म्हणाले, ''काही जण म्हणतात, की नेहरू कम्युनिस्ट आहेत. मला नेहरूंनी नेहरू व्हावे अशी माझी इच्छा आहे. म्हणून मी नेहरूंना टोस्टचा प्रस्ताव दिला आहे.'' काश्मीरमध्ये ख्रुश्चेव्हने घोषित केले, की जर काश्मीरचे लोक संकटात सापडले, तर त्यांना फक्त शीळ घालायला उशीर आणि रशियन लोक त्यांच्या मदतीला येतील.''

भिलाई स्टील प्लांटच्या उभारणीसाठी १९५५ मध्ये सोव्हिएत युनियनकडून भारताने आर्थिक आणि तांत्रिक मदत स्वीकारणे हे सोव्हिएत युनियनकडून गैर-कम्युनिस्ट देशाला मोठ्या आर्थिक मदतीचे पहिले उदाहरण होते. भारताच्या आर्थिक आणि राजकीय जीवनातील तथाकथित 'कम्युनिस्ट घुसखोरी'चे संभाव्य राजकीय परिणाम म्हणून नेहरूंनी भारतातील आणि बाहेरील अनेकांच्या समस्या बाजूला सारल्या. त्यामुळे गैर-समाजवादी आणि गैर-साम्यवादी देशांना सोव्हिएत आर्थिक मदतीसाठी ठराविक असा आकृतिबंध तयार करण्यात आला.

**राष्ट्रांच्या समुदायात भारताला मानाचे स्थान मिळावे!**

नेहरूंना भारताचे भविष्य व महानतेची दृष्टी होती. राष्ट्रांच्या समुदायात भारताला मानाचे स्थान मिळावे, अशी त्यांची इच्छा होती; परंतु भारत लष्करीशक्ती बनावा यासाठी त्यांनी कधीही जोरदार प्रयत्न केले नाहीत आणि स्वातंत्र्य उदयास आल्यानंतर इतर अनेक देश ज्या चंगळवादाला बळी पडले, त्यापासून ते विलक्षणपणे मुक्त होते.

नेहरूंच्या शेवटच्या वर्षांत त्यांचे निकटवर्तीय सांगतात, की चीनच्या हल्ल्यानंतर त्यांचा आत्मा आणि आरोग्यावर झालेला घाव कधीही बरा झाला नव्हता. चीनच्या हल्ल्यानंतर ते वेगळे नेहरू वाटू लागले. अनेक संकटांचा सामना करूनही ते याआधी कधीही तुटलेले दिसले नव्हते; पण या संकटाने त्यांना खरोखर कोलमडून टाकले. त्यांना आता जीवनात अजिबात रस वाटत नव्हता.

चीनशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित झाले, की चीनसोबतच्या सीमा आणि इतर प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी योग्य वातावरण निर्माण होईल, असा विश्वास नेहरूंना वाटत होता. चीनच्या वर्तनानेच या वाजवी गृहीतकाला खोटे ठरविले.

कैरोहून भारतात परतल्यावर, दक्षिण हिमालयाच्या सीमेवर

चिनी लोकांनी ५०,००० हून अधिक सैन्य जमा केले आहे, हे ऐकून नेहरूंना धक्का बसला. त्यांना काहीएक त्रास अपेक्षित होता; पण एवढी व्याप्ती नाही. ८ सप्टेंबर १९६२ रोजी चिनी सैन्याने पूर्वेकडील क्षेत्र ओलांडले होते; परंतु ते पुढे गेले नव्हते. नेहरूंनी सैन्याला त्यांना मागे ढकलण्याचे आदेश दिले; परंतु चिनी सैन्याने मोठ्या हल्ल्याला प्रत्युत्तर देत मोठ्या भारतीय प्रदेशांवर कब्जा केला. २५ ऑक्टोबर १९६२ रोजी नेहरूंनी संसदेत सांगितले, ''कदाचित इतिहासात अशी कमी उदाहरणे असतील, की भारत हा देश चीनचे सरकार आणि लोकांशी मैत्रीपूर्ण आणि सहकार्याने वागला आणि जगाच्या परिषदांमध्ये त्यांची बाजू मांडली; पण नंतर चिनी सरकारने वाईटाला चांगल्यासाठी परतावे आणि आक्रमण करण्याच्या मर्यादेपर्यंत जाऊन आपल्या पवित्र भूमीवर आक्रमण करावे.''

**नेहरूंनी भारताच्या आत्म्याला मूर्तिमंत केले**


१९६२ मध्ये भारतावर चीनने केलेल्या हल्ल्यानंतर नेहरूंच्या लक्षात आले, की भारताच्या सुरक्षेचे रक्षण करण्यासाठी सामरिक धोरण मजबूत संरक्षण क्षमतेसह एकत्र चालविले पाहिजे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली, भारताने आपल्या सशस्त्र दलांचे आधुनिकीकरण आणि बळकटीकरण सुरू केले, जे तीन वर्षांनंतर पाकिस्तानच्या सशस्त्र आक्रमणाला यशस्वीपणे परतवून लावू शकले.

नेहरूंनी भारताच्या आत्म्याला मूर्तिमंत केले. त्यांचे सरकार एकलहाती होण्यापासून दूर होते. त्यांचे मंत्रिमंडळातील अनेक सहकारी आणि राज्याचे मुख्यमंत्री यांनी हे स्वतःहून अनुभवले आणि ते एक सक्षम प्रशासक बनू शकले. नवी दिल्ली आणि राज्यांच्या राजधान्यांमध्येही एकेक मोठ्या उंचीचे नेते होते, ज्यांचाकडे सहजपणे दुर्लक्ष करता येऊ शकत नव्हते. ते कदाचित नेहरूंच्या सत्तेला आव्हान देऊ शकतील: परंतु त्यांच्या स्वत:च्या कार्यक्षेत्रात त्यांना जे आवडेल ते करण्यासाठी ते स्वतंत्र होते. ते असे लोक होते, ज्यांचे स्थान पूर्णपणे स्वायत्त होते, ज्यांनी नेहरूंच्या शक्तीला आव्हान दिले नाही व ते देऊही शकले नाहीत.

**सार्वत्रिक इतिहासकाराचा शिक्का**

नेहरू हे आंतरराष्ट्रीयवादी होते. त्यांना इतिहासाचे भान होते. तुरुंगातून त्यांची मुलगी इंदिरा यांना उद्देशून लिहिलेली पत्रे, जी 'ग्लिम्पसेस ऑफ वर्ल्ड हिस्ट्री' या शीर्षकाखाली संकलित केली गेली आहेत, त्यात इतिहासाच्या पुस्तकांपेक्षा मानवतावादी कौतुक आणि इतिहासाचे अधिक स्पष्टीकरण आहे. खरंच, या सर्वांनी नेहरूंवर सार्वत्रिक इतिहासकाराचा शिक्का बसवला, जसा मध्ययुगीन इब्न खलदौन आणि नंतरच्या काळातील मॉमसेन आणि अरनॉल्ड टॉयन्बी यांनी बसविला होता. अरनॉल्ड टॉयन्बी यांनी १९५७ मध्ये त्यांच्या दिल्ली भेटीत व्यक्त केले होते, की ''नेहरूंनी राजकारणात प्रवेश केला नसता, तर कदाचित ते एक वैश्विक इतिहासकार बनले असते.'' जॉन गुंथरने नेहरूंचे वर्णन 'पूर्वेकडील एक मनुष्य जो पाश्चिमात्य बनला. एक अभिजात जो लोकशाहीवादी झाला आणि एक व्यक्तिवादी जो जननेता झाला', असे केले.

जनता पक्षाच्या सरकारमध्ये केंद्रीय परराष्ट्र मंत्री म्हणून कार्यालयात प्रवेश करताना अटलबिहारी वाजपेयी यांचा पहिला प्रश्न भिंतीवरील त्या रिकाम्या जागेबद्दल होता, जिथून १९७७ मध्ये नेहरूंचे तैलचित्र



काढण्यात आले होते. ते परत ठेवण्याचे त्यांनी आदेश दिले.

**'एक स्वप्न अर्धवट राहिले'**

नेहरूंच्या निधनानंतर, वाजपेयींनी त्यांना संसदेत अशा प्रकारे श्रद्धांजली वाहिली, ''एक स्वप्न अर्धवट राहिले, एक गाणे शांत झाले. रामांप्रमाणेच नेहरू हे अशक्य आणि अकल्पनीय गोष्टींचे सूत्रधार होते. तेही तडजोडीला घाबरत नव्हते; पण दबावाखाली कधीही तडजोड न करणारा नेता गेला; पण त्याचे अनुयायी राहिले. सूर्य मावळला आहे, तरीही ताऱ्यांच्या सावलीने आपला मार्ग शोधला पाहिजे.''

नेहरूंना त्यांच्या देशवासीयांचे विपुल आणि भन्नाट प्रेम मिळाले. त्यांनी त्यांना देवपण दिले. दुर्गम आदिवासी भागातही त्यांचे नाव घराघरात गेले होते. अशिक्षित गावकऱ्यांसाठी ते जवळजवळ देवच बनले होते. बहुतेक भारतीयांसाठी त्यांनी जीवनातील चांगल्या, उदात्त आणि प्रत्येक गोष्टी या सुंदर प्रतीक बनल्या होत्या. त्यांचे दोषही वाखाणण्याजोगे होते. त्याच्या कमजोरीही प्रेमळ होत्या. वीरपूजेच्या भूमीत तो वीरांचा नायक बनला होता.

नेहरू गेल्यानंतर त्यांची आठवण कशी व्हावी, याचं उत्तर त्यांनी स्वतः हृदयद्रावक शब्दात दिलं होतं. ''जर लोकांनी माझा विचार करायचा ठरवलं, तर मला त्यांना सांगायला आवडेल, की हा तो माणूस होता ज्याने संपूर्ण मनाने आणि हृदयाने भारतावर आणि भारतीय लोकांवर प्रेम केले. त्या बदल्यात त्यांनी त्याचे लाड केले आणि सर्वात विपुल आणि विलक्षण प्रेम दिले.''

आपली शेवटची इच्छा आणि मृत्यूपत्रात नेहरूंनी सांगितले, की त्यांची बहुतेक विभूती ''विमानामध्ये हवेत उंचावर नेली जावी आणि त्या उंचीवरून भारतातील शेतकरी जिथे कष्ट करतात त्या शेतात विखुरली जावी, जेणेकरून ते भारताच्या धूळीत व मातीत मिसळतील, आणि भारताचा अविभाज्य भाग बनतील.'' **(समाप्त)**

**(लेखक ज्येष्ठ विचारवंत आहेत.)**

**मूळ लेख इंग्रजीत आहे. अनुवाद प्रा.डॉ. संदीप इंगळे यांनी केलेला असून ते इंग्रजी साहित्याचे अभ्यासक आहेत.**

# दूरस्थ मतदान ; विश्वासार्ह किती ?



प्रा. डॉ. प्रदीप
पंजाबराव दंदे

**ईव्हीएमवर शंका घेण्यात आल्याने वोटर व्हेरिफाईड पेपर ट्रेल (वीवीपॅट) आणले गेले, तरी ईव्हीएमवरील शंकेचे निराकरण झाले नाही. अशातच जिथे स्थलांतरितांची संख्या ठरली नाही. स्थलांतरीत म्हणजे नेमके कोण, याची निश्चित व्याख्या नाही. तेव्हा दूरस्थ मतदान प्रणालीद्वारे मतदान होताना ते बोगस मतदान होणार नाही, याची हमी निवडणूक आयोग देणार आहे काय?**

देशात रोजगार, नोकरी, विवाह या कारणांमुळे मोठ्या प्रमाणात स्थलांतर होते. त्यामुळे मतदाराला आहे त्या ठिकाणाहूनच आपल्या मतदारसंघात मतदान करता यावे, यासाठी भारत निवडणूक आयोगाने दूरस्थ मतदान प्रणाली (रिमोट इलेक्ट्रॉनिक वोटिंग यंत्र-RVM) विकसित केली आहे. दूरस्थ मतदान यंत्रामुळे मतदाराला आपल्या मूळ गावी न जाता तो आहे तिथूनच दूरस्थ मतदान केंद्रावरून त्याला मतदान करता येणार आहे. दूरस्थ मतदान केंद्रावरून लोकसभा, विधानसभेच्या जवळपास ७२ मतदारसंघांतील मतदारांना मतदान करता येणार आहे. दूरस्थ मतदान प्रणाली विकसित करावयाची झाल्यास लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० व १९५१, निवडणूक संचालन नियम १९६१, तसेच मतदार नोंदणी नियम १९६० यात बदल करावा लागणार आहे.

**ग्रामीण भागातील लोकसंख्येचे बाह्य स्थलांतर मोठ्या प्रमाणावर होते**

२०१९ ला सतराव्या लोकसभेसाठी झालेल्या निवडणुकीत ६७% मतदारांनी आपला मतदानाचा अधिकार बजावला होता. अर्थात, ९० कोटी मतदारांपैकी ६० कोटी मतदारांनी मतदान केले होते. उरलेल्या ३० कोटी मतदारांनी मतदान का केले नाही, याचा निवडणूक आयोगाने अभ्यास केला असता मतदारांचे रोजगार, शिक्षण व विवाह या कारणाने होणारे स्थलांतर याला कारणीभूत असल्याचे निदर्शनात आले. त्यामुळे आजच्या तंत्रज्ञानावर आधारित युगात स्थलांतरामुळे मतदानाच्या अधिकारापासून मतदाराला वंचित ठेवणे हा पर्याय होऊ शकत नाही. म्हणून मतदाराला आपला मतदानाचा अधिकार बजावता यावा, तसेच मतदानाचा टक्का वाढावा, हा या प्रणालीमागचा मुख्य उद्देश आहे. निवडणूक आयोगाने तयार केलेल्या नव्या तंत्रज्ञानावर आधारित दूरस्थ मतदान प्रणालीचे स्वागत केलेच पाहिजे; परंतु दूरस्थ मतदान प्रणाली लागू केल्यास EVM प्रमाणे RVM प्रणालीची विश्वासार्हता किती, हा कळीचा मुद्दा आहे. EVM वर शंका घेण्यात आल्याने वोटर व्हेरिफाईड पेपर ट्रेल VVPAT आणले गेले, तरी EVM वरील शंकेचे निराकरण झाले नाही. अशातच जिथे स्थलांतरितांची संख्या ठरली नाही. स्थलांतरीत म्हणजे नेमके कोण, याची निश्चित व्याख्या नाही. तेव्हा दूरस्थ मतदान प्रणालीद्वारे मतदान होताना ते बोगस मतदान होणार नाही, याची हमी निवडणूक आयोग देणार आहे काय? देशांतर्गत



एकूण स्थलांतरितांचा विचार केल्यास ग्रामीण भागातील लोकसंख्येचे बाह्य स्थलांतर मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे आढळते. त्यातही रोजगार, शिक्षण आणि विवाह यांमुळे ८५% स्थलांतर हे राज्यांतर्गत होते, असे निवडणूक आयोगाचे म्हणणे आहे. असे असले, तरी स्थलांतर हे केवळ राज्य आणि देशांतर्गतच होते असे नाही. उच्च शिक्षणासाठी दरवर्षी दोन लाखांहून अधिक विद्यार्थी परदेशात जातात. लोकसभा पंचवार्षिक निवडणुकीचा विचार केला, तर तो आकडा दहा लाखांहून अधिक होतो. त्याशिवाय विदेशी कंपन्यांमध्ये काम करणाऱ्यांना यात जोडले, तर ती संख्या त्याहून अधिक होते.

अशा परदेशी स्थलांतरितांचा विचार दूरस्थ मतदान प्रणालीत आहे काय? नसेल तर तेही मतदानापासून वंचित राहतील, त्याचे काय?

**या बाबीकडे दुर्लक्ष करून कसे चालेल?**


मतदान हे मुक्त व पारदर्शी व्हायला हवे, ही लोकशाहीची पहिली अट आहे. निवडणुका या अपारदर्शी, अविश्वासार्ह असता कामा नयेत. दूरस्थ मतदान प्रणालीत मतदानाचा टक्का वाढावा असा हेतू असला, तरी लोकशाहीची यशस्वीता केवळ मतदानाच्या टक्केवारीवरून आपण ठरविणार आहोत का? प्रातिनिधिक लोकशाहीचे यश हे सत्तेवर येणारे सरकार जनतेला किती प्रमाणात न्याय देते, यावरून ठरवले जाते. सर्वसामान्यांना भेडसावणारी वाढती महागाई, बेरोजगारी, आरोग्याचे प्रश्न, शुद्ध व मुबलक पाणी, स्त्रियांवरील अत्याचार, आदिवासींचे प्रश्न, अन्न, वस्त्र, निवाऱ्यांच्या सोयीची कमतरता, पर्यावरणाच्या असमतोलामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान, अशा अनेक कारणांवरून मतदारांत मतदानाप्रती नैराश्य असू शकते. या बाबीकडे दुर्लक्ष करून कसे चालेल?

भारतात ९० कोटींहून अधिक मतदार असले, तरी ती यादी १००% खरी आहे. कशावरून? अद्यापही एकाच मतदाराची दुबार, तिबार नावे, मयत इसमांची नावे मतदार यादीत आहेत. त्यामुळेही मतदानाचा टक्का घटतो आहे. अशा स्थितीत स्थलांतरामुळेच मतदानाचा टक्का घसरतो, हे म्हणणे म्हणजे जखम पायाला आणि पट्टी डोक्याला अशातला प्रकार आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान साताऱ्याला १७ तारखेला घड्याळावर शिक्का हाणा आणि २४ तारखेला पहिली शाई पुसून मुंबईत पुन्हा घड्याळावर शिक्का हाणा, असा सल्ला राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी नवी मुंबई येथील माथाडी कामगारांच्या मेळाव्यात दिला होता. त्यावेळी प्रचंड गदारोळ माजला होता. त्यांनी एक प्रकारे मतदारयादीत दुबार, तिबार नावे असल्याचे वास्तव मांडले होते. आजही ते चित्र बदलले असे नाही.

**मतदार यादीत दुबार, तिबार नावे कशी आलीत?**

निवडणूक आयोगाने एटीएमसाठी बँका जे तंत्रज्ञान वापरतात, तसे सर्च इंजिन/तंत्रज्ञान आपल्या मतदार यादीसाठी वापरले पाहिजे. बँकांची एटीएम यंत्रणा केवळ चार अंकी पासवर्ड वर चालते, तरीही ज्याचे पैसे त्यालाच मिळतात आणि तेही त्याच्याच खात्यातून मिळतात. एवढेच नव्हे, तर त्याला आपल्या पसंतीचा पासवर्ड पाहिजे तेवढ्या वेळा बदलता येतो. निवडणूक आयोगाने तर मतदारांना दिलेल्या मतदान कार्डसाठी आयडी दिली आहे. तरीही अनेकांकडे दोन नव्हे, तर तीन-तीन मतदान कार्ड आहेत. एवढेच नव्हे, तर आता काही जणांकडे दोन-दोन आधार कार्ड आहेत. 'व्हॉट कॅन आयडिया सरजी' म्हणत ज्या आधार कार्डला डोक्यावर घेतले, ते मतदार यादीत नावे नोंदविताना देवूनही अमरावती पदवीधर मतदार यादीत दुबार, तिबार नावे कशी आलीत? गल्लत केवळ स्थलांतरित मतदारांपुरती मर्यादित नाही, तर मतदार यादीसाठी एटीएमप्रमाणे स्ट्राँग यंत्रणा आपण उभी करू शकलो नाही, यात आहे.

भारतात लोकसभा-विधानसभेच्या निवडणुका एका फेजमध्ये होत नाहीत. २०१९ ला लोकसभेच्या निवडणुका सात फेजमध्ये झाल्या होत्या. २०१४ साली शरद पवार यांनी लोकसभा निवडणुकीत




शाई पुसा आणि पुन्हा शिक्का मारा, असे जे म्हटले होते त्याची उकळणी दूरस्थ मतदान प्रणालीत होण्याला अधिक वाव आहे. त्यामुळे दुबार मतदान होणार नाही, यासाठी पुढील बाबी विचारात घेणे गरजेचे वाटते.

१) देशातील मतदार यादीसाठी एटीएमप्रमाणे तंत्रज्ञान वापरून मतदार यादीतून दुबार, तिबार नावं वगळून नव्याने मतदार यादी तयार करावी.

२) त्यानंतर दूरस्थ मतदानासाठी स्थलांतरितांची संख्या ठरवावी. स्थलांतरित नेमका कोण, याची निश्चित व्याख्या करावी. स्थलांतरितांत स्थायी-अस्थायी असे प्रकार आहेत.


३) मतदार यादीतील मयत नावे वगळण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जन्म-मृत्यू विभागाच्या सॉफ्टवेअरशी निवडणूक आयोगाचे सॉफ्टवेअर लिंक करावे.

४) नवमतदार नोंदणीसाठी वरिष्ठ महाविद्यालयांच्या विद्यापीठीय सॉफ्टवेअरसोबत सहा नंबरचा फॉर्म जोडायला लावण्यात यावा. यामुळे नवमतदारांना नोंदणी करताना महाविद्यालयात प्रवेश करताना जी कागदपत्रे द्यावी लागतात, त्याच कागदपत्रांच्या आधारे नवमतदार नोंदणी सहज-सुलभ आणि पेपरलेस होण्यास मदत होईल.

५) EVM-VVPAT वर साशंकता नसावी यासाठी १००% VVPAT मधील चिठ्ठ्यांची मोजणी करावी.

वरील बाबींचा निवडणूक आयोगाने गांभीर्याने विचार केल्यास मतदानाचा टक्काही वाढेल आणि मतदारांची विश्वासार्हही टिकेल. अनेकदा मतमोजणीची वेळ वाचविण्यापेक्षा विश्वासार्हता टिकविणे महत्त्वाचे आहे. ●●●


**(लेखक आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक आहेत.)**



नागसेन बागडे

# धर्माचा नवीन पद्धतीने अभ्यास

धर्माच्या नावावर आज सर्वच देशांमध्ये वातावरण तापलेलं आहे. आपल्या देशात तर अलिकडच्या काळात धर्मातून प्रचंड संघर्ष होतांना दिसतो आहे. धर्मांतरण, लव्ह जिहाद, घरवापसी यासारखे शब्द दररोज कानावर पडतात. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय वा इतर महत्वाच्या बाबींवर जितकी घसळण व्हावयास हवी तितकी न होता धार्मिक मुद्यावंर रान माजवून समाजात कलुषित वातावरण निर्माण करण्यापर्यंत भयावह स्थिती निर्माण झालेली आहे.




धर्म या संकल्पनेवर आजवर अनेक विद्वानांनी खल केलेला आहे. विचारवंतांनी आणि तत्ववेत्त्यांनी या समाजासाठी अनिवार्य असलेल्या मुद्यावर अनेक बाजूंनी प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. भारतीय विचारवंतांनी देखील अगदी प्राचीन काळापासून ते अलिकडील काळापर्यंत या विषयावर उहापोह करुन आपल्या ज्ञानात भर घातलेली आहे.पाश्चिमात्यांच्या संकल्पनेमध्ये देव मानणे हा 'धर्म' या संकल्पनेचा अविभाज्य भाग आहे. मात्र भारतात बौद्ध धर्मात देवाला स्थान नाही. त्यावरुन तो रुढ अर्थाने धर्म ठरत नाही. याबाबत बरीच मतमतांतरे आहेत.

आजवर धर्माच्या उगमापासून त्याचा मानवी जीवनात असलेल्या अनिवार्यतेबाबत बरीच मोठी ग्रंथ निर्मिती झालेली आहे. त्यात काही महत्वाचे मराठी, हिंदी वा इतर भारतीय भाषांमध्ये प्रमाणभूत ठरतील असे ग्रंथ आहेत. इंग्रजीत यासंबंधाने उत्तमोत्तम ग्रंथ दरवर्षी प्रकाशित होत असतात. धर्माचा अनेक अंगांनी अभ्यास केला जातो.ज्या पद्धतीने पाश्चात्य देशात यासंबंधाने चिकीत्सा, चर्चा व विचार केला जातो तो बघून अगदी स्तिमीत झाल्यासारखं होतं.

धर्माच्या विविध पैलूंवर प्रकाश पाडतांना मोठमोठ्या दिग्गजांना आपण वाचलेले आहे. अगदी Classics पासून ते In search of dreamtime (Tomoko Masuzawa) पर्यंत ग्रंथ उपलब्ध आहेत. अगदी अलिकडील ग्रंथ घेतले तर त्यात John Gray यांचे Seven types of atheism, Sellah चे Religion in human evolution ते Neil MacGregor चे Living with the gods उपलब्ध आहेत.

Seven types of atheism मध्ये Gray यांनी माणसाचा धर्म आणि विज्ञान यामध्ये असलेला अनाकलनीय रस यावर प्रकाया टाकून देवाचा तिरस्कार करणारे लोक ते आधुनिक धर्माचे राजकारण Santaya-na, Spinoza ते Schopenhaur पर्यंत विचारवंतांची चर्चा केलेली आहे. हा अगदी वेगळ्या अंगांनी केलेला अभ्यास आहे.

Sellah यांनी तर माणसाच्या उत्क्रांतीत धर्माचा प्रभाव वा धर्माचा सहभाग यावर महाग्रंथच लिहून काढलेला आहे. वास्तविकता आणि धर्म, आदीम धर्म पासून ते जगातील प्रमुख प्रभावी संस्कृतित धर्माचा प्रभाव यावर विस्तृत चर्चा केली आहे. प्राचीन भारतातील धर्माच्या विचारास त्यांनी तब्बल 85 पृष्ठे दिलेली आहेत.

MacGregor यांच्या ग्रंथात त्यांनी वेगवेगळ्या लोकांच्या वेगवेगळ्या समजूतीवर अतिशय अभ्यासपुर्ण ग्रंथ साकारलेला आहे. भरपूर चित्रांद्वारे त्यांनी मानवाच्या चालीरीती व धार्मिक रुढी, परंपरा यावर प्रकाश टाकतांना आपल्याला जगाची सफर घडवून आणलेली आहे.

या सर्व ग्रंथकारांनी अगदी वेगवेगळ्या angle ने धर्माचा अभ्यास केलेला आढळतो.

यात अगदी अलिकडेच (2022) Rober Dunbar यांनी How religion evolved या ग्रंथाची भर घातलेली आहे. डनबार यांनी त्यांच्या ग्रंथाची विभागणी दहा भागांमध्ये केलेली आहे. धर्माचा अभ्यास कसा करावा हे पहिल्या भागात तर भक्ती संप्रदायाशी संबंधित बाबींवर दुसऱ्या भागात चर्चा केलेली आहे. धार्मिक असणं माणसासाठी कसे उपकारक ठरू शकते याची चर्चा तिसऱ्या भागात आहे. यात नैतिकतेचा आर्थिक बाबींशी व त्याचा धर्माशी कसा संबंध आहे हे लेखकाने दाखविले आहे. माणसाच्या सामाजिक मेंदू ते धार्मिक मेंदूपासून ते प्राचीन काळातील धार्मिक बाबींवर अगदी नव्या पद्धतीने लेखक प्रकाश टाकतो.

धर्मात असलेल्या संप्रदाय, पंथ, धर्मातील वेगवेगळे मार्ग तसेच इतिहासात आणि वर्तमानात पडत असलेले मतभेद व फुटीपर्यंत


लेखकाने तर्कशुद्ध पद्धतीने विवेचन केले आहे.

सर्व धर्म एका प्रभावशाली व्यक्तीच्या भवती निर्माण झाल्याचे लेखक म्हणतो. यापैकी कितीतरी व्यक्ती काही काळासाठीच प्रभावी होत्या आणि त्यांच्या पश्चात फार कमी काळातच त्या विस्मृतीत गेल्यामूळे त्यांनी स्थापन केलेले पंथ, धर्म, संप्रदाय प्रचार-प्रसारीत होवू शकले नाही असे देखील लेखकाचे निरिक्षण आहे.

धर्माच्या बाबतीत काही वैशिष्ट्यपुर्ण पद्धतीबाबत आपल्याला लेखक अवगत करतो. जसे, जापानमध्ये प्रत्येक व्यक्ती बौद्ध आणि शिंटो असतो. बहुदा लग्न शिंटो पद्धतीनेच होतात, तामिळनाडूमध्ये थाइपुस्सम सन साजरा करतांना स्वत:चे शरीर टोचवून घेवून स्वत:स यातना देण्याचा प्रकार इत्यादी.

रॉबीन डनबार हे आधूनिक मानववंशशास्त्रज्ञांच्या फळीत अग्रक्रमाचे अभ्यासक मानले जातात. त्यांचे बरेच ग्रंथ प्रकाशित आहेत. त्यापैकी The human story व Human evolution (माझ्याकडे असलेले) विशेष प्रसिद्ध आहेत.

त्यांनी आपली विवेचक, वैज्ञानिक दृष्टी धर्माच्या अभ्यासाकडे वळविल्याने या ग्रंथाची निर्मिती झालेली आहे. अगदी रोगांमूळे, आजारांमूळे माणसाच्या धार्मिक भावनांमध्ये किंवा विचारांमध्ये कसा फरक पडू शकतो ते वैज्ञानिक प्रगतीमूळे धार्मिक अवस्थांतर किंवा स्थित्यंतर यावर प्रकाश टाकण्यासाठी लेखकांने आपले कसब पणाला लावलेले आहे. यासाठी त्यांनी प्रचंड संशोधन केलेले आहे हे पदोपदी जाणवते. त्यांनी ग्रंथात त्यांचे निष्कर्ष सिद्ध करण्यासाठी चित्र व नकाशेदेखील दिलेले आहेत. मनोवैज्ञानिक दृष्टीकोनातून




**संदर्भ ग्रंथ**

धर्माचा उगम आणि व्याप्तीची केलेली ही चिकीत्सा खरोखरच आपल्या ज्ञानात भर घालते. शेवटी पुढील वाचनासाठी निवडक ग्रंथांची व साहित्याची सूची लेखक आपल्याला पुरवितो. डनबार यांनी केलेला 'धर्म' या संज्ञेचा अभ्यास अगदी उद्बोधक आहे.

●●●

**(लेखक प्रशासकीय अधिकारी आहेत.)**

**How religion evolved and why it endures**

**लेखक :-** Robin Dunbar

**प्रकाशक :-** Pelican Books

**मुल्य :-** रु.999/-

समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

पाक्षिक समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
द पीपल्स पोस्ट

डिजीटल स्वरुपात!




www.peoplespost.in

नवे लेख, नवी सदरे, नवा अंक याशिवाय दैनंदिन विषयांवर नामवंत साहित्यिक, लेखक, विचारवंत यांचे भाष्य!

# बलात्कारी बाबा आसाराम एक सापडला, बाकीच्यांचं काय ?



नावाप्रमाणे आशावान म्हणजे स्वार्थवान, तृष्णावान असलेला बलात्कारी आसाराम शिक्षेला पात्र ठरला आणि आयुष्यभराच्या जन्मठेपेचा धनीही ठरला. अल्पावधीत विश्वगुरू बनलेला, कोणत्या तरी देवाचा अंश बनलेला, अनेक राजकारण्यांचा गुरू बनलेला, सगळ्यात अधिक शिष्य लाभलेला आणि विशेष म्हणजे, सगळ्यात अधिक संपत्तीवान ठरलेला आसाराम अखेर तुरुंगात गेला आणि अध्यात्माच्या नावाखाली आपल्याकडे अनेक बाबा वासनांध कसे बनतात याचे एक छोटे; पण विकृत स्वरूप जगासमोर आले. ज्यांनी त्याला गुरू मानले ते नेते, कार्यकर्ते आणि अंधभक्त शरमिंदे झाले असतील. कोणाच्या नावाने आपण जप करत होतो आणि भगव्या कपड्यात हा सैतान कसा निघाला, हे त्यांना कळले नसणार? तोंड कसे लपवायचे असा प्रश्न त्यांच्यासमोर पडला असणार.

आसाराम म्हणजे अध्यात्माच्या, चमत्काराच्या नावानं घुमलेलं एक महावादळ होतं. या वादळाने देशातला कानाकोपरा व्यापून टाकला. प्रचंड भक्तगण, दर्शनासाठी होणारी प्रचंड गर्दी, गाड्यांचा प्रचंड ताफा, जवळून दर्शनासाठी पाच लाख, पायाला हात लावण्यासाठी दहा लाख, गाड्यांच्या ताफ्यात सहभागी होण्यासाठी काही लाख, मंत्र ऐकण्यासाठी पैसे, यज्ञासाठी पैसे, शालीसाठी पैसे, आशीर्वादासाठी पैसे, अध्यात्मात वापरावयाच्या वस्तूंसाठी पैसे... पैसेच पैसे! लोक श्रद्धेपोटी पैसा टाकत होते. बाबाचे भजन म्हणत वेड्यासारखे फिरत होते. आसारामची एक समांतर व्यवस्था तयार होत होती. अनेक शहरात चौकाला, वसाहतीला त्याचे नाव मिळत होते. एवढा श्रीमंत बाबा देशाने कधी बघितलाच नव्हता. खरेखुरे आध्यात्मिक असलेल्या गुरुंना त्याने कधीच मागे टाकले. अतिशय वैभवी मिरवणुका, सत्ता-संपत्तीची उधळण आणि बाबाची सावली पकडण्यासाठी प्रचंड गर्दी, हे या वासनांध बाबाचे वैशिष्ट्य ठरत होते. घरोघर त्याचे फोटो लागले. त्याची पूजा होऊ लागली. पहाटे भक्तीफेऱ्या निघू लागल्या. त्याच्यावर गाणी रचली गेली. त्यासाठी भाडोत्री नवे प्रतिभावंत तयार झाले. त्याच्या नावाच्या उदबत्त्या निघाल्या. गो-मुत्राच्या बाटल्या निघाल्या. रुद्राक्षाच्या माळा निघाल्या. बाजारभावापेक्षा दसपट त्या महागड्या होत्या. त्याचे फोटो असलेल्या वह्या विद्यार्थ्यांच्या हातात पडल्या. अख्ख्या भूतलावर जणू काही त्याच्यासारखा शक्तिमान, तेजोपुंज असा कोणी नाहीच, या पद्धतीने चालू होते. त्याने स्वतःला देव घोषित केले होते. अवतार घोषित केले होते. गुजरातमधून तो आला होता, म्हणून अनेक वर्षे त्याला राजकारणातही अभय होते. मी मी म्हणणारे नेते त्याला दंडवत घालत होते. आसाराम सुसाट सुटला... अगदी रानडुकरासारखा... शेवटी कधी ना कधी दुष्कर्माचा, पापाचा घडा भरत असतो, या अध्यात्मातल्या तत्त्वानुसारच त्याचाही घडा भरला. दहा वर्षांपूर्वी एका महिलेने त्याच्याविरुद्ध बलात्काराची केस नोंदवली आणि त्याला मरेपर्यंत कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. आता कदाचित तो वरच्या, आणखी वरच्या कोर्टात जाईल. खटला लढेल. त्याच्याकडे बक्कळ पैसा आहे, यंत्रणा आहे; पण काहीही असो, कायद्याने त्याला गुन्हेगार ठरवले आहे. दरम्यान, त्याने आपल्यातला दैवी अंश आपल्या पोरालाही देऊन टाकलाय आणि हा पोरगाही वेगवेगळ्या आरोपांच्या जाळ्यात अडकलाय. एवढे सारे घडत असतानाही अनेक अंध भक्त आसारामच्या कच्छपी लागले आहेत. जे काही घडले त्यावर ते विश्वास ठेवतच नाहीत. हे सारे खोटे आहे,

षड्यंत्र आहे, अशा भ्रमात ते जगत आहेत. अजूनही अनेक शहरांत महिलांचा अधिक समावेश असलेल्या भक्तीफेऱ्या निघतात. त्या आसारामचे गुणगाण गातात. साक्षात एका देवाचा जन्मही तुरुंगात झाला. मोठ्या मानवाला, देवालाही तुरुंग भोगावाच लागतो अशी त्यांची अंध धारणा आहे आणि आसारामसारख्याला ते देवाच्या पंक्तीत बसवण्याचा प्रयत्न करतात.

प्रश्न एका आसारामचा नाही. ऐंशीच्या दशकात जागतिकीकरणाच्या लाटेबरोबरच बुवाबाबांचीही एक लाट आली. मोबाईलमुळे सगळे एका रात्रीत विश्वगुरू बनतात. याच काळात जगण्याची स्पर्धा जीवघेणी झाली. असुरक्षिततेची भावनाही लाटेचे रुप घेऊन आली. प्रत्येक जण आश्रय शोधतोय. सुरक्षितता शोधतोय. त्यात मध्यमवर्गही आघाडीवर आहे. या परिस्थितीत आम्ही जगाचे कल्याण करतो, असा दावा करत अनेक बाबा जन्माला आले. त्यात हा एक आसाराम. अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याचा आरोप आसारामवर झाला. आसारामच्या मुलावर म्हणजे नारायण साईवरही शारीरिक छळाचे आरोप झाले आहेत. तो कधी तुरुंगात जाईल आणि कधी बाहेर पडेल, कुणाला ठाऊक नाही.

आसारामची कथा इतकी चित्तथरारक आहे, की ती कुणाला परवडणारी नाही; पण वास्तव त्यामुळे लपून राहत नाही. स्वातंत्र्यापूर्वी म्हणजे १९४१ ला पाकिस्तानात जन्माला आलेला हा पोरगा असुमल हरपलानी या नावानं ओळखला जायचा. त्यानं जगण्यासाठी टांगा चालवला, सायकलीच्या दुकानात तो काम करायचा. पुढे त्याने स्वतः ला कच्छमधील संतलीला शहबाबा याचा शिष्य जाहीर केलं आणि त्याचं आयुष्य फळफळून आलं. संत होऊन तो भारतात आला. मग राष्ट्रसंत आणि शेवटी विश्वसंत बनून परमेश्वराचा अवतार बनला. त्याच्या रासलीला म्हणून याच्याही रामलीला सुरू झाल्या. एक-दोन नव्हे, तर चारशे आश्रम उभारून स्वतःच्या मालकीचे बनवले. चार कोटी शिष्य बनवले. प्रचंड पैसा जमवला. परदेशी कंपन्यात तो गुंतवला. मालामाल झाला आसाराम. गुरूपौर्णिमा, शिवरात्र, दिवाळी या सणांना अक्षरशः प्रचंड कमाई व्हायची. गळ्यात हार आणि खांद्यावर शाल घालून घेण्याचा दरच कोटी-कोटीची उड्डाणे घेत होता. सरकारला भरावयाचा प्रचंड टॅक्स चुकवत होता. आज त्याच्या नावावर अडीच हजार कोटी रुपयांची संपत्ती आहे. ती बाहेर काढली, की कोणाही गरिबाला मोफत धान्य द्यावे लागणार नाही, तर काम मिळू शकते. काळ्या पैशाचा हा धनी आता तुरुंगातच राहणार आहे आणि बाहेर त्याची चर्चा होणार आहे.

गुरमित राम रहीमवरही असेच आरोप झाले. तो तुरुंगात आहे. सेक्स रॅकेट, मानवी तस्करी, शस्त्रांचा काळाबाजार, फसवणूक असे आरोप घेऊन मिरवणारे किंवा तुरुंगात गेलेले अजून काही महाराज आहेत. कधी काळी सुरक्षा रक्षकाची नोकरी करणारा शिवमुरत द्विवेदी स्वामी भीमानंद बनला. इच्छाधारी बाबा या नावाने तो प्रसिद्ध पावला. इच्छेच्या जोरावर तो कसलेही रूप धारण करायचा. नागीन हे त्याचे आवडते रूप. ते धारण करून तो मुलींसमोर नाचनाच नाचायचा. पुढे तो सेक्स रॅकेट चालवतोय या आरोपाखाली त्याला तुरुंगवास झाला. या दोघांच्या अगोदर चंद्रास्वामी हा जगप्रसिद्ध गुरू होता. राजकारणात जगभरातील अनेक नेते त्याला शरण गेले होते. विशेष म्हणजे, इंदिरा गांधी आणि नरसिंह राव या दोन्हीही पंतप्रधानांच्या जवळपास तो वावरायचा. याविषयी तेव्हा आणि नंतरही खूप चर्चा झाली. तो प्रचंड श्रीमंत आणि महाशक्तिमान बनला होता. सत्ताधाऱ्यांकडून त्याने शक्ती घेतली होती. धनवानांकडून संपत्ती घेतली होती. शस्त्रास्त्रांचा काळाबाजार आणि अंडरवर्ल्ड डॉन दाऊदशीही त्याचे संबंध असावेत, अशी चर्चा चालली. शेवटी हा चंद्रास्वामी अडकला तो परकीय चलनाच्या भानगडीत. त्यालाही काही काळ तुरुंगवास लाभलाच. एवढे घडत असले, तरी चमत्कारी, ढोंगी बाबा जन्माला येण्याचे काही थांबत नव्हते. झटपट मोठे होण्याचा आणि समाजाच्या गळ्यात माळा घालून त्याला गुलाम बनवण्याचा मार्ग जणू काही बाबागिरीतूनच जातो या भावनेने अजूनही बाबा जन्माला आले. डेरा सच्चा सौदाचे गुरू राम-रहीम यालाही २०१७ मध्ये गुन्हेगार ठरवण्यात आले. खून आणि बलात्कार यांसारखे गंभीर आरोप त्याच्यावर आहेत. शिक्षा भोगत असलेला राम-रहीम आता सुट्टीवर तुरुंगाबाहेर आलाय आणि तो पर्यावरणाचे काम करतोय. 'मूंह मे राम आणि बगल मे छुरी' म्हणतात ते याच गोष्टीला. स्वामी नित्यानंद हे आणखी एक प्रकरण. कोणा तरी नटीबरोबर अश्लील चाळे करताना त्याचा एक व्हिडिओ बाहेर आला. अलीकडे बरेच जण नुसतीच शारीरिक पिळवणूक करत नाहीत, तर त्याचे चित्रीकरणही करतात. त्या जोरावर संबंधित महिलेला कायमचे ओलिस ठेवण्याचा प्रयत्न करतात. पण कधी तरी ओल संपते आणि त्या ठिकाणी तडे पडतात. तुरुंगाचे गज तेथे उगवतात. तर हा नित्यानंद तुरुंगाबाहेर जामिनावर आला आहे. या सर्वांच्या यादीत आणखी एक ठळक नाव म्हणजे बाबा रामपाल. एक गोष्ट चमत्कारिक म्हणजे या सगळ्या ढोंगी बाबांनी आपल्या नावात राम घुसवलाय. त्याविषयी कोणा धर्मवाद्यांना, राष्ट्रवाद्यांना, सनातनवाद्यांना कधी लाज वाटली नाही. मर्यादा पुरुषोत्तम असलेल्या रामाची बदनामी का करता आहात, असे कोणी त्यांना आजपर्यंत विचारलेले नाही. तर हा रामपाल पूर्वी शासकीय सेवेत अभियंता होता. तो बाबा झाला आणि त्याची परिस्थिती फळफळली. तो खूप श्रीमंत झाला. गर्भपाताचे केंद्र चालवणे आणि शस्त्रास्त्रांच्या तस्करीत तो अडकला. राष्ट्रद्रोहाचा आरोपही त्याच्यावर आहे. हे सारे हिंदू धर्मातच घडते असे कोणी समजायचे कारण नाही. आपल्याकडे जे कर्मठ आहेत ते लगेच प्रश्न उपस्थित करतात, की हिंदू बाबानांच का अटक करता? अन्य धर्मातील अशा घटना त्यांनी पहाव्यात मग त्यांच्या लक्षात येईल, की या बाबांचा धर्माशी संबंध नाही. ती एक विकृती असते. कमी-अधिक प्रमाणात ती जगभर असते. दुसऱ्याची खरुज दाखवण्यापेक्षा आपली खरुज घालवणे हा चांगला मार्ग असतो. आपल्या देशात अजूनही अनेक बाबा असे आहेत, की देशप्रेमाच्या नावाखाली त्यांनी समांतर अर्थव्यवस्था तयार केली आहे. सत्ताधाऱ्यांची ऊब घेत आणि सनातन धर्माच्या नावाने गर्जना करत तसेच कधी काळी दिल्लीतल्या समारंभातून स्त्रीवेश परिधान करून आता गुरू बनलेले रामदेव बाबा एक. त्यांनी तर जग डॉक्टरमुक्त करण्याचा विडा उचललाय. त्यांच्या गोळ्या-पालापाचोळा खाल्ला, की जग डॉक्टरांपासून मुक्त होणार आहे. अजूनही कोणी नाड्या जागवतो, कोणी श्वासाचे प्रयोग करतो. समाज जोपर्यंत असुरक्षित मानसिकतेत राहील, तोपर्यंत नवे बाबा

आणि गुरू जन्माला येणार. त्यांची नवी दुकाने उघडली जाणार, विज्ञानाचे चक्र उलटे फिरवले जाणार, हे ओघानेच आले की...

# भारत जोडो यात्रेने उमटवल्या विचारमुद्रा




एकत्र चालूया-देश एकसंध ठेऊया, महागाईशी नाते तोडा, एकात्मतेशी नाते जोडा, बेरोजगारीचे फास तोडा, भारत जोडा, द्वेष सोडा-भारत जोडा, अशा अनेक घोषणा घेऊन आणि वीस आठवडे चालून भारत जोडो यात्रेचा समारोप जम्मू-काश्मीरमध्ये कोसळत्या बर्फात आणि पावसात झाला. अलीकडच्या काळातील सर्वात मोठी निघालेली ही पदयात्रा. या पदयात्रेने सात सप्टेंबर २०२२ ला कन्याकुमारी या देशाच्या एका टोकावरून प्रारंभ केला आणि शेवटच्या टोकावर ती पोहोचली. भाजपने पप्पू म्हणून हिणवलेले राहुल गांधी अचल, दृढ निर्धाराने चालत राहिले. या यात्रेत त्यांनी कसलीही आश्वासने दिली नाहीत. राजकारणावर चर्चा केली नाही. स्वतःच्या राजकीय भवितव्यावर भाष्य केले नाही. काँग्रेसच्या कोसळत्या व्यवस्थेवर बोलले नाहीत किंवा ही अवस्था सावरण्यासाठी त्यांनी कसलीही याचना कोणाकडे केली नाही. द्वेष पसरवण्यासाठी, संविधान आणि धर्मनिरपेक्षतेला नख लावणारी दुकाने बंद करणे आणि प्रेमावर उभा राहिलेला समाज तयार करणे, हाच भारत जोडोचा उद्देश असल्याचे राहुल गांधी रोज बोलत राहिले. त्यामुळे राजकीय विरोधकांना त्यांच्यावर टीका करण्यासाठी विषय सापडत नव्हते. राहुल गांधींची यात्रा 'भारत जोडो'साठी नसून परिवार जोडण्यासाठी आहे, असा आरोप भाजप करत राहिली. तिने ही यात्रा काँग्रेसच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीशी जोडली. प्रत्यक्षात राहुल गांधी किंवा सोनिया गांधी यांनी निवडणूक लढवली नाही. खरगे यांनी ती लढवली आणि ते विजयी झाले. अनेक राजकीय पक्ष आणि दोनशेहून अधिक स्वयंसेवी, सामाजिक आणि युव संघटनांनी राजकारणाच्या पलिकडे जाऊन यात्रेला पाठिंबा दिला होता. हॉलिवूडचे प्रसिद्ध अभिनेते जॉन कुशाक यांनीही या यात्रेला पाठिंबा देऊन फॅसिझमविरोधी लढ्यात अग्रेसर राहू, असे त्यांनी सांगितले. गेल्या आठ-दहा वर्षांपासून देशभर हिंदुत्ववादी संघटना आणि पक्षांनी पद्धतशीरपणे पसरवलेल्या धर्मवादाविरुद्ध, द्वेषाविरुद्ध ही यात्रा होती, हे सतत स्पष्ट होत गेले. प्रेमाने भरलेला समाज आणि देश बनवण्यासाठी ही यात्रा आहे, हे राहुल गांधी शेवटपर्यंत सांगत राहिले.

प्रेम वाटण्यासाठी, हातात हात घालून चालण्यासाठी निघालेल्या यात्रेत राहुल गांधींनी त्यांना चिकटवलेला पप्पू कधीच फेकून दिला. एवढेच नव्हे, तर आपल्यातला राहुलही फेकून दिला. राहुलला मी कधीच मागे सोडून आलोय. आता राहुल गांधी शिल्लक आहे तो भाजपच्या आणि प्रश्नकर्त्यांच्या मनात, असे स्पष्टपणे ते सांगत राहिले. राहुल गांधी मागे पडला किंवा तो संपला असेल, तर मग कोण नव्याने जन्माला आला आहे याचा विचार लोकांनी करायचा आहे. कारण राहुलनी आपल्यावरची सर्व आवरणे फेकून दिली आहेत, फाडून काढली आहेत. असा एक नेता तयार झाला आहे, की जो प्रेमाच्या धाग्याने देश आणि समाज पुन्हा नव्याने बांधू पाहतोय, विणू पाहतोय. या त्यांच्या स्वप्नाला देशातल्या तरुणाईने प्रचंड पाठिंबा दिला. कोट्यवधी तरुण यात्रेत सहभागी झाले असतील. या सर्वांना त्यांनी कोणतीही भौतिक आश्वासने दिली नाहीत. हातात हात घालून चला, खांद्याला खांदा लावून चला, प्रश्न आपोआप सुटतील, एवढेच ते सांगत होते. द्वेषमूलक राजकारण करून प्रश्न सुटत नाहीत, तर परस्परांवर प्रेम केल्याने ते सुटतात, असे ते सांगत राहिले. प्रेम करा आणि राष्ट्रप्रेमी व्हा, असा त्यांचा संदेश होता. कोण्या धर्माचा, अल्पसंख्याकांचा द्वेष करून राष्ट्रप्रेमी होता येत नाही किंवा डीएनए तपासण्याचे यंत्र नागपूरहून आणूनही राष्ट्रभक्त होता येत नाही. बस्स, प्रेम हाच सर्व मूल्यांचा आधार आहे, असे राहुल आग्रहाने बोलत राहिले. गुजरातमध्ये झालेले भयानक हत्याकांड, अन्य ठिकाणी झालेले आणि धर्माच्या, जातीच्या, देवाच्या नावाने होत असलेले संघर्ष यातून राष्ट्र घडत नाही, तर त्याच्या ऐक्याला तडा जातो. तडे सांधायचे असतील, तर फेविकॉल लावून, भाई और बहनो म्हणून चालत नाही, तर प्रेमानेच हे तडे सांधता येतात. म. गांधींनी दांडी यात्रेत मूठभर मीठ उचलायला लावून लाखो लोकांना स्वातंत्र्य सैनिक बनवले होते आणि राहुल गांधींनी यात्रेत चार पावले चालायचे आवाहन करून लोकांच्या मनात प्रेमाचे बीज टाकले. या सर्व बाबी लक्षात घेताना काही गोष्टी मान्य कराव्या लागतात आणि त्या म्हणजे देशाच्या ऐक्याला तडे जात आहेत, मूलतत्त्ववाद टोकदार होतो आहे, धर्मवाद वाढतो आहे, फॅसिझमही वाढतो आहे. या साऱ्या गोष्टी म्हणजे कोरोनापेक्षा भयंकर आहेत. त्या कोणाला जोडत नाहीत, तर तोडत असतात. ऐक्याची वीण उसवून सतत वाहणाऱ्या जखमा तयार करत असतात. हे सारे थांबवायचे असेल, तर शस्त्रसिद्ध होऊन लढता येत नाही. कारण शस्त्रांच्या टकरीत जखमा वाढतात, सुकत नाहीत. राहुल गांधींची यात्रा निःशस्त्र होती. प्रेमाचा संदेश देणारी आणि यात्रेत जमलेल्या सर्वांची एक अभेद्य माळ तयार करणारी होती. या यात्रेला ना राजकारणाची, ना पक्षाची, ना निवडणुकीतील विजयाची चिंता होती. गुजरात आणि अन्य ठिकाणी निवडणुकीतील पराभव पचवत ती चालत राहिली. अधिक बळकट होत राहिली. काश्मीरमध्ये पोहोचल्यानंतर ती अधिक बळकट झाली. देशाच्या चार हजार किलोमीटर पट्ट्यावर प्रेम, नवा समाज, ऐक्य यासाठी तिने पाऊलमुद्रा, विचारमुद्रा उमटवल्या आहेत. त्या चकाकत राहाव्यात यासाठी आपले प्रयत्न आवश्यक आहेत. आपलीच ती जबाबदारी आहे.

●●●

**- तात्या विंचू**

# एकटेच असतात ते...

माणसे सुखासाठी
आयुष्यभर कण्हतात
दु:खच शेवटी माणसालाच
विकत घेते म्हणतात

ऐश्वर्यामध्ये
हवी ती शांती,
हवे ते समाधान साऱ्यांनाच
मिळतेच असे नाही

हौस,चैन,
म्हणजेच केवळ
सुख असते
असे नाही

उभे आयुष्य वाळवंटातच
काढणारे, रानातच राहून
झाडे झुडपे जपणारे,
सुखी असतात कसे

हे न कळणारे
आनंदीही का नसतात?

कशातरी मागे
सतत धावत का असतात?

घराबाहेर जाणाऱ्यापेक्षा
घराबाहेर जा
म्हणणाऱ्यालाच
जास्त सोसावे लागत असते

मनाच्या कोपऱ्यात
सतत त्याला
रडतच रहावे
लागत असते

वारा घेऊन
येत असतो
सगळे वास
सगळे गंध

चोरी लपत नाही अशा असतात
सुखी वास्तू काही
माणसे खोटी बोलली तरी ती
वास्तू खोटे बोलत नाही

पळून जाऊन आलिंगन देता येत नाही त्याला,
मन आपले, देह आपला सुखाचा
दु:खात ज्याचा त्यानेच घातला

एकट्याचे धैर्य
एखाद्या सैन्यासारखे
मोठे असते
असे म्हणतात

जे गमावतात
खूप काही
त्यांनीच खूप काही
कमावलेलेही असते

एकटेच
असतात ते
तेही त्यांच्या
एकट्याचेच असते

**– श्रीपाद भालचंद्र जोशी**

# या जिभेवरच्या बेड्या अन् ही कवितेची नसबंदी

इथे डीजेच्या गोंगाटात ऐकू येत नाही आईची शपथ
हा जिओ मोडीत काढतो नेटपॅकपुरतीच उरलेली बापाची गरज
ही सेल्फिश पिढी एकांताला करते सोशल
प्रत्येकाला मिळत नाही भूतकाळ पुसण्याचा साबण सनीसारखा
हे ट्रोलभैरव वायफाय उद्धरतात आयमाय
हे सायबर व्हॅलीतले दरोडेखोर करतात तुम्हाला कॅशलेस

हे कधीच लाईन न मिळालेले भूकाळ
यांना लाभलीय लव जिहाद ओळखण्याची दिव्यदृष्टी
हा संन्याशांचा करिअर ग्राफ टोचतो शल्य लग्न केल्याचं

उगवत्या सूर्याला सलाम केला तरी
मिळत नाही जिवंत राहण्याची हमी
ही पसरलीय साथ कणा गायब होण्याची
ही संपत नाही देशद्रोहाच्या आरोपांची यादी
हा सुपारीबाज चौथा खांब घेतो टीआरपीची काळजी



या जिभेवरच्या बेड्या अन् ही कवितेची नसबंदी
ओएलएक्सवर स्वत:ला विकण्याच्या स्पर्धेत
लोकहो, आता लेकरू सांभाळणं सोपं,
तत्त्व सांभाळणं अवघड आहे.

**– अमोल बागूल, नाशिक**

# निपक्ष: पत्रकारितेचे पाठिराखे....

## प्रबोधनाच्या दृष्टीने एक आवश्यक माध्यम : 'द पीपल्स पोस्ट'!



'द पीपल्स पोस्ट' या पाक्षिकाला चार वर्षे पूर्ण होत आहेत, याबद्दल मनस्वी आनंद होतोय. या पाक्षिकाने नवी जागृती समाजात आणलेली आहे. लोकशाही, धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य आणि समता या मूल्यांवर उभे असलेले हे पाक्षिक भारतीय समाजाला प्रबोधनाच्या दृष्टीने एक आवश्यक माध्यम बनले आहे. अलीकडे सर्व नियतकालिके ही सर्वसामान्यपणे प्रवाहपतीत झालेली आहेत. यातून मुक्त अशी पत्रकारिता मराठी वाचकांची आवश्यकता होती, ती पूर्ण करण्याचे काम 'द पीपल्स पोस्ट' या पाक्षिकाने केलेले आहे. त्याचे संपादक मा. चेतन शिंदे आणि त्यांचे मार्गदर्शक या सर्व मंडळींनी जिद्दीने हे पाक्षिक चालू ठेवले, त्याबद्दल ते धन्यवादास पात्र आहेत. हे पाक्षिक असेच चालू राहावे आणि भारतातील लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता मूल्यांची जोपासना व्हावी, म्हणून जनतेने त्याला आर्थिक आणि इतर सर्व प्रकारची मदत करण्याची आवश्यकता आहे. त्यांना ही मदत समाजाकडून मिळेल, अशी अपेक्षा आहे.

● **डॉ. रावसाहेब कसबे** ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत

## कुणाचीही भिड मुरवत न बाळगणारे निर्भीड पाक्षिक 'द पीपल्स पोस्ट'



'द पीपल्स पोस्ट' पाचव्या वर्षात पदार्पण करीत आहे. मराठी वाचकांसाठी ते प्रत्येक अंकात नवनवीन राजकीय, सामाजिक, आंतरराष्ट्रीय घडामोडींबाबत उत्तमोत्तम लेख घेऊन प्रकाशित होत आहे. महाराष्ट्राच्या वैचारिक मंथनात 'द पीपल्स पोस्ट'ने गेल्या चार वर्षांत मोलाची भर टाकली आहे. ताज्या घडामोडींचे विश्लेषण, भाष्य हे या अंकाचे आणखी एक वैशिष्ट्य. त्यातील लेखकांची नावे पाहता अंकाच्या दर्जाची कल्पना तर येतेच; पण प्रत्येक अंक आपल्याला विचार करावयास काहीतरी नवीन देऊन जातो. त्यातील कविता आशयघन असतात. तसंच, 'दलित पँथर'सारखे अंक संग्रही ठेवण्याजोगे असतात. त्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे दलितांच्या उत्थानाचे 'द पीपल्स पोस्ट'ने डोळ्यापुढे ठेवलेले उद्दिष्ट! दलितांवरील दिवसागणिक वाढणारी अत्याचारांची संख्या पाहता, त्या विरुद्धचा लढा कायम ठेवला पाहिजे, याची जाणीव 'द पीपल्स पोस्ट' करून देते. कुणाचीही भिड न बाळगता सडेतोडपणे लिहिणारे संपादक चेतन शिंदे यांच्यामुळे दिवसेंदिवस अंकाचा दर्जा उंचावत तर आहेच; पण वाचक वर्गातही भर पडत आहे. 'द पीपल्स पोस्ट'ला माझ्या मनापासून शुभेच्छा.

● **विजय नाईक** ज्येष्ठ पत्रकार, नवी दिल्ली

## महाराष्ट्राचा एक वैचारिक अन् रोखठोक मंच 'द पीपल्स पोस्ट'



मराठी पत्रकारितेत पाक्षिकांना क्वचितच स्थान मिळाले. साप्ताहिके व मासिके यांना रुळलेला मराठी वाचक पाक्षिकांना जवळ करणे अस्वाभाविक होते; पण 'द पीपल्स पोस्ट'ने सारे समज उलटवले. त्याचे नाव, प्रकाशन काल, वाचकवर्ग अशा सर्व घटकांसह त्याचे संपादक चेतन शिंदे यांच्याशी माझा जवळून संबंध आला. चेतन माझा सख्खा विद्यार्थी. त्याचा वर्गबाह्य शिक्षकही मी बनलो तो या पाक्षिकामुळे. आता ते महाराष्ट्राचे एक वैचारिक अन् रोखठोक मंच म्हणून स्थिरावल्याचे मी पाहतो आहे. त्यात मलाही लिहिता येते म्हणून नव्हे, तर सुखदेव थोरात, रावसाहेब कसबे, विजय नाईक, उत्तम कांबळे अशा विचारकांनाही महाराष्ट्र पाहतो, याने त्याची उंची व गांभीर्य लाभल्याचेही दिसते. 'द पीपल्स पोस्ट'मुळे नि:पक्षपाती, तटस्थ अथवा संतुलित पत्रकारिता असा काही प्रकार नसतो, हा समज दृढ होतो आहे. तात्त्विक आणि वैचारिक बाजू मराठी पत्रकारितेतून लुप्त झालेल्या काळात 'द पीपल्स पोस्ट' अवतरले. त्याचे असणेच आमच्यासारख्यांना फॅसिझम अन् धर्मांधता यांच्याशी चार हात करायला आणि त्यांचा पाडाव करायला मोठी प्रेरणा देते. ती सदैव मिळो...

● **प्रा. जयदेव डोळे** ज्येष्ठ माध्यमतज्ज्ञ

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2022-2024
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

With Best Compliments





Sos. Agrotech Pvt.Ltd

